सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
४० वा वर्धापन दिन
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, ९ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक २८० | पाने १२+४ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




# दैनिक 'तरुण भारत'वर वर्धापनदिनी शुभेच्छांचा वर्षाव!



* सोलापूर : तरुण भारतला वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देताना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद.



* महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले.



* प्रिसिजन कॅमशॉफ्टचे कार्यकारी संचालक यतीन शहा व संचालक करण शहा.



* बालाजी अमाईन्सचे कार्यकारी संचालक डी. राम रेड्डी.



* उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर.



* महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, उपायुक्त आशिश लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, पत्रकार किरण बनसोडे.



* उद्योजक शिवप्रकाश चव्हाण व सतीश मालू.



* माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे.



* ज्येष्ठ विधिज्ञ धनंजय माने, ॲड. जयदीप माने, ज्येष्ठ पत्रकार एजाजहुसेन मुजावर.



* तरुण भारतला वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देताना पेठे परिवार.

## भर पावसातही मान्यवरांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जुलै-**

दैनिक सोलापूर तरूण भारतच्या ४० व्या वर्धापनदिनानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. भर पावसातही असंख्य मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली.

दैनिक तरूण भारतचा वर्धापनदिन गुरुवारी (दि. ८) उत्साहपूर्ण वातावरणात साजरा झाला. सायंकाळी ६ ते रात्री उशिरापर्यंत शहर-जिल्ह्यातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा देखणा सोहळा पार पडला. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले, उद्योजक राम रेड्डी, प्रिसिजन कॅमशॉफ्टचे कार्यकारी संचालक यतीन शहा, संचालक करण शहा, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक नितीन धार्मिक, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंह रजपूत, जेष्ठ विधिज्ञ ॲड. धनंजय माने, ॲड. जयदीप माने, ज्येष्ठ पत्रकार एजाजहुसेन मुजावर, महापालिका सार्वजनिक कार्यकारी आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी डी. टी. पवार, शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य अशोक उपाध्याय, माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, माजी महापौर महेश कोठे, माजी महापौर किशोर देशपांडे, माजी महापौर नलिनी चंदेले, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, माजी नगरसेवक नारायण बनसोडे, माजी उपमहापौर प्रमोद गायकवाड, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, शिखर बँकेचे माजी संचालक अविनाश महागावकर, सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे, **(पान ३ वर)**

## महापालिका अधिकाऱ्यांनी दिली 'इंद्रभुवन'ची प्रतिमा भेट

दैनिक 'तरूण भारत'च्या वर्धापनदिनानिमित्त महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी सोलापूरचे वैभव असलेली महापालिकेतील 'इंद्रभुवन' इमारतीची प्रतिमा भेट दिली. यावेळी जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार यांचीही उपस्थिती होती.









सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

सोलापूर : शुक्रवार, ९ ऑगस्ट २०२४





सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# भारताने जिंकले सलग दुसऱ्यांदा कांस्यपदक

## हरमनप्रीत सिंग विजयाचा शिल्पकार, स्पेनवर २-१ ने विजय



स्पेनच्या आक्रमणाला थोपवण्याचा प्रयत्न करताना भारतीय बचावपटू

◆ **पॅरिस, ८ ऑगस्ट**

हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखाली भारतीय पुरुष हॉकी संघाने पॅरिस ऑलिम्पिकध्ये तिरंगा फडकवला असून ऑलिम्पिकमध्ये सलग दुसऱ्यांदा कांस्यपदक पटकावण्याची किमया केली. गुरुवारी कांस्यपदकासाठी खेळल्या गेलेल्या सामन्यात भारतीय हॉकी संघाने स्पेनचा २-१ पराभव करून देशाला ऐतिहासिक असा विजय मिळवून दिला. कर्णधार हरमनप्रीत सिंग भारताच्या विजयाचा शिल्पकार ठरला असून त्याने सामन्यात सलग दोन गोल करून संघाच्य विजयात सिंहाचा वाटा उचलला.

शेवटच्या वेळी भारतीय हॉकी संघाने १९७२ मध्ये सलग ऑलिम्पिक पदक जिंकण्याची किमया केली होती. भारतीय हॉकी संघाने ऑलिम्पिकच्या इतिहासात एकूण १३ वे पदक जिंकण्यात यश मिळवले आहे.

भारताने १९२८, १९३२, १९३६, १९४८, १९५२, १९५६, १९६०, १९६४, १९६८, १९७२, १९८०, २०२० व आता २०२४ पॅरिस ऑलिम्पिकमध्ये १३ वे पदक पटकावले.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचे हे एकूण चौथे कांस्यपदक ठरले. यातील तीन पदके नेमबाजीतून मिळाली आहेत.

सामन्याच्या प्रारंभी दोन्ही संघांनी आक्रमक खेळाचे प्रदर्शन केले, परंतु कोणालाही पहिल्या चरणात गोल करण्यात यश आले नाही. सहाव्या मिनिटाला भारताच्या सुखजित सिंगने चेंडूसह डीमध्ये प्रवेश केला, पण त्याने गोल करण्याची संधी गमावली. स्पेनने ९व्या मिनिटाला संधी निर्माण केली, पण भारतीय संघाची भिंत म्हणून ओळख असणाऱ्या पी. आर. श्रीजेशने अप्रतिम बचाव केला. अखेर पहिला चरण गोलशून्य बरोबरीत राहिला. स्पेनच्या संघाला १८व्या मिनिटाला पेनॉल्टी स्ट्रोक देण्यात आला व मार्क मिरालेस पोर्टिलोने गोल केला. याबरोबरच भारतीय संघ ०-१ ने पिछाडीवर पडला. त्यानंतर स्पेनला लगेचच २१ व्या मिनिटाला पेनॉल्टी कॉर्नरची संधी मिळाली, पण श्रीजेशने उत्तमपणे बचाव केला. २४ व्या मिनिटाला भारताच्या ललित व हार्दिकने आक्रमण केले, परंतु ते गोल करू शकले नाही. दरम्यान २८व्या मिनिटाला स्पेनच्या बोर्जा लॅकेलने आक्रमण केले, परंतु श्रीजेशने आपले कर्तव्य चोख गोल होऊ दिला नाही. मध्यंतरात भारताने १-१ बरोबरी साधली. सामन्याच्या ३० व्या मिनिटाला पेनॉल्टी कॉर्नरवर भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंगने गोल केला.

तिसऱ्या चरणात सामन्याच्या ३३ व्या मिनिटाला भारताने आक्रमण हार्दिक सिंगने चेंडू घेऊन स्पेनच्या डीमध्ये धडक मारली. यावेळी स्पॅनिश बचावपटूच्या पायाला चेंडू लागला. हार्दिकने लगेचच व्हिडीओ रेफरल मागितला. त्यावर रेफरींनी भारताला पेनॉल्टी कॉर्नर दिला. याचा फायदा घेत कर्णधार हरमनप्रीत सिंगने संघासह वैयक्तिक दुसरा गोल नोंदवला. त्याचा स्पर्धेतील हा १०वा गोल ठरला. स्पेनला ३५व्या मिनिटाला पेनॉल्टी कॉर्नरही मिळाला, पण अमित रोहिदासने शानदार बचाव करत गोलचा धोका टाळला. ३५व्या मिनिटाला अभिषेकला ग्रीन कार्ड मिळाले आणि तो २ मिनिटांसाठी मैदानाबाहेर गेला. पुढे भारताला ३७व्या आणि ४४व्या मिनिटाला पेनॉल्टी कॉर्नर मिळाले, पण स्पॅनिश गोलरक्षकाने उत्तम बचाव केला.

चौथ्या चरणात स्पेनने भारताची आघाडी मोडून काढण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. त्यांनी अनेकवेळा भारताच्या डी-मध्ये धडक सुद्धा मारली. भारताच्या सुखजित सिंगला सामन्याच्या ५३ व्या मिनिटाला कार्ड दाखवून दोन मिनिटांसाठी मैदानाबाहेर काढले. सामन्याच्या ५९व्या मिनिटाला स्पेनला पेनॉल्टी कॉर्नर मिळाला, पण गोलरक्षक पी. आर. श्रीजेशने पुन्हा संकटमोचक ठरला आणि त्याने गोल वाचवला. (वृत्तसंस्था)

### पंतप्रधान मोदींनी केले हॉकी संघाचे अभिनंदन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फोन करून भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंगला फोन करून अभिनंदन केले. 'सरपंच साहब' (कर्णधार) असे संबोधून मोदी म्हणाले की, तुमचे आणि तुमच्या टीमचे अभिनंदन. तुम्ही भारताला मोठा सन्मान मिळवून दिला आहे. त्यांनी संघाच्या धैर्य आणि उत्साहाबद्दल, विशेषत: स्पेनविरुद्धच्या कांस्यपदकाच्या सामन्यात पुनरागमन केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

## महत्त्वाचे

### अंशू मलिकचा उप-उपांत्यपूर्व फेरीत पराभव

**पॅरिस** : पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या ५७ किलो वजनी गटात भारतीय कुस्तीपटू अंशू मलिक हिला उप-उपांत्यपूर्व लढतीत टोकियो ऑलिम्पिकचे कांस्यपदक विजेत्या



अमेरिकेच्या हेलन लुसी मारुलिसकडून २-७ असा पराभव पत्करावा लागला. आता अंशूला हेलनने अंतिम फेरी गाठण्याची प्रतीक्षा आहे, त्यामुळे अंशूला रिपचेझ नियमाचा फायदा घेत कांस्यपदक जिंकण्याची संधी मिळू शकेल. मारुलिसचा पुढील सामना जपानच्या प्रथम मानांकित त्सुगुमी साकुराईशी होणार आहे. पहिल्या फेरीत खेळताना हेलनने अंशूला कोणतीही संधी दिली नाही व तीने ७-२ गुणसंख्येने लढत आरामात जिंकली. हेलनने अंतिम फेरी गाठली तर अंशू अजूनही रिपेचेज खेळू शकेल.

### अविनाश साबळेला ११ वे स्थान ज्योती याराजीला चौथे स्थान

**पॅरिस** : भारताचा अविनाश साबळेने पुरुषांच्या ३ हजार मीटर स्टीपलचेसमध्ये ११ वे स्थान मिळविले. भारताची धावपटू ज्योती याराजी हिने महिलांच्या १०० मीटर्स अडथळ्याच्या शर्यतीच्या रिपेचेज फेरीत १६ वे स्थान मिळविले. आशियाड क्रीडा स्पर्धेतील रौप्यपदक विजेती ज्योती याराजीने रिपेचेज फेरीत १६व्या स्थानावर राहून संपली. याराजीने १३.१७ सेकंद वेळ नोंदवत सोळावे स्थान मिळविले. प्रत्येक रिपेचेज हीटमधील अव्वल दोन धावपटू उपांत्य फेरीत प्रवेश करू शकतात. याराजीने पहिल्या फेरीत १३.१६ सेकंदांचा वेळसह एकूण ३५ वे स्थान पटकावले व रिपेचेज फेरीत प्रवेश केला होता.

### अंतिम पांघळवर तीन वर्षांची बंदी

**पॅरिस** :भारतीय ऑलिम्पिक संघटना (आयओसी) भारतीय कुस्तीपटू अंतिम पांघळवर तीन वर्षांची बंदी घालणार आहे, असे सूत्रांनी गुरुवारी वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले. ऑलिम्पिकदरम्यान अंतिम पांघळने खेळाडू म्हणून स्वतःच्या ओळखपत्रावर आपल्या बहिणीला ऑलिम्पिक क्रीडाग्राममध्ये प्रवेश देण्याचा प्रयत्न केला. अंतिमच्या बहिणीला तोतयागिरीसाठी पकडण्यात आले व तिचे बयाण नोंदवण्यासाठी तिला पोलिस ठाण्यात नेण्यात आले, असे एका सूत्राने सांगितले. ऑलिम्पिक दरम्यान अंतिम पांघळची कृती भारतीय पथकासाठी लाजीरवाणी आहे. बुधवारी महिलांच्या ५३ किलो वजनी गटात पहिल्याच सामन्यात पराभव पत्करावा लागल्यानंतर अंतिम पांघळला ऑलिम्पिक स्पर्धेतून बाहेर पडावे लागले. अंतिम पांघळने शिस्तीचे उल्लंघन केल्याची नोंद फ्रेंच अधिकाऱ्यांनी केली असून भारतीय ऑलिम्पिक संघटनेने खेळाडू व तिच्या सपोर्ट स्टाफला घरी परत पाठवण्याचा निर्णय घेतला.

### निवृत्तीचा पुनर्विचार करण्यास श्रीजेशचा नकार

**पॅरिस** : पॅरिसमधील ऑलिम्पिक स्पर्धेत संघाला सलग दुसरे कांस्य पदक मिळवून दिल्यानंतर आंतरराष्ट्रीय हॉकीमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय मागे घेण्याची कोणतीही शक्यता नाकारून प्रतिष्ठित भारतीय गोलरक्षक पी. आर. श्रीजेशने गुरुवारी सांगितले की, मी आपल्या निवृत्तीच्या निर्णयावर ठाम असून कारकिर्द समाप्त करण्याचा हा सर्वोत्तम मार्ग आहे.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| **सेन्सेक्स** | ७८,८८६.२२ (-५८१.७९) |
| **निफ्टी** | २४,११७.०० (-१८०.५०) |

### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ६९,२७० रु. |
| **चांदी** (प्रतिकिलो) | ८१,५०० रु. |

### तापमान/पर्जन्यमान

| | कमाल | मिमी |
|---|---|---|
| अकोला | २९.५ | ०.० |
| अमरावती | २७.६ | ०.० |
| भंडारा | २७.० | १.० |
| बुलडाणा | २७.० | ४.० |
| चंद्रपूर | ३२.० | ०.० |
| गडचिरोली | २७.४ | १०.० |
| गोंदिया | २९.० | ०.४ |
| नागपूर | २९.२ | ०.० |
| वर्धा | २९.० | ०.० |
| वाशीम | ३०.२ | ०.० |
| यवतमाळ | २८.५ | ०.० |

# विनेशचा कुस्तीला रामराम

- माँ, कुस्ती जिंकली, मी हरले
- आता आणखी पुढे खेळण्याची ताकद नाही



◆ **पॅरिस, ८ ऑगस्ट**

आता पुढे आणखी कुस्ती खेळण्यासाठी ताकद नाही, असे म्हणत भारताची कुस्तीपटू २९ वर्षीय विनेश फोगटने गुरुवारी कुस्तीला रामराम ठोकला.

नशिबाच्या क्रूर वळणामुळे तिचे दीर्घकाळचे ऑलिम्पिक पदक जिंकण्याचे स्वप्न भंग पावले. रिओ, टोकियो ऑलिम्पिकमध्ये अपयशी ठरल्यानंतर विनेशने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आपल्या ५० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला, परंतु सुवर्णपदकाच्या लढतीपूर्वी तिचे १०० ग्रॅम वजन जास्त वाढल्यामुळे ती अपात्र ठरली व ऑलिम्पिकमधून बाहेर झाली. त्यामुळे पॅरिस ऑलिम्पिकमध्येही तिचे पदक जिंकण्याचे स्वप्न भंग झाले. त्यामुळेच विनेशने समाज माध्यमावर आपल्या निवृत्तीचा निर्णय जाहीर केला व पाठिंबा देणाऱ्या प्रत्येकांकडून माफी मागितली.

आई प्रेमलता यांना उद्देशून विनेशने लिहिले की, माँ, कुस्ती जिंकली, मी हरले. मला माफ कर, तुझी स्वप्ने व माझे धैर्य सर्व काही तुटले आहे.

कुस्ती खेळणे पुढे सुरु ठेवण्यासाठी माझ्याकडे आता आणखी ताकद नाही. गुडबाय २००१-२०२४. मी तुम्हा सर्वांची ऋणी आहे. मला पाठिंबा देणाऱ्यांनो माफ करा, असे तिने म्हटले आहे.

विनेशने ऑलिम्पिक अंतिम फेरीतून अपात्रतेविरुद्ध बुधवारी कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन फॉर स्पोर्ट्समध्ये (कॅस- क्रीडा लवाद) अपील केली. विनेशला संयुक्तपणे रौप्यपदक देण्याची मागणी या अपीलमध्ये करण्यात आल्यानंतर आश्चर्यकारकपणे विनेशने निवृत्तीचा निर्णय जाहीर केला.

कॅसचा तदर्थ विभाग, जो ऑलिम्पिक खेळांदरम्यान किंवा समारंभाच्या १० दिवसांच्या कालावधीत उद्भवलेल्या कोणत्याही विवादांचे निराकरण करण्यासाठी येथे स्थापन करण्यात आला आहे. पुढील काही तासांत तिचे अपील स्वीकारेल.

विनेशने काही काळ क्रीडा ग्राममधील पॉलीक्लिनिकमध्ये घालवला. अंतिम सामन्यापूर्वी वजन घटविण्यासाठी जीवघेण्या उपायांमुळे तिची प्रकृती बिघडली. तिला डीहायड्रेशन झाले. वजन कमी करण्यासाठी ती उपाशी राहिली, घाम काढण्यासाठी रात्रभर दोरीवर उड्या मारल्या, त्यामुळे तीव्र निर्जलीकरण झाले होते.

तीन वेळची ऑलिम्पिकपटू विनेश फोगटने आशियाई व राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदके जिंकली आणि दोन वेळा जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक पटकावले आहे. (वृत्तसंस्था)

# अमन सेहरावतकडून पदकाची आशा

◆ **पॅरिस, ८ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमधील पुरुषांच्या कुस्ती स्पर्धेत भारताच्या आणखी एका पदकाच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. कुस्तीपटू अमन सेहरावतने गुरुवारी पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे.

अमनने उपांत्यपूर्व सामन्यात अल्बेनियाच्या झेलीमखान अबाकारोव्ह याचा ११-० ने पराभव करून भारताचे कुस्तीमधील आव्हान कायम ठेवले आहे. उपांत्य सामना गुरुवारी रात्री ९.४५ वाजता जपानच्या कुस्तीपटू विरुद्ध होणार आहे.

अमनने सुरुवातीपासूनच आक्रमण केले, तर झेलीमखान बचावात्मक पवित्रा घेताना दिसला.



झेलीमखानच्या निष्क्रियतेचा फायदा अमनला मिळाला. त्याने एक गुणाची आघाडी घेतली. त्यानंतर अमनने दोन गुणांची बाजी मारली आणि ३-० अशी आघाडी मिळवली. पहिल्या फेरीत ही आघाडी कायम राहिली. दुसऱ्या फेरीत अमनने मुसंडी मारली व दुसऱ्याच मिनिटाला झेलीमखानला खाली लोळवले. पायांची मोळी बांधून त्याला तीनदा उलटसुलट फिरवले. अशा प्रकारे अमनच्या खात्यात थेट ८ गुण आले. यासह त्याची आघाडी ११-० अशी झाली. यानंतर अल्बेनियाच्या कुस्तीपटूने रिव्ह्यू घेतला, जो रेफरींनी चुकीचा ठरवला.

अमन सेहरावतने उप-उपांत्यपूर्व सामन्यात नॉर्थ मॅसेडोनियाच्या व्लादिमीर एगोरोव्हचे आव्हान मोडून काढले. ही लढत चुरशीची होण्याची अपेक्षा होती, पण अमन सेहरावतने चमकदार कामगिरी करत अतिशय झटपट गुण मिळवले. १०-० अशी आघाडी होताच रेफरीने सामना थांबवून अमन सेहरावतला विजयी घोषित यासह त्याने पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटात उपांत्यपूर्व फेरी गाठली. (वृत्तसंस्था)

# काँग्रेस सरकारने केला होता गीता-बबिताशी भेदभाव : महावीर फोगट

◆ **चंदीगड, ८ ऑगस्ट**

भूपेंद्र हुड्डा मुख्यमंत्री असताना त्यांनी गीता व बबिता यांच्याशी भेदभाव केला होता. भूपेंद्र हुड्डा आज जे बोलत आहेत ती निव्वळ राजकीय स्टंटबाजी आहे,' असे विनेश फोगटचे काका व माजी कुस्तीपटू महावीर फोगट म्हणाले.

विनेश फोगटला राज्यसभेवर पाठवण्याची आमची इच्छा आहे, पण आमचे केवळ २८ आमदार आहेत. या संख्याळाच्या जोरावर आमचा उमेदवार राज्यसभेचा खासदार होऊ शकत नाही. जर आमची आमदार संख्या जास्त असती

तर आम्ही तिला खासदार केले



असते, असे विधान हरयाणाचे माजी मुख्यमंत्री व काँग्रेस नेते भूपेंद्र सिंह हुड्डा यांनी केले आहे. त्यांच्या या विधानावरून महावीर फोगट जाम संतापले व त्यांनी प्रतिक्रिया देत भुपेंद्र हुड्डा यांचा समाचार घेतला आहे. भूपेंद्र हुड्डा विनेशला राज्यसभेवर पाठवा असे सांगत आहेत, पण त्या आधी गीता फोगटला त्यांच्या सरकारच्या काळात का पाठवले नाही? २००५ व २०१० मध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा पार पडल्या तेव्हा बबिता फोगटने रौप्यपदक, तर

गीता फोगटने सुवर्णपदक जिंकले होते. राष्ट्रकुल सुवर्णपदक जिंकणारी ती पहिली भारतीय कुस्तीपटू होती. त्यानंतर २०१२ मध्ये गीता ऑलिम्पिकसाठी पात्र ठरणारी पहिली महिला कुस्तीपटू ठरली. त्यावेळी हुड्डा यांचेच सरकार होते आणि गीता-बबिता यांना खासदार बनवायचे होते, पण हुड्डा यांनी भेदभाव करून गीताला पोलिस निरीक्षक व बबिताला पोलिस उप-निरीक्षक केले. या प्रकरणी आम्हाला न्यायालयात जावे लागले. तिथे आम्ही न्याय मिळवला, असेही ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# मीराबाईचे एक किलोमुळे पदक निसटले





◆ **पॅरिस, ८ ऑगस्ट**

टोकियो ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक जिंकणारी भारताची महिला भारोत्तोलक मीराबाई चानू हिचे पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या ४९ किलो वजनी गटात एका किलोमुळे पदक हुकले. तिने चौथे स्थान मिळविले.

मीराबाईने स्नॅचमध्ये ८८ किलो व क्लीन अॅण्ड जर्कमध्ये १११ किलो असे एकूण १९९ किलो उचलले. सुवर्णपदकाची प्रबळ दावेदार असलेल्या चीनची विद्यमान ऑलिम्पिक विजेती हॉउ झिहुईने क्लीन अॅण्ड जर्कमध्ये ऑलिम्पिक विक्रमासह पहिले स्थान मिळविले. तिने एकूण २०६ (स्नॅच ८९, क्लीन अॅण्ड जर्क ११७) किलो वजन उचलले. रोमानियाची व्हॅलेंटिना कॅम्बेई २०६ (९३ आणि ११२) किलो वजनासह रौप्यपदक जिंकण्यात यशस्वी ठरली व थायलंडच्या सुरोदचना खांबोने २०० (८८ आणि ११२) किलो वजनासह कांस्यपदक जिंकण्यात यश मिळविले. (वृत्तसंस्था)

# गोलरक्षक पी. आर. श्रीजेश 'भारतीय आधुनिक हॉकीचा देव'

◆ **पॅरिस, ८ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेमध्ये स्पेनविरुद्धच्या कांस्यपदकाच्या हॉकी सामन्यापूर्वी हॉकी इंडियाने भारतीय पुरुष हॉकी गोलरक्षक पी. आर. श्रीजेशला 'भारतीय आधुनिक हॉकीचा देव' ही पदवी प्रदान केली.

स्पेनविरुद्धच्या सामन्यानंतर केरळचा पी.आर. श्रीजेश आपल्या ३६ वर्षांच्या या शानदार कारकिर्दीचा शेवट पदकासह करण्याची आशा आहे.

या सामन्याच्या काही तासांपूर्वी श्रीजेशने समाजमाध्यमावर एक हृदयस्पर्शी पोस्ट टाकली. आज मी येथे आपल्या कारकिर्दीचा शेवटचा सामना खेळण्यसाठी उभा असताना माझे हृदय कृतज्ञता व अभिमानाने फुलून गेले आहे. स्वप्न पाहणाऱ्या एका मुलापासूनते भारताच्या सन्मानाचे रक्षण करणाऱ्या माणसापर्यंतचा हा प्रवास असामान्यपेक्षा कमी नाही. आज मी भारतासाठी माझा शेवटचा सामना खेळत आहे. प्रत्येक बचाव, प्रत्येक गोतावळा, गर्दीची प्रत्येक गर्जना माझ्या हृदयात कायमची गुंजत राहील. व



माझ्यावर विश्वास ठेवल्याबद्दल देशवासियांचे आभार मानतो. माझ्या पाठीशी उभे राहिल्याबद्दल धन्यवाद. हा शेवट नाही, पण प्रेमळ आठवणींची सुरुवात, असे त्याने या पोस्टमध्ये म्हटले आहे.

स्वप्नांचा कायमचा संरक्षक श्रीजेशने ऑलिम्पिकमध्ये चौथ्यांदा सहभागी होण्यापूर्वी निवृत्तीची योजना जाहीर केली होती.

अनुभवी गोलरक्षक पी. आर. श्रीजेशच्या उत्कृष्ट बचावामुळे ग्रेट ब्रिटनविरुद्धच्या उपांत्यपूर्व फेरीतील शूटआऊटसह भारताला सलग दुसऱ्यांदा ऑलिम्पिक उपांत्य फेरीत स्थान मिळण्यास मदत झाली. तीन वर्षांपूर्वी टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताच्या कांस्यपदक जिंकण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती.

२००६ च्या दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धेत पदार्पण केल्यानंतर श्रीजेश भारतासाठी २०१४ आशियाड क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक व जकार्ता येथे २०१८ आशियाडमध्ये कांस्यपदकांसह विविध संस्मरणीय विजयांचा एक भाग तो २०१८ मधील आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी विजेत्या संघाचा आणि भुवनेश्वरमधील २०१९ एफआयएच पुरुष मालिका अंतिम फेरीच्या विजेत्या संघाचा देखील भाग होता. (वृत्तसंस्था)

# भविष्यात संथ व वळणदार खेळपट्टींसाठी वेगवेगळा संघ निवडू शकतो : रोहित शर्मा

◆ **कोलंबो, ८ ऑगस्ट**

भविष्यात संथ व वळणदार खेळपट्टींसाठी भारतीय संघ व्यवस्थापन वेगवेगळा संघ निवडू शकतो, असे कर्णधार रोहित शर्मा म्हणाला.



येथील फिरकीसाठी अनुकूल परिस्थितीचा सामना करण्यात अयशस्वी ठरल्यामुळे भारतीय संघ व्यवस्थापन वेगवेगळ्या खेळपट्टीसाठी वेगवेगळा संघ निवडण्याचे धोरण अवलंबू शकतो. बुधवारी भारताला तिसऱ्या व अंतिम वन-डे सामन्यात श्रीलंकेकडून ११० धावांनी पराभव पत्करावा लागला. भारताला २७ वर्षांत वन-डे क्रिकेटमध्ये श्रीलंकेविरुद्धचा पहिला मालिका पराभव टाळता आला नाही.

श्रीलंकेने आपल्या घरच्या मैदानाचा पुरेपूर फायदा घेतला. श्रीलंकन फिरकीपटूंनी संथ व चेंडूला वळण देणाऱ्या खेळपट्ट्यांवर भारतीय फलंदाजांची दमछाक करून टाकली. २४९ धावांचा पाठलाग करताना भारताचा संपूर्ण संघ १३८ धावांत बाद झाला. भारतावर ११० धावांनी मात केल्यानंतर श्रीलंकेने तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका २-० ने जिंकली. आमच्यामध्ये वेगवेगळे फटके मारण्याचा अभाव आहे असे मला वाटत नाही, परंतु अशा खेळपट्ट्या खेळताना कसे खेळायचे व ती गती आमच्या दिशेने कशी ठेवायची हे स्पष्ट असले पाहिजे व आम्ही त्यात कमी पडलो, असेही तो म्हणाला.

भारतीय फलंदाज सातत्याने पुरेसे धाडसी नाहीत व फिरकी आव्हानाचा सामना करण्यासाठी त्यांच्याकडे वैयक्तिक योजना नाहीत, असे तो म्हणाला. त्यामुळे आता भविष्यात वेगवेगळ्या खेळपट्ट्यांसाठी वेगवेगळे संघ निवडण्याच्या बाबतीत थोडा वेगळा विचार करावा लागेल व आम्ही तसे प्रयत्न करू. सर्व प्रकारच्या परिस्थितीत खेळू शकणारा एक चांगला संघ घडवू, असेही तो म्हणाला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## आज नागपंचमी



## भारताला हॉकीत सलग दुसऱ्यांदा कांस्यपदक

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पुरुषांच्या हॉकी स्पर्धेत भारताने स्पेनवर २-१ अशा गोलफरकाने मात करून ऑलिम्पिकमध्ये सलग दुसऱ्यांदा कांस्यपदक जिंकले. हरमनप्रीत सिंग विजयाचा शिल्पकार ठरला असून त्याने महत्त्वपूर्ण दोन गोल नोंदवले. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचे हे एकूण चौथे कांस्यपदक ठरले. यातील तीन पदके नेमबाजीतून मिळाली आहेत. भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलणाऱ्या गोलरक्षक पी. आर. श्रीजेशने हॉकीतून निवृत्ती घेतली (वृत्त पान १० वर)



# प्रचंड गदारोळात वक्फ मंडळ दुरुस्ती विधेयक सादर

**विरोधक** संविधानाच्या विरोधात

**सरकार** मुस्लिमांना न्याय देणारे

**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**

काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या प्रचंड गदारोळात सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी गुरुवारी वक्फ मंडळ दुरुस्ती विधेयक लोकसभेत सादर केले. हे विधेयक संविधानाच्या विरोधात असल्याचा विरोधी पक्षांचा आरोप होता, तर हे विधेयक अल्पसंख्यक समाजाला न्याय देणारे असल्याचा दावा सरकारतर्फे करण्यात आला. विधेयक आता संयुक्त संसदीय समितीकडे पाठवले जाणार आहे. समितीची लवकरच स्थापना केली जाईल, असे लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सांगितले.

वक्फ मंडळ कायद्यात दुरुस्ती करणारे वक्फ कायदा १९९५ दुरुस्ती विधेयक २०२४ रिजिजू यांनी आज लोकसभेत सादर केले. सच्चर समितीच्या शिफारसींना अनुसरूनच हे विधेयक आज मांडण्यात आले, असे स्पष्ट करीत रिजिजू म्हणाले, सच्चर समितीची स्थापना तुम्हीच केली होती. वक्फ मंडळाची जी संपत्ती आहे,

### संयुक्त संसदीय समितीकडे पाठवणार

त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा जो आकडा सांगितला जातो, तो बरोबर वाटत नाही, असे समितीनेचे आपल्या अहवालात म्हटले होते.

वक्फ मंडळाबाबत संयुक्त सांसदीय समितीने केलेल्या शिफारसी वाचून दाखवत रिजिजू यांनी वक्फ मंडळाच्या संपत्तीचा उपयोग काही लोकांनी आपल्या स्वार्थासाठी घेतला. सर्वसामान्य मुस्लिमांना त्यांचा फायदा झाला नाही. वक्फ मंडळाचे संगणकीकरण करण्याची गरज आहे, वक्फ मंडळाच्या संपत्तीचे म्युटेशन रेव्हेन्यू रेकॉर्ड ठेवला पाहिजे, असे नमूद केले. सांसदीय समितीचे जे अध्यक्ष होते, ते तुमच्याच पक्षाचेच होते, जे तुम्ही करू शकले नाहीत, ते आम्ही करून दाखवले. राजकीय दबावामुळे तुम्हाला या विधेयकाला विरोध करावा लागत असला, तरी आतून तुमचा या विधेयकाला फायदाच आहे, असा टोला त्यांनी मारला. या विधेयकावर आणखी चर्चा होण्याची गरज आहे, असे विरोधी पक्षांचे नेते म्हणत आहेत, पण या विधेयकावर जेवढी चर्चा आमच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात आम्ही केली, ती आजपर्यंत कोणीच केली नाही, असे ते म्हणाले.

हे विधेयक संविधान विरोधी असल्याचा आरोप करीत मुस्लिम समाजाची दिशाभूल केली जात आहे. वक्फ मंडळ घेत असलेल्या निर्णयांना न्यायालयात आव्हान देता येत असेल, वक्फ मंडळाच्या निर्णयाची न्यायलयात पडताळणी केली जात असेल, तर त्यात गैर काय, ते संविधानविरोधी कसे ठरू शकते, अशी विचारणा रिजिजू यांनी केली. आतापर्यंत वक्फ मंडळ देत असलेल्या निर्णयांना कोणत्याही लवादासमोर, न्यायालयासमोर देता येत नव्हते. वक्फ मंडळाकडे असलेल्या या संपत्तीचा फायदा मुस्लिम समाजातील महिलांना तसेच गरिबांना मिळत नाही, असे रिजिजू म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### निर्देशांकात ६०० अंकांची घसरण



**मुंबई** : जागतिक बाजारातील मंदीच्या संकेतांमुळे देशांतर्गत बाजारांवर विक्रीचा दबाव होता. निर्देशांकात तब्बल ६०० अंकांची घसरण होऊन तो ७८,८८६ वर बंद झाला. निफ्टी १८० खाली येत २४,१०० वर बंद झाला. दिवसभरातील व्यवहारात मुंबई बाजारात तब्बल १८३१ शेअर्स तेजीत होते, तर २०८१ शेअर्समध्ये घसरण दिसून आली. १०२ शेअर्सवर कोणताही परिणाम झाला नाही. मंदीच्या दबावामुळे गुंतवणूकदारांचे २.७९ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले.

### सीबीआयने केली ईडीच्या सहायक संचालकाला अटक

**नवी दिल्ली** : मुंबई येथील एका सोने-चांदीच्या व्यापाऱ्याकडून २० लाख रुपयांची लाच घेताना सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी ईडीच्या सहायक संचालकाला अटक केली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ईडीच्या अधिकाऱ्यांनी ३ आणि ४ ऑगस्टला मुंबई येथील सोने-चांदीच्या व्यापाऱ्याच्या प्रतिष्ठानांवर छापेमारी करीत तपासणी केली होती. यात त्यांना बरीच अवैध संपत्ती आढळून आली.

### राजस्थानातील भाजपा आमदाराचे निधन

**जयपूर** : राजस्थानच्या उदयपूर विभागातील साळुंबर मतदारसंघातील भाजपाचे आमदार अमृतलाल मीणा यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ५५ वषाचे होते. बुधवारी अचानक त्यांना छातीत दुखत असल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. मीणा आदिवासी नेते होते तसेच तीन वेळा विधानसभेत निवडून गेले होते. २०१३ मध्ये ते पहिल्यांदा आमदार झाले होते.

# सलग नवव्यांदा व्याज दर 'जैसे थे'

### कर्जदारांना दिलासा कायम

### रिझर्व्ह बँकेचे पतधोरण जाहीर

**मुंबई, ८ ऑगस्ट**

भारतीय रिझर्व्ह बँकेने रेपो रेटमध्ये कोणताही बदल न करता तो सलग नवव्यांदा ६.५ टक्के एवढा कायम ठेवला आहे. याबाबतचा निर्णय गुरुवारी रिझर्व्ह बँकेचे गर्व्हनर शक्तिकांत दास यांनी पतविषयक धोरण बैठकीनंतर जाहीर केला. गेल्या काही महिन्यांपासून किरकोळ महागाई उच्चांकी पातळीवर राहत असल्याने रेपो दरही रिझर्व्ह बँकेने ६.५ टक्क्यांवर रोखून धरला आहे. रिझर्व्ह बँक ज्या दराने इतर बँकांना कर्ज देते त्याला रेपो दर म्हणतात.



रिझर्व्ह बँकेच्या पतविषयक धोरण समितीने रेपो दर ६.५ टक्के एवढा 'जैसे थे' ठेवला आहे, असे शक्तिकांत दास यांनी म्हटले आहे. पतविषयक धोरण समितीने रेपो दर ६.५ टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय ४:२ बहुमताने घेतला तसेच स्थायी ठेव सुविधा दर ६.२५ टक्के एवढा कायम राहील आणि सीमांत स्थायी सुविधा दर आणि बँक दर ६.७५ टक्के राहील, असे दास यांनी सांगितले.

दास म्हणाले, आम्ही बाजाराच्या अपेक्षा आणि रिझर्व्ह बँकेच्या धोरणात सामंजस्य पाहत आहोत, ते चांगले संरेखित आहेत. समितीची ६ ऑगस्ट ते ८ ऑगस्टदरम्यान आर्थिक वर्ष २०२५ साठी तिसरी द्वि-मासिक धोरण बैठक पार पडली आणि त्यात घेण्यात आलेला निर्णय आज दास यांनी जाहीर केला.

**२०२४-२५ जीडीपी दर कसा राहील?**

२०२४-२५ साठी वास्तविक जीडीपी वाढीचा अंदाज पहिल्या तिमाहीत ७.१ टक्के, दुसऱ्या तिमाहीत ७.२ टक्के, तिसऱ्या तिमाहीत ७.३ टक्के आणि चौथ्या तिमाहीत ७.२ राहण्याचा अंदाज आहे.

**किरकोळ महागाईत वाढ**

ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ महागाईवाढीचा दर जूनमध्ये ५ टक्क्यांवर चार महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचला होता. महागाई दर एप्रिल आणि मे महिन्यामध्ये ४.८ टक्क्यांवर स्थिर राहिल्यानंतर जूनमध्ये ५.१ टक्क्यांपर्यंत वाढला. (वृत्तसंस्था)

### हिजाबबंदी प्रकरणी आज सुनावणी

**नवी दिल्ली** : मुंबईच्या महाविद्यालयात घेतलेला हिजाबबंदीचा निर्णय कायम ठेवण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात विद्यार्थिनींनी दाखल केलेल्या याचिकेवर शुक्रवारी सुनावणी केली जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी सांगितले.

# बांगलादेशात अडकले महाराष्ट्रातील विद्यार्थी, अभियंते

### मुख्यमंत्री शिंदेंचा परराष्ट्र मंत्र्यांना फोन

**मुंबई, ८ ऑगस्ट**

बांगलादेशात मागील काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात हिंसाचार सुरू असून, शेख हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा देत देश सोडल्याने अनागोंदी सुरू आहे. आंदोलकांकडून अनेक ठिकाणी दगडफेक, जाळपोळ केली जात आहे. महाराष्ट्रातीलही काही विद्यार्थी आणि कामानिमित्त गेलेले नागरिक तिथे अडकले आहेत. त्यांना मदत करणे आणि मायदेशात परत आणण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्याशी चर्चा केली. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या सुटकेसाठी सर्व उपाययोजना करण्यात येतील. यासाठी विशेष विमानांची व्यवस्था करण्यात येईल, असे एस. जयशंकर यांनी या संवादादरम्यान शिंदे यांना सांगितले आहे. बांगलादेशात अडकलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांची तसेच अभियंते आदी बाधित लोकांची त्यांच्या लोकेशनसह माहिती परराष्ट्र मंत्रालयाला देण्यात आली आहे. त्यांना तातडीने मायदेशात परत आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांनीही हालचाली करण्यास सुरुवात केली आहे.

बांगलादेशातील भारतीय दूतावासामार्फतही आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत. तिथे अडकलेल्या देशातील कोणत्याही विद्यार्थी, अभियंते किंवा इतर भारतीयाला हानी पोहोचणार नाही आणि त्यांना सुरक्षितरीत्या मायदेशात परत आणण्यात येईल, असे जयशंकर यांनी यावेळी सांगितले.

बांगलादेशात अडकलेल्या विद्यार्थी, अभियंत्यांची माहिती संकलित करण्यात आली असून, त्यांना संपर्क साधणे, मदत उपलब्ध करून देणे यासंदर्भातील कार्यवाहीसाठी राज्यात एक पथकही नियुक्त करण्यात आले आहे. राज्यातील या बाधितांना जलद गतीने मायदेशात परत आणण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत आवश्यक ती सर्व मदत करण्यात येईल, असे एकनाथ शिंदे यांनी या चर्चेदरम्यान सांगितले.

## पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य यांचे निधन

**कोलकाता, ८ ऑगस्ट**

पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री आणि सीपीएम नेते बुद्धदेव भट्टाचार्य यांचे गुरुवारी सकाळी त्यांच्या येथील निवासस्थानी निधन झाले. ते ८० वर्षांचे होते.



बुद्धदेव भट्टाचार्य यांच्या निधनाने मला खूप दुःख झाले. त्यांच्या कुटुंबातील सदस्य आणि चाहत्यांप्रती मी संवेदना व्यक्त करतो. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही प्रार्थना, अशा शब्दांत पश्चिम बंगाल विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि नंदीग्रामचे भाजपा आमदार शुवेंदू अधिकारी यांनी बुद्धदेव भट्टाचार्य यांनी श्रद्धांजली वाहिली.

मागील काही दिवसांपासून त्यांची प्रकृती ठीक नव्हती. त्यांना श्वासोच्छवासाचा त्रास जाणवत होता. त्यांना वारंवार रुग्णालयात दाखल करावे लागत होते. मागील वर्षी त्यांना न्यूमोनिया झाल्याने जीवनरक्षक यंत्रणेवर ठेवावे लागले होते. त्यातून ते बरे झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी मीरा, मुलगा सुचेतन आणि मोठा आप्तपरिवार आहे. (वृत्तसंस्था)

### सर्व नागरिकांना देणार सुरक्षितता : मो. युनुस

**ढाका, ८ ऑगस्ट**

नोबेल पारितोषिक विजेते मोहम्मद युनुस यांनी गुरुवारी बांगलादेशातील अंतरिम सरकारची सूत्रे स्वीकारली. त्यापूर्वी पॅरिस येथून बांगलादेशात दाखल झाल्यावर त्यांनी सर्व नागरिकांना सुरक्षितता दिली जाईल आणि बांगलादेशचे पुनर्निर्माण केले जाईल, असे आश्वस्त केले.

शेख हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्यानंतर सूक्ष्मकर्ज वितरणाच्या अग्रगण्य कार्यासाठी नोबेल शांतता पुरस्कार जिंकणारे युनुस यांना लष्कराने अंतरिम सरकारचे प्रमुख म्हणून नियुक्त केले. ते पॅरिसला ऑलिम्पिक स्पर्धेसाठी गेले होते. दुबईमार्गे ते आज बांगलादेशला परतले. (वृत्तसंस्था)




तरुण भारतच्या वर्धापनदिनी उपस्थित प्रबंध संपादक तथा ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी, समुह मुख्य संपादक दिलीप पेठे, उद्योजिका सुवर्णाताई, प्रकाशक दिलीप दुलंगे, संचालक ॲड. चैतन्य पेठे, निवासी संपादक प्रशांत माने, सीईओ बी श्रीनिवास, व्यवस्थापक विनायक पुला, मराठवाडा आवृत्ती प्रमुख राजाराम मस्के, जाहिरात विभाग प्रमुख मनोहर बायनी आणि तरुण भारतचा कर्मचारी वुंद.

## दैनिक 'तरुण भारत'च्या वर्धापनदिनी...

पान १ वरुन...

निवृत्त पोलिस आयुक्त दीपक आर्वे, शिवसेना जिल्हा उपप्रमुख सुनील कटारे, श्री सिध्देश्वर बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे, उद्योजक राजकुमार सुरवसे, पद्मशाली ज्ञाती संस्थाध्यक्ष सुरेश फलमारी, उद्योजक दत्तामामा मुळे आणि मराठा सेवा संघाचे पदाधिकारी, ऑटोमोबाईल्स वर्कर्स असोशिएशनचे संस्थापक अध्यक्ष नागराज कोंडे, मराठा मोर्चा राज्य समन्वयक सुनील नागणे, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, उद्योजक स्वयंम शिक्षा फाऊंडेशनचे संस्थापक ॲड. सोमनाथ वैद्य, जिल्हा न्यायालय अधीक्षक रमेश बेंबळकर, महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे माजी सभापती सुनील रसाळे, महसूल कर्मचारी संघटना माजी अध्यक्ष शंतनु गायकवाड, महापालिका आरोग्य निरीक्षक संघटना अध्यक्ष शेषराव शिरसट, महापालिका चतुर्थश्रेणी कर्मचारी पतसंस्था माजी चेअरमन भालचंद्र साखरे, आर्यनंदी पतसंस्था चेअरमन डॉ. राजेश फडकुले, धर्मवीर कर्मचारी संघटना अध्यक्ष मल्लिकार्जुन हुणजे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे आदी मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. प्रारंभी दैनिक तरुण भारतचे अध्यक्ष विवेक घळसासी, मुख्य समुह संपादक दिलीप पेठे, निवासी संपादक प्रशांत माने यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमासाठी पेठे फुडस्च्या संचालिका सुवर्णा पेठे, अनुजा पेठे, दैनिक तरुण भारतचे संचालक ॲड. चैतन्य पेठे, सीईओ श्रीनिवास बिनगुंडी, मराठवाडा आवृत्ती समन्वयक राजाराम मस्के, वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड, उपसंपादक अजितकुमार संगवे, अमोल व्यवहारे, किरण बनसोडे, यशवंत गुरव, आरती कुसेकर, जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायनी, महेश स्वामी, अक्कलकोट प्रतिनिधी बसवराज बिराजदार आदींची उपस्थिती होती.



## अग्रलेख...

# क्रांतिचक्राचे नवे आवर्तन!

कोणत्याही गरजांची तीव्रता ही प्रगतीची गती निश्चित करत असते. त्यामुळे जसजशी जीवनशैली सुधारत जाईल, प्रगतीच्या पाऊलवाटा रुंदावत जातील आणि जगण्याच्या कक्षा सर्वांगाने विस्तारत जातील, तसतशा गरजा वाढत जाऊन त्या भागविण्याकरिता आवश्यक असलेल्या संसाधनांच्या शोधास गती येईल. म्हणजे, गरजा ही शोधांचीच जननी असतेच, पण प्रगतीच्या वेगासोबत वाढणाऱ्या गरजांची पूर्तता करण्याकरिता शोधाची गती वाढणे गरजेचे असते. गरजा आणि शोध यांच्या गतीचा मेळ जेव्हा बसतो, तेव्हा क्रांतीच्या पाऊलखुणा दिसू लागतात आणि शोधांचा वेग हा गरजांहूनही अधिक झाला की, क्रांतीचे चक्र पूर्ण होऊन प्रगतीची अपेक्षेहूनही पुढच्या टप्प्यांची वाटचाल सुरू होते. माणसाच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण व्हावे, ही मानवी जीवनशैलीतील सर्वाधिक प्राधान्यक्रम असलेली गरज असते आणि तिला भौगोलिक सीमांची बंधने नसतात. जगभर कोठेही मानवी हक्कांचे संरक्षण ही जर सर्वात मोठी आणि महत्त्वाची गरज मानली जात असेल, तर तिच्या संरक्षणाकरिता ज्या काही उपाययोजना किंवा पूर्ततेचे शोध लावले जातील, त्यांची सुरुवात ही एक प्रकारे कोणत्याही क्रांतीच्या सुरुवातीहून कमी नसते. जगभरातील मानवी हक्कांच्या संरक्षणांचे लढे, हक्कांचे संघर्ष आणि हक्काच्या जाणीव जागृतीचे शिक्षण यामध्ये क्रांतीची बीजे रुजू घातली गेल्याचे अनेक दाखले इतिहासात दिसतात. त्यास जाणिवांचे खतपाणी मिळाले की या बीजांना अंकुर फुटून बघता बघता त्या जाणिवा फोफावत जातात. यातून जे काही घडते, ती क्रांतीच असते. भारताच्या ऐतिहासिक व पारंपरिक जीवनशैलीवर असंख्य परकीय आक्रमणे होऊनही येथील हक्कांचे लढे आणि जीवनशैलीचे संस्कार अबाधित राखण्यासाठी येथील जनजीवनाने शेकडो वर्षे केलेले संयमी संघर्ष हीच पुढच्या पारतंत्र्याच्या काळातील राजसत्तेविरोधातील लढ्याची प्रेरणा होते, म्हणूनच त्या लढ्याने राष्ट्रव्यापी रूप धारण केले. हक्कांच्या संरक्षणाच्या जाणिवा हे क्रांतीचे बीज असते, हे इतिहासने केव्हाच स्पष्ट केले असून त्या जाणिवांची पूर्तता झाल्यानंतर जी काही जीवनशैली सामाजिकरीत्या स्वीकारली जाते, ती अधिकाधिक समृद्ध व्हावी याकरिता प्रगतीच्या दिशेने वाटचाल करताना आवश्यक असलेल्या गरजांच्या पूर्ततेच्या उपाययोजना सुरू होतात आणि गरजांच्या तीव्रतेनुसार शोधांची गती वाढते. म्हणूनच क्रांती हे परिवर्तनाचे पहिले पर्व असते, असे म्हणतात. कोणतीच क्रांती जादूची कांडी फिरविल्याप्रमाणे एका क्षणात किंवा अल्पावधीत पूर्ण होत नसते. या परिवर्तनाच्या प्रक्रियेचे एक चक्र असते. त्या चक्राची आवर्तने पूर्ण होण्यास काही काळ जावा लागतो. त्यासाठी प्रतीक्षा करावी लागते. तोपर्यंतच्या काळातील संयम ही क्रांतीच्या यशाची कसोटी असते.

भारताच्या स्वातंत्र्यासाठी, म्हणजे स्वतंत्र जगण्याच्या आणि सांस्कृतिक जीवनशैली अबाधित राखण्याच्या हक्कासाठी सुरू झालेला संघर्ष म्हणजे परकी राजसत्तेच्या विरोधातील स्वातंत्र्यलढा त्यामुळेच दीर्घकाळ चालला आणि त्याच्या संपूर्ण यशाकरिता दीडशे वर्षांची संयमी प्रतीक्षा करावी लागली. या काळात या देशातील समाजव्यवस्थेने संयमाने आपली परंपरा, संस्कृती आणि जीवनशैली जपली, परकी आक्रमणाच्या प्रभावाखाली असूनही आपल्या अस्सल परंपरांमध्ये कोणतीही सांस्कृतिक सरमिसळ होऊ न देण्याची काळजी घेऊन जपलेल्या परंपरांच्या पालख्या जाणीवपूर्वक नव्या पिढीच्या खांद्यावर सोपविल्या, म्हणूनच परकी सत्तेच्या प्रभावातही भारताने आपल्या संस्कृतीला बाधा येऊ दिली नाही. अशी जपणूक हीदेखील एक क्रांतीच म्हणावयास हवी. त्यामुळेच आता परंपरांच्या पालख्या सांभाळणाऱ्या खांद्यांवर नव्या जबाबदाऱ्या येऊन पडल्या आहेत. कारण क्रांती ही कधीही न थांबणारी प्रक्रिया असते. क्रांतीच्या चक्राचे एक आवर्तन पूर्ण झाले की, नव्या चक्राची नवी आवर्तने सुरू व्हावी लागतात आणि क्रांतीच्या प्रक्रियेचे पर्व सुरू राहते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मानवी हक्कांच्या जाणिवांसाठी सुरू झालेल्या संघर्षाचा एक टप्पा पूर्ण झाला आणि क्रांतिचक्राचे पहिले आवर्तन पूर्ण झाले. त्यापुढे आता स्वातंत्र्यानंतरच्या नव्या जीवनशैलीसाठी आणि नव्या जाणिवांना खतपाणी घालण्यासाठी आवश्यक असलेल्या गरजांच्या पूर्ततेचे नवे पर्व सुरू होणे साहजिकच होते. आता त्या पर्वाची सुरुवात झाली आहे. सुदैवाने पूर्वसुरींनी जपलेल्या अस्सल परंपरांची पालखी ज्यांनी त्यावेळी खांद्यावर घेतली होती, त्यांच्याच खांद्यावर आता नव्या क्रांतिचक्रांचे आवर्तन वेगवान करण्याची जबाबदारी असल्याने, नव्या क्रांतीच्या वाटचालीकरिता नव्या वाटा आखण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. भारताच्या दृष्टीने हा एक शुभसंकेत आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काही काळात, परंपरांचे महत्त्व जपण्याच्या प्रयत्नांबाबत राजकीय क्षेत्रात काहीशी उदासीनताच राहिली आणि पाश्चात्त्यांचे अनुकरण हाच सुधारणांचा आणि नव्या जीवनशैलीचा पाया असेल अशी समजूत फोफावत गेली होती. याचा बहुशः प्रतिकूल असाच परिणाम स्पष्टपणे समाजजीवनावर उमटत असला, तरी हा बदल म्हणजेच प्रगती अशा समजुतीदेखील वाढत चालल्या. त्या जाणिवा पुन्हा जाग्या करणे हा क्रांतीच्या नव्या पर्वाचा परवलीचा शब्द ठरला आहे आणि देशाची संस्कृती आणि परंपरा आता नवतेच्या हातात हात घालून भविष्याच्या वाटचालीसाठी सज्ज झाली आहे.

बरोबर ८२ वर्षांपूर्वी, ९ ऑगस्ट १९४२ या दिवशी मुंबईत स्वातंत्र्यलढ्याच्या नव्या क्रांतीचे शिंग फुंकले गेले आणि हक्काच्या जाणिवा घासूनपुसून लख्ख झाल्या. तो कोणा क्रांतीची सुरुवात नव्हती, तर दीडशे वर्षांपूर्वी केव्हा तरी पेरल्या गेलेल्या जाणिवांच्या बीजांना फुटलेले ते धुमारे होते. त्यांना संयमी संघर्षाचे खतपाणी घातले गेले, म्हणून त्या दिवशीच्या या रणशिंगाचा आवाज मुंबईच्या दिशा भेदून देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आणि संयमी प्रतीक्षेचा अपेक्षित परिणाम समोर दिसू लागला. एका अर्थाने, त्या वर्षीचा ९ ऑगस्ट हा क्रांतीच्या अपेक्षापूर्तीचा दिवस ठरला होता. आता त्याला अनेक दशके उलटून गेल्याने, त्या क्रांतिचक्राचे नव्या रूपातील नवे आवर्तन सुरू झाले आहे. ते आवर्तन विकासाचे आहे, प्रगतीचे आहे, आत्मनिर्भरतेचे आहे आणि सामाजिक हक्काच्या जाणिवांना सुरक्षिततेचे कवच देणारे आहे. म्हणूनच या काळात घेतल्या गेलेल्या अनेक निर्णयांची आणि त्यांच्या अंमलबजावणीची वर्णने 'क्रांतिकारी' या एकाच शब्दात केली जातात, तेव्हा उभे जग भारताच्या या यशाला मानवंदना देत असते. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर जेथे आजपर्यंत कोणा मानवी वैज्ञानिकतेच्या पाऊलखुणा उमटल्या नव्हत्या, तेथे भारताचा झेंडा फडकला, हे त्या परिवर्तनकारी क्रांतीचेच एक पाऊल होते. 'क्रांती' या शब्दाचा रूढ अर्थ 'मौलिक परिवर्तन' असा आहे. व्यापक सामाजिक संदर्भात कोणत्याही क्रांतीच्या प्रक्रियेकडे पाहताना, अर्थव्यवस्था, सांस्कृतिक, वैज्ञानिक किंवा सामाजिक परिवर्तनाची प्रक्रियेचे वर्णन 'क्रांती' या शब्दात केले जाते. जुने मोडणे व नवे घडविणे हा क्रांतीचा प्रचलित अर्थ फ्रेंच राज्यक्रांतीनंतर रूढ झाला असला, तरी भारतात उमटू पाहणाऱ्या नव्या क्रांतीच्या पाऊलखुणांना तो सर्वार्थाने मान्य नाही. जुन्याला सोबत घेऊन, जुन्याच्या हातात हात घालून नव्या वाटेवरून चालणे ही क्रांती भारताला अभिप्रेत आहे. तशी वाटचाल देशात सुरू झाली आहे. भारतातील आठ दशकांपूर्वीच्या एका ऐतिहासिक क्रांतिपर्वाची आठवण काढताना नव्या क्रांतिपर्वाच्या वाटचालीची दिशाही स्पष्ट झाली आहे. आर्थिक, सामाजिक, वैज्ञानिक किंवा सांस्कृतिक क्रांतीमध्ये सशस्त्र बंडाची आवश्यकताच नसते. समाजाच्या संयमी समंजसपणातूनच अशा क्रांतीची बीजे रुजत असतात. प्रगती, स्वातंत्र्य व सामाजिक न्याय याबाबत जनतेच्या व नेत्यांच्या मनात जाग्या होणाऱ्या तीव्र जाणिवा ही क्रांतीची सुरुवात असते. 'संयम' ही क्रांतीची पूर्वतयारी असते. भारतीय समाजजीवनाने असा संयम हजारो वर्षे दाखविला आहे, म्हणूनच येथील प्रत्येक क्रांती यशस्वी ठरली आहे. नव्या क्रांतिपर्वात याच वारशाची जपणूक होईल, यात शंका नाही.

## विशेष

संदीप चव्हाण

# पदके नसली तरी...

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंनी लक्षवेधक कामगिरी करत क्रीडाप्रेमींची मने जिंकली. आतापर्यंत अपेक्षित पदके मिळाली नसली तरी आपल्या खेळाडूंनी नवे विक्रम प्रस्थापित केले. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये बरेच काही पहिल्यांदा घडताना दिसते आहे. आजवरच्या कोणत्याही ऑलिम्पिक स्पर्धेत असे घडले नव्हते. म्हणजेच येत्या काळात आपण पदकांना गवसणी घालू शकतो. भारताची आजवरची सर्वोत्तम कामगिरी टोकियो ऑलिम्पिकमध्ये झाली. तिथे नीरज चोप्राच्या एका सुवर्णपदकासह भारताने एकूण सात पदके जिंकली होती. आपले खेळाडू ऑलिम्पिक पदकाला जणू स्पर्श करून आले. बॅडमिंटनमध्ये लक्ष्य सेन आणि तिरंदाजीत धीरज व अंकिताच्या मिश्र जोडीने ऑलिम्पिकमध्ये पहिल्यांदाच उपांत्य फेरी गाठली. नेमबाजीत दोन कांस्य पदके जिंकणाऱ्या मनू भाकरला ऐतिहासिक तिसरे पदक जिंकण्यासाठी फक्त एक शॉट कमी पडला. नेमबाजीच्या इतर दोन प्रकारांमध्ये भारतीय खेळाडू चौथ्या क्रमांकावर राहिले.

पदकतालिकेत भारत टोकियो ऑलिम्पिकपेक्षा काहीसा मागे राहिला असला तरी आपल्या खेळाडूंनी मैदानात जिगरबाज कामगिरीचे दर्शन घडवले आणि घडवत आहेत. भारतात आता कुठे क्रीडासंस्कृती रुजते आहे. ललिता बाबर, अविनाश साबळे हे खेळाडू धावण्याच्या स्पर्धांकडे का वळले तर गावाकडे लहाणपणी त्यांच्या शाळा सहा ते सात किलोमीटर दूर असायच्या. शाळेला उशीर होऊ नये म्हणून शेताच्या बांधावरून उड्या मारत जाणाऱ्या या मुलांमध्ये धावणे ही गरिबीची गरज होती. त्यातून पुढे हे दोघेही अडथळ्यांच्या शर्यतीत नावारूपाला आले आणि ऑलिम्पिकच्या अंतिम फेरीपर्यंत धडकले.

भारताचा युवा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन ऑलिम्पिकमध्ये पुरुषांच्या एकेरी स्पर्धेत उपांत्य फेरीत पोहोचणारा पहिलाच भारतीय ठरला. मात्र कांस्य पदकाच्या लढतीत त्याला पराभवाला सामोरे जावे लागले. लक्ष्यने पॅरिस ऑलिम्पिकची सुरुवात धडाक्यात केली होती. त्याने तीन साखळी सामने दोन गेममध्येच जिंकले. उपउपांत्यपूर्व (प्री क्वॉर्टर फायनल) सामनाही दोन गेममध्येच खिशात घातला. सातत्यपूर्ण कामगिरीचा नजराणा पेश करत त्याने उपांत्य फेरीत धडक मारली. लक्ष्यचे ध्येय ठरलेले होते. त्याला पदक पटकवायचे होते. कांस्य पदकाच्या लढतीत लक्ष्यसमोर मलेशियाच्या ली झी जियाचे आव्हान होते. पहिला गेम लक्ष्यने जिंकलाही होता. दुसऱ्या गेममध्येही तो आघाडीवर होता. मात्र, त्यानंतर त्याच्या उजव्या हाताच्या कोपराला झालेल्या दुखापतीने उचल खाल्ली. हातातून रक्त ओघळायला लागले. पण लक्ष्य थांबत नव्हता. सामन्यावर लक्ष केंद्रित करत होता. लक्ष्य हरला पण त्याने कोट्यवधी चाहत्यांची मने जिंकली. अवघ्या २२ वर्षांच्या लक्ष्यने बॅडमिंटन विश्वावर आपली छाप सोडली आहे. भारताची कुस्तीपटू विनेश फोगाट आयुष्यातली अनेक आव्हाने पार करत पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत दाखल झाली. अशी कामगिरी करणारी ती भारताची पहिलीच महिला कुस्तीपटू. विनेशचा जोश, आत्मविश्वास आणि आवेश पाहता ती सुवर्णपदक जिंकणार, असा विश्वास तमाम भारतीयांना वाटत होता. सगळे कसे अगदी मनाप्रमाणे घडत होते. मात्र, दुर्दैवाचा फेरा आला. वजन १०० ग्रॅम जास्त भरल्याने विनेशला अपात्र ठरवण्यात आले आणि एक स्वप्न पूर्ण होण्याआधीच भंगले. अचानक बसलेल्या या धक्क्यातून सावरायला विनेश आणि सुवर्णपदकाकडे डोळे लावून बसलेल्या कोट्यवधी भारतीयांना नक्कीच वेळ लागेल. खूब लडी मर्दानी असेच विनेशच्या बाबतीत म्हणावे लागेल. विनेश अपात्र ठरली असली तरी कुस्तीच्या ५० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत धडक मारताना तिने सर्वोत्तम कामगिरी बजावली. विनेश एकाच दिवसात तीन सामने खेळली. या तिन्ही सामन्यांमध्ये तिने प्रतिस्पर्ध्यांना अक्षरशः लोळवले. हीच विनेश २०१६ च्या रिओ ऑलिम्पिकमध्ये सामन्यातून रडत बाहेर पडली होती. याच विनेशला एकेकाळी डॉक्टरांनी कुस्ती सोडण्याचा सल्ला दिला होता. मात्र, तिने कधीही हार मानली नाही. उपउपांत्यपूर्व फेरीत तिने जगातली पहिल्या क्रमांकाची पैलवान आणि टोकियो ऑलिम्पिकची सुवर्णपदक विजेती युई सुसाकीवर मात केली. मात्र अंतिम फेरीच्या आधीच विनेश अपात्र ठरल्याची बातमी आली आणि भारताचे हक्काचे पदक हिरावले गेले. लढाऊ बाण्याची विनेश यातूनही स्वतःला सावरेल, असा विश्वास तिच्या चाहत्यांना वाटत आहे.

तिकडे भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्राने भालाफेकीच्या पात्रता फेरीत कमाल केली. तो पहिल्याच प्रयत्नात अंतिम फेरीसाठी पात्र ठरला. 'बस एक ही काफी है' म्हणत त्याने ८९.३४ मीटर लांब भाला फेकला. नीरजशिवाय अन्य कोणत्याही ॲथ्लेटला पात्रता फेरीत ८९ मीटर थ्रो करता आला नाही. हा या हंगामातला नीरजचा सर्वोत्तम थ्रो ठरला. नीरजचा प्रमुख प्रतिस्पर्धी असणाऱ्या पाकिस्तानच्या अशरद नदीमनेही अंतिम फेरीत स्थान पटकावले. त्याने ८६.५९ मीटर लांब भाला फेकला. मात्र तो नीरजच्या जवळपास पोहचू शकला नाही. नीरजच या फेरीचा खरा हिरो ठरला. दरम्यान, नीरजच्या या जबरदस्त कामगिरीची दखल ऑलिम्पिक समितीलाही घ्यावी लागली. त्याच्या भन्नाट थ्रोनंतर ऑलिम्पिकच्या अधिकृत एक्स हँडलवर ६ ऑगस्ट २०२४ हा दिवस 'नीरज चोप्रा दिवस' म्हणून जाहीर करण्यात आला. नीरज चोप्रासाठी हा बहुमानच म्हटला पाहिजे.

भारतीय हॉकी संघ सुवर्णपदकाच्या स्पर्धेतून बाहेर पडला. जर्मनीविरुद्ध झालेल्या अत्यंत चुरशीच्या उपांत्य सामन्यात भारताला ३-२ ने पराभवाला सामोरे जावे लागले. अखेरच्या क्वार्टरमध्ये दोन्ही संघ २-२ ने बरोबरीत होते. मात्र अखेरची काही मिनिटं उरलेली असताना जर्मनीने मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरचे सोने केले आणि एक गोल करत भारताला मागे टाकले. भारतीय हॉकी संघाला अंतिम फेरी गाठता आली नसली, तरी त्यांनी प्रत्येक सामन्यात लढाऊ बाणा दाखवला. सर्वच खेळाडूंनी भारतीय हॉकीला पुन्हा एकदा त्या सुवर्णयुगाकडे नेण्याचा मनापासून प्रयत्न केला. मात्र, त्यांचे प्रयत्न थोडे थिटे पडले. उपांत्य फेरीचा सामना गाठू न शकल्याचे दुःख प्रत्येक भारतीय हॉकीपटूच्या चेहऱ्यावर होते. भारताचा कर्णधार हरमनप्रीत असो किंवा गोलकीपर श्रीजेश असो, प्रत्येकानेच या ऑलिम्पिकमध्ये मैदानावर सर्वस्व पणाला लावले. श्रीजेशने अनेक गोल रोखले. ब्रिटनविरुद्धच्या उपांत्यपूर्व फेरीत भारतीय हॉकी संघ दहा खेळाडूंनिशी खेळला. मात्र या दहा जणांनी 'दस का दम' दाखवला. त्याआधी साखळी सामन्यांमध्येही भारताने दमदार कामगिरी केली. संघाने न्यूझीलंड, आयर्लंड आणि ऑस्ट्रेलियाला मात दिली. ऑस्ट्रेलियावर तर तब्बल ५२ वर्षांनी विजय मिळवला. याआधी १९७२ मध्ये भारतीय हॉकी संघाने ऑस्ट्रेलियाला हरवले होते. भारतीय हॉकी संघ अंतिम फेरीत पोहचू शकला नसला तरी सर्वच खेळाडूंनी केलेली कामगिरी निश्चितच कौतुकास्पद आहे.

## वेध

संजय रामगिरवार

# 'सराय'च्या संवर्धनाची आशा बळावली!

ऐतिहासिक महत्त्व असलेली चंद्रपुरातील 'सराय' वाचविण्यासाठी चळवळीच्या कार्यकर्त्यांचा लढा सुरूच आहे. शासन-प्रशासन लक्ष देत नसल्याने त्यांनी न्यायालयाचे दार ठोठावले असून नुकत्याच झालेल्या सुनावणीतून 'सराय'च्या संवर्धनाची थोडी आशा बळावली आहे. या इमारतीचा पाया मजबूत असल्याचा अहवाल पुरातत्त्व विभागाने दिला आहे. 'ओल्ड सराय बिल्डिंग'चे संवर्धन केले जाऊ शकते का, अशी विचारणा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने केली आहे.

१०० वर्षांहून अधिकचे आयुष्य असलेल्या या वास्तूची देखभाल न झाल्याने ती जर्जर स्थितीत आहे. डागडुजी करून ती जपली जावी म्हणून उपोषण, आंदोलन सारे काही झाले; पण कुणालाच शहराच्या अगदी मध्यभागी असलेल्या या ऐतिहासिक वारस्याकडे लक्ष द्यायला वेळ नसल्याने ती दुर्लक्षितच राहिली. असे म्हटले जाते, इतिहास विसरून भविष्याकडे केलेली वाटचाल मोठी अवघड असते. कुठल्याही शहरात एकतरी अशी वास्तू असते जी आपल्याला आपल्या भूतकाळाची आठवण करून देत असते. बहुतांश, तो त्या नगराचा गौरवशाली इतिहास असतो. गावातले चार-दोन लोकं अशा वास्तूच्या जतनासाठी शासन व प्रशासनाशी भांडतात. पण त्यांना ना जनतेची साथ असते, ना पुढाऱ्यांची! 'क्यू गडे मुडदे उखाडते हो' असे काहीसे ऐकावे लागते. असाच एक संघर्ष चंद्रपुरात गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे.



'सराय' नावाच्या या वास्तूने अनेक स्थित्यंतरे बघितली. एकेकाळी परम वैभव बघितले तर आता स्वतःला कसेबसे उभे ठेवण्याचा संघर्षही ही इमारत बघत आहे. गेल्या तीन वर्षांपूर्वी या वास्तूच्या जतनासाठी संघटित प्रयत्न झाले. आंदोलने झाली. त्यामुळे आश्वासनांची जोरदार बरसातही झाली. पण त्या पावसात या इमारतीचे छत तेवढे कोसळले. बाकी काही झाले नाही. शेवटी न्यायालयात जनहित याचिका दाखल करावी लागली. न्यायालयाने महाराष्ट्र राज्याच्या शहरी विकास विभागाचे मुख्य सचिव, पर्यटन व सांस्कृतिक मंत्रालयाचे उपसचिव, पुरातत्त्व व संग्रहालय विभागाचे संचालक आणि चंद्रपूर महानगर पालिकेचे आयुक्त यांना याबाबत विचारणा केली.

'सराय'च्या जतनाची कहाणी केवळ प्रातिनिधिक स्वरूपाची आहे. अशा अनेक वास्तू विदर्भात कुठल्या तरी जनहित याचिकेची वाट पाहात आहेत. कारण, त्या शहरांतून अशा वास्तूंच्या जतनाचे सारे प्रयत्न गळून पडले असतील. वैनगंगेतीरी वसलेल्या आणि विदर्भाची काशी म्हणून ओळख असलेल्या आठव्या शतकातील 'मार्कंडा' मंदिराच्या जतनासाठीही खूप प्रयत्न करावे लागले. अजूनही तिकडे मोठ्या विकासाची अपेक्षा आहे. त्याच जिल्ह्यातील धानोरा तालुक्याचा भोवरागड किल्ला, चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूरचा गोंडकालीन किल्ला, नागपूर जिल्ह्यातील भिवापूरची पुरातन पायविहीर, भंडारा जिल्ह्यातील कैसर ए हिंद दरवाजा, ऐतिहासिक पांडे महाल, गिरजा पार्वती गुंफा, यवतमाळ जिल्ह्यातील ढाकणीची बारव, लाडखेड येथील दक्षेश्वर मंदिर, रंगनाथ स्वामी मंदिर, बुलढाणा जिल्ह्यातील चिखलीची गडी, चिंचखेड येथील शिव मंदिर, चिंचपूर-खामगावच्या दोन पुरातन बारव, अकोला जिल्ह्यातील बाळापूरचा किल्ला, सांगोळा येथील दशानंद रावण मूर्ती तर मनसरचे स्तूप आणि चैत्यगृहे, गोंदिया जिल्ह्यातील कामठा किल्ला अशी विदर्भातील कितीतरी ऐतिहासिक ठिकाणे आहेत, जी जपली गेली पाहिजे. पण एकदा का अशा वास्तूंना पुरातत्त्व विभागाची मोहर लागली की, मग त्या वास्तू दुर्लक्षित होतात. पुरातत्त्व विभागाच्या कायद्यामुळे लोकांना वाटले तरी ते काही करू शकत नाही आणि विभाग पाहिजे तसे लक्ष देत नाही.

चंद्रपूर महानगराभोवतीचे गोंडकालीन परकोट आणि त्यातील बुरूजही असेच ढासळले गेले होते. शेवटी ईको-प्रोचे बंडू धोतरे यांच्या प्रयत्नांनी त्याची स्वच्छता आणि डागडुजीची परवानगी मिळाली आणि स्वयंसेवकांकडून ते काम निःशुल्क केले गेले. आज या परकोटाच्या भिंतीवरून 'हेरिटेज वॉक' केले जाते. त्याची दखल खुद्द देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या 'मन की बात'मधून घेतली आणि कामाचे खूप कौतूक केले. पण हा अपवाद आहे. प्रत्येक गावात असे स्वयंसेवी कार्यकर्ते उभे राहणे ही सुद्धा काळाची गरज आहे.

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

मोरेश्वर बडगे

# उद्धव ठाकरे बनले पवारांच्या गळ्यातले हाडूक!

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक दोन महिन्यांवर आली आहे. महाविकास आघाडी यावेळीही ही निवडणूक हिरीरीने लढवू पाहते आहे. दोन महिन्यांपूर्वीच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला तडाखा बसला. त्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांना स्वप्नातही मंत्रालयाचा सहावा मजला दिसतो आहे. सत्ता मिळवायची तर जास्तीत जास्त जागा लढवायला हव्यात. त्यामुळे जागावाटपाची भांडणे सुरू झाली आहेत. उद्धव ठाकरेंनी तर उमेदवार जाहीर करायलाही सुरुवात केली आहे. लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांनी हेच दबावतंत्र वापरले होते. सांगली ही काँग्रेसची परंपरागत जागा. तिथे ठाकरेंनी परस्पर चंद्रहार पाटील या पैलवानाला उमेदवार म्हणून जाहीर केले होते. वसंतदादांच्या नातवाच्या हातून तो हरला, तो भाग वेगळा. पण लोकसभेच्या वेळी केलेली दादागिरी उद्धव यावेळीही दाखवू पाहत आहेत. गेल्या निवडणुकीत शरद पवार आणि त्यांचा पुतण्या अजित पवार हे दोघेही बारामतीत अडकले होते. एका पवारांची मुलगी उभी होती तर दुसऱ्या पवाराने आपल्या पत्नीला उमेदवारी दिली होती. दोघेही बारामतीत गुंतल्याने उद्धव ठाकरे यांना बऱ्याच जागी प्रचारासाठी फिरायला मिळाले. आपणच महाआघाडीचा मुख्य चेहरा अशा थाटात उद्धव फिरले. एकूण ४८ जागांपैकी ३० जागा महाविकास आघाडीने जिंकल्या. महायुतीला केवळ १७ जागांवर समाधान मानावे लागले. भाजपाने आपले सरकार पाडले म्हणून आपल्याबद्दल जनतेमध्ये सहानुभूती आहे, असा प्रचार ठाकरे कंपूने चालवला आहे. उद्धव यांच्याबद्दल सहानुभूती असती तर त्यांना चांगल्या जागा मिळाल्या असत्या. मात्र, आधी २१ जागा जिंकूनही यंदा उद्धव केवळ ९ जागा जिंकू शकले. आता ठाकरे सेनेने १२५ जागांवर दावा ठोकला आहे. मात्र त्यापेक्षा तर शरद पवार यांचा स्ट्राईक रेट चांगला आहे. शरद पवार यांच्या पक्षाने १० जागा लढवल्या आणि ८ जागा जिंकल्या. त्यामुळेही शरद पवारांच्या तोंडाला आता पाणी सुटले आहे. आघाडीत एकी राहावी म्हणून आपण कमी जागा घेतल्या, असा त्यागमूर्तीचा बहाणा पवारांनी पुढे केला. ते खरे नाही. महाआघाडी मार खाईल असेच पवारांना वाटत होते. आता मात्र शरद पवार जास्त जागा मागत आहेत. महाविकास आघाडीचे जागावाटप ठरायचे असताना पवारांनी लढायच्या २५ जागाही जाहीर केल्या आहेत. लोकसभेत सर्वाधिक जागा मिळाल्याने काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले सध्या जोशात आहेत. काँग्रेसने १३० जागांवर दावा सांगितला आहे. काँग्रेसला १३० जागा दिल्या तर पवार-ठाकरे यांच्यासाठी ८०-८० जागा उरतात. तिघांनीही हट्ट सोडला तरच यावेळी आघाडी शक्य आहे. मात्र आघाडी होईल. कारण सध्या जे सुरू आहे ते दबावतंत्र आहे, हे तिघांनाही चांगले ठाऊक आहे.



शरद पवारांनी भाजपाला रोखण्यासाठी उद्धव ठाकरेंना फोडले, मुख्यमंत्री केले. मात्र आता उद्धव ठाकरे शरद पवारांच्या गळ्यातले हाडूक बनले आहेत. गिळताही येत नाही आणि ओकताही येत नाही. विधानसभेची निवडणूक चेहरा घेऊनच लढावी लागेल, असे उद्धव यांचे हनुमान खासदार संजय राऊत यांनी मागे जाहीर करून महाआघाडीमध्ये खळबळ उडवून दिली. निवडणुका सामूहिक नेतृत्वात लढायच्या असे मागेच महाआघाडीमध्ये ठरले आहे. मग आता कशाचा पत्ता नसताना ठाकरे सेना 'चेहऱ्या'ची भाषा करू लागल्याने शरद पवार अस्वस्थ आहेत. पवारांनी लगेच खुलासा केला. 'लोकसभेत चेहरा नव्हता. मग आता चेहऱ्याची गरजच काय?' असा प्रश्न पवारांनी केला. महाआघाडी सामूहिक नेतृत्वात लढेल, असेही त्यांनी जाहीर केले. 'उद्धव ठाकरे मुख्यमंत्री म्हणून मंजूर नाही,' असा शरद पवार यांच्या या वक्तव्याचा अर्थ आहे. ठाकरे मात्र जणू मुख्यमंत्री झालो अशा थाटात दणकून सभा ठोकत आहेत. त्यांचा तीन दिवसांचा दिल्ली दौरा हा याच रणनीतीचा भाग आहे. एकेकाळी दिल्लीचे नेते सल्ला घेण्यासाठी बाळासाहेबांना भेटायला मातोश्रीवर येत होते. आज ठाकरे यांना दिल्लीच्या सहकुटुंब चकरा माराव्या लागत आहेत. मोदींना आपण महाराष्ट्रात कसे रोखले ते तिखटमीठ लावून सोनिया आणि राहुलबाबांना सांगितले जाईल. पण सोनिया कच्च्या लिंबू नाहीत. महाराष्ट्रासारखे महत्त्वाचे राज्य हातात येत असेल तर त्या सोडणार नाहीत. मात्र, उद्धव ठाकरेंचा कावा राहुल गांधींच्या लक्षात आला असणार. राहुल आता पूर्वीचे पप्पू राहिले नाहीत. सत्तेचे महत्त्व राहुलबाबाला चांगले कळले आहे. महाराष्ट्रासह झारखंड, हरयाणा अशा एकूण तीन राज्यांत विधानसभेच्या निवडणूक व्हायच्या आहेत. लोकसभेनंतरच्या या पहिल्याच निवडणुका असल्याने राहुल प्रत्येक राज्य जिंकण्याचा प्रयत्न करतील. उद्धव तर १२५ जागांची स्वप्नं पाहत आहेत. त्यांना तेवढ्या जागा दिल्या तर काँग्रेसही तेवढ्याच जागा ठेवेल. मग शरद पवारांसाठी खरकटं उरते. मुस्लिम आणि दलित मतं एकगठ्ठा मिळाली म्हणून यावेळी उद्धव थोडी तरी ठाकूरकी दाखवू शकले. उद्या काँग्रेस मैदानात असेल तर मुस्लिम मतं राहुलबाबाच्या खिशात जातील. उद्धव यांची शिल्लक सेना २५ देखील जागा जिंकू शकणार नाही. उद्धव आता मुस्लिमांचे नेता झाले आहेत, हे विसरू नका. मुंबई, पुणे, नाशिक या पलीकडे आधीही उद्धव नव्हते. आता तर राज ठाकरे मैदानात उतरल्याने उद्धव ठाकरेंना धक्केच धक्के आहेत. मराठी पट्ट्यातील मराठी भाषिकांची मतं वाटली जातील. त्यात उद्धव यांना जोरदार मार बसणार आहे. तुम्ही लिहून ठेवा. या निवडणुकीत उद्धव सेना संपलेली असेल. शरद पवारांची ही शेवटची आणि म्हणून प्रतिष्ठेची निवडणूक असेल. पवारांची काँग्रेस असो किंवा राहुल गांधींची, दोन्ही काँग्रेस आहेत. मात्र, अस्तित्वाच्या लढाईमध्ये मोठ्या बंडखोऱ्या होतील, दोन्ही काँग्रेसची मतं वाटली जातील. मुस्लिम आणि दलित मतदार दोन काँग्रेसमध्ये वाटला जाईल. या धुमश्चक्रीत ठाकरे फेकले जातील. निवडणुकीला अजून दोन महिने आहेत. ऑक्टोबरची हवा काही वेगळी असेल. माणूस जिंकणाऱ्या घोड्यावर पैसे लावतो. महायुती यावेळी जिंकणारा घोडा आहे. आपलं मत वाया जावं असं कोणालाही वाटणार नाही. महायुतीची लाडकी बहीण योजना सत्तेचा मंगल कलश महायुतीच्या हाती देईल. लिहून ठेवा. यावेळी महिलांची ८० टक्के मतं महायुतीला पडतील.

आता प्रश्न आहे महाआघाडीच्या या यादवीत महायुती कुठे असेल? लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुका यावेळी महायुतीने दुरुस्त केल्या आहेत. लोकसभेत महाआघाडीने चुकीचा प्रचार करून लोकांची मतं खाल्ली. घटना बदलवण्यासाठी मोदींना ४०० जागा हव्या आहेत, या चुकीच्या नॅरेटिव्हने महायुतीचे मोठे नुकसान झाले. मोदी जिंकणारच या खात्रीने अनेक मतदार गाफील राहिले. लोक यावेळी चुकीच्या प्रचाराला बळी पडणार नाहीत. एवढ्या दुष्प्रचारानंतरही लोकांनी मोदींना २४० जागा दिल्या. मित्रपक्षांना घेऊन मोदींनी जुगाड जमवलेच. महाआघाडीमध्ये सत्तास्पर्धा दिसते तशी कुठलीही स्पर्धा महायुतीत दिसत नाही, हे तुमच्या लक्षात आले असेल. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार जिद्दीने भिडले आहेत. आता जनतेनेच निकाल हाती घेतला आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### जनाची नाही तर मनाची...

बांगलादेशात झालेल्या हिंसाचारानंतर शेख हसीना यांनी आपल्या पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्या भारतात आल्या आहेत. यावर शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी प्रतिक्रिया देताना लोकशाहीची जपमाळ ओढत शेख हसीना यांनी हुकूमशाही पद्धतीने देश चालवला; त्याचा काय परिणाम झाला, याचं भारतातल्या सध्याच्या राजकीय नेत्यांनी चिंतन केलं पाहिजे, अशी प्रतिक्रिया व गर्भित इशारा केंद्र सरकारला म्हणजे एक प्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदींना दिला आहे. एकेकाळी हिंदुत्व म्हणजे शिवसेना असे म्हटले जात असे. आज बांगलादेशात हिंदू मंदिरांवर, तेथील हिंदू लोकांच्या घरांवर सातत्याने हल्ले केले जात असताना हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या सुपुत्राच्या पक्षाचा प्रवक्ता एवढ्या मोठ्या घटनेवर साधी प्रतिक्रिया देत नाही, याचे आश्चर्य वाटते. एकेकाळी मुस्लिमांवर टीका करणारे शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे प्रवक्ते संजय राऊत, मुस्लिम किंवा अन्य धर्मीयांविषयी बोलण्याचे धाडस करताना दिसत नाहीत; उलट हिंदू धर्माविषयी ते प्रवचन देतात. हिंदू नेत्यांनाच लक्ष्य करतात. आज देशातील विरोधी पक्ष सत्तेसाठी, मतांसाठी कोणत्या स्तरावर जातो आहे, याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे बांगलादेशात जी राजकीय उलथापालथ झाली, त्यावरील यांच्या प्रतिक्रिया पाहिली तर आपल्या लक्षात येईल... यापेक्षा या देशाचे दुर्भाग्य कोणते असू शकते.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

● ● ● ●

### लोकशाहीचे रक्षण झालेच पाहिजे

विरोधी पक्षाची भूमिका ही एक चिंतनशील विषय बनत चालली आहे. विरोधक खरे म्हणजे लोकशाहीचे रक्षण करणारे, देशात उत्तम प्रशासन असावे म्हणून नेहमीच जबाबदारीने लक्ष देणारे असावे, असे समजले जाते. पण आज विरोधी पक्षाची मनोवृत्ती लक्ष खुर्ची-सत्ता याकडेच आहे. विरोधी पक्षाचे नेते वैयक्तिक बदनामी करून सत्ताधारी पक्षावर टीका करीत आहेत. राजकारणात एक तर मी राहील किंवा तो अशी गुंडप्रवृत्तीची भाषा बोलू लागले आहेत. आपणच आपल्या भारताची बदनामी करत आहोत. संघाचे नाव, सरसंघचालकांचे नाव लोकसभेत घेत आहेत. संघ ही देशव्यापी, देशप्रेमी संघटना आहे. देशहित हेच संघाचे ध्येय आहे. विरोधी पक्षांना हे कसे कळेल? विरोधी पक्षांनी लोकशाहीची जाण ठेवून लोकशाहीचे रक्षण केले पाहिजे.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

● ● ● ●

## वाचक पत्रे

### स्त्री खेळाडूला ऐनवेळी बाद करणे अयोग्य

पॅरिसमधील ऑलिम्पिकमधून विनेश फोगट या ५० किलो गटातील कुस्ती स्पर्धेतील स्त्री खेळाडूला बाद करण्यात आले. शेवटच्या डावात अशाप्रकारे एखाद्या देशातील खेळाडूला बाद करणे, ही अत्यंत चुकीची आणि खेळाडूंबरोबरच भारतातील क्रीडाप्रेमींवर अन्याय करणारी घटना आहे. सुरुवातीलाच निवड करताना वजन घेतले जाते. अशा परिस्थितीत हेतुपूर्वक पुन्हा वजन घेऊन खेळाडूला बाद करणे हे संशयास्पद वाटते. जागतिक स्तरावरील या क्रीडा स्पर्धेवर पाश्चिमात्य देशांचे वर्चस्व आहे, असे निदर्शनास येते. यामुळेच असे हेतुपूर्वक केले जाते. भारत सरकारने या घटनेचा तीव्र निषेध नोंदविला पाहिजे.

**ॲड. बळवंत रानडे**/९८८१४७३५८०

● ● ● ●

### योग्य न्याय मिळावा!

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत ५० किलो वजन गटात भारतीय महिला कुस्तीगीर विनेश फोगट ही निश्चितच रेकॉर्ड ब्रेक सुवर्ण किंवा किमान रौप्य पदकाची दावेदार होती. परंतु, ऑलिम्पिक आयोजकांनी विनेशला वजन मोजमाप करताना केवळ १०० ग्रॅम वजन जास्त भरले म्हणून संपूर्ण स्पर्धेतूनच अपात्र ठरवून बाद केले. ऑलिम्पिक स्पर्धेत विनेश फोगट आता कोणत्याही पदकांची दावेदार नाही, असा एकतर्फी निर्णय आयोजकांनी दिलेला आहे. ऑलिम्पिक स्पर्धेत वजन मोजमाप करण्याआधी एक ग्लास पाणी जरी पिले तरी वाढू शकते. म्हणजे खेळाडूंनी खाणे पिणे बंद करावे काय? परंतु नियम म्हणजे नियम; ज्याची कल्पना सर्व स्पर्धकांना असते. नियमांचे तंतोतंत पालन करणे, हेही आवश्यक आहे. एकतर अगदी तंतोतंत काठावरील वजन असणाऱ्या (५०किलो किंवा त्यापेक्षा थोडे जास्त) स्पर्धकाने स्पर्धेत उतरूच नव्हे. उतरले तर वजन न वाढावे म्हणून खूप काळजी घेणे आवश्यक आहे. येथे भारतीय महिला कुस्तीगीर विनेश फोगटची चूक असेल तरीही ती एकदम मामुली आहे. एकदम ५० किलोवरून ५१ किलो तर वजन झाले नाही. ऑलिम्पिक आयोजकांनी वजनाबाबत एवढे काटेकोर राहू नये. यामुळे खेळाडूंवर विपरीत परिणाम होऊन निराशा निर्माण होऊ शकते. येथे सर्वात मोठी चूक खेळाडूंचे कोच मार्गदर्शक व सहायक स्टाफ यांचीदेखील आहे. त्यांनी खेळाडूकडे सातत्याने आवर्जून लक्ष ठेवायलाच पाहिजे. त्यांचे ते दायित्व आहे. विनेशची अपात्रता अतिशय धक्कादायक आहे. या स्पर्धेकरिता कुस्तीगीर विनेश फोगटनी केलेली तयारी व कठोर परिश्रम लक्षात घेता तिला योग्य न्याय मिळावा हीच अपेक्षा. विनेश ही सुवर्ण पदकाची मानकरी असल्यामुळे कठोर निणर्याचा पुनर्विचार करून तिला स्पर्धेतून बाद करू नये.

**किशोर पोहेकर**/नागपूर

## संक्षिप्त वृत्त



### नुमवि शिशु शाळेत नागपंचमीचा सण उत्साहात

**सोलापूर, दि.८ ऑगस्ट-**

नुमवि शिशु शाळेत नागपंचमीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मोठा गट रागेश्रीच्या पालिका सुवर्णा मैंदर्गीकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी व प्रमुख पाहुणे यांनी नागोबाचे व प्रतिकृती तयार केलेल्या वारुळाचे पूजन केले. मुख्याध्यापिका यांनी श्रावण महिन्यात येणाऱ्या सणांची मांदियाळी सांगितली. तसेच पंचमीच्या सणाचे महत्त्वही सांगितले. त्यानंतर छोट्या मोठ्या गटातील विद्यार्थिनी मुख्याध्यापिका व प्रमुख पाहुणे मैंदर्गीकर सर्व शिक्षिका, सेविकांनी गाणी म्हणत फेर धरला. झिम्मा-फुगड्या असे पारंपारिक खेळ खेळण्यात आले. यावेळी मोठा गट रागेश्रीतील विद्यार्थी युवराज रेड्डी याने गारुड्याची भूमिका छान पार पाडली. सूत्रसंचालन व आभार अनिता जाधव यांनी केले.

### माजी आ. दिलीप माने यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या मॅरेथॉन स्पर्धा

**सोलापूर, दि.८ ऑगस्ट-**

माजी आ. दिलीप माने यांच्या वाढदिवसानिमित्त यावर्षीही गौरव समितीच्या वतीने दि. १० ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ७ वाजता भंडारी मैदान, जुळे सोलापूर येथे मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले आहे, अशी माहिती प्रकाश काशीद यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यामध्ये १० वर्षे मुले-मुली, १४ वर्षे मुले-मुली, १७ वर्षे मुले-मुली असे एकूण ६ गटात ही स्पर्धा होणार आहे तर प्रत्येक गटनिहाय स्वतंत्र रोख बक्षीस व ट्रॉफी दिली जाणार आहे. सर्व गटासाठी प्रथम क्रमांक ११ हजार रुपये आणि ट्रॉफी, द्वितीय क्रमांक सात हजार रुपये आणि ट्रॉफी, तृतीय क्रमांक पाच हजार रुपये आणि ट्रॉफी, उत्तेजनार्थ दोन हजार रुपये असे बक्षिसाचे स्वरूप आहे. या मॅरेथॉन स्पर्धेत आतापर्यंत ५ हजार ८०० प्रवेशिका आलेल्या आहेत. आणखी २ हजार प्रवेशिका येतील. ही स्पर्धा नियोजनबध्द करण्यासाठी १०० रोड स्वयंसेवक, ४० रायडर व ६५ पंचाची नेमणुक केली आहे. तसेच अॅम्ब्युलन्स, पिण्याचे पाण्याची सोय केली आहे. या मॅरेथॉन स्पर्धेत खेळाडूंनी सहभागी व्हावे. स्पर्धा पाहण्यासाठी क्रीडा रसिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन गौरव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस संजय घोडके, राजेंद्र लामकाने, निलेश बाबर आदी उपस्थित होते.



### तेलुगु भाषा अभिवृद्धी ग्रंथालयातर्फे उद्योजक राम रेड्डी यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

तेलुगू भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालय व एन.टी.आर. अभिमान संगम यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूरचे सुप्रसिध्द उद्योजक डी. रामरेड्डी, एम.डी. बालाजी अमाईन्स यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे त्यांना जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याने संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम, जिल्हा यंत्रमागधारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, उपाध्यक्ष श्रीनिवास गाली, तसेच तिप्पण्णा गणेरी, सचिव, सहसचिव प्रभाकर भिमनाथ, श्रीनिवास यनगंदूल उपस्थित होते.

# विधी शाखेच्या विद्यार्थ्यांचे निकाल प्रलंबित

## सामाजिक कार्यकर्ते अॅड. अनिल वासम यांचा आंदोलन छेडण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ऑगस्ट-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संलग्न विधी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचे प्रलंबित निकाल, गुणांचे पुनर्मूल्यांकन, गुणांची पुनर्मोजणी याबाबत प्रचंड गोंधळ आहे. याबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचेकडे महाविद्यालय मार्फत कार्यालयीन पत्रव्यवहार करूनही त्याची दखल घेतली जात नाही. खासगी कंपनी मार्फत उत्तर पत्रिका संगणकीय प्रणाली मार्फत तपासणी केली जाते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥

यामुळे अनेक तांत्रिक त्रुटी निर्माण होत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.तसेच उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिल ची सनद घेण्यासाठी प्रोव्हीजनल सर्टिफिकेट ची अनिवार्यता असून ते ही देण्यास विलंब होत आहे. विद्यापीठाकडून होत असलेल्या कृत्यामुळे विद्यार्थ्यांचे संतुलन बिघडत आहे याला जबाबदार कोण ?असा सवाल सामाजिक कार्यकर्ते अॅड.अनिल वासम यांनी उपस्थित करत तातडीने विद्यार्थांना प्रोव्हीजनल सर्टिफिकेट व प्रलंबित निकाल न दिल्यास त्यांच्या शैक्षणिक



नुकसानीस विद्यापीठ जबाबदार राहील असे सांगून आंदोलनाचा इशारा देण्यात आला. गुरुवार दिनांक ८ ऑगस्ट रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे मा.कुलगुरू यांच्या कार्यालय येथे शिष्टमंडळामार्फत निवेदन देण्यात आले. तदनंतर संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ डॉ.श्रीकांत अंधारे यांच्याशी या विषयी चर्चा करण्यात आले. यावेळी या शिष्टमंडळात ऍड अनिल वासम, शाम आडम, श्रीप्रसाद अंकलगी, द्वारकेश सावळे आदींची उपस्थिती होती.

# शरयु शेळके यांचे सेट परीक्षेत यश

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

शरयु नवनाथ शेळके या गृहिणीने महाराष्ट्र पात्रता परिक्षा म्हणजेच सेट मध्ये घवघवीत यश संपादन केले. छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज मधील शरयु नवनाथ शेळके भिसे यांनी नुकतेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत दि. ७ एप्रिल २०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्र राज्य पात्रता परिक्षा (सेट) मध्ये पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले. सहाय्यक प्राध्यापक पदासाठी ही परिक्षा अत्यावश्यक असल्याने शरयु शेळके भिसे यांनी अत्यंत मेहनत घेवून या परिक्षेची तयारी केली होती. घर आणि प्रपंच सांभाळत तसेच दोन मुलांचा सांभाळ करीत त्यांनी रात्री उशिरा पर्यत अभ्यास केला त्यामध्ये त्यांचे पती नवनाथ रमेश शेळके यांनी त्यांना मोलाची साथ दिली. त्यामुळेच शरयु शेळके या गृहिणीला या सेट परिक्षेत यश मिळाले. त्यांना छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजचे प्राचार्य तसेच प्राध्यापकांनी मार्गर्शन केले.



# पुस्तकापुढे नतमस्तक व्हा, जग तुमच्यापुढे नतमस्तक होईल : केसरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. ८ ऑगस्ट-**

विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या पुढे नतमस्तक न होता, पुस्तकांपुढे नतमस्तक व्हावे, पुस्तकांपुढे नतमस्तक झाला तर, जग तुमच्यापुढे नतमस्तक होईल, असे प्रतिपादन सेंट्रल रेल्वेचे वरिष्ठ तिकीट चेकर रणवीर केसरी यांनी प्रतिपादन केले.




इंग्रजी, गणित व बुद्धिमत्ता योग्यता याबद्दल, न्यूनगंड न बाळगता, मनापासून अभ्यास, तयारी करावी. स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी पुणे, मुंबई किंवा दिल्ली यासारख्या ठिकाणी न जाता, सोलापुरात राहूनच विद्यार्थ्यांनी आपल्या मातृभाषेचा अवलंब करून, स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊ शकता. वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् अँड सायन्स आणि हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स यांच्या संयुक्त विद्यमाने, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने आयोजित 'स्टाफ सिलेक्शन बँकिंग रेल्वे केंद्रीय व राज्यसेवेतील करिअरच्या संधी' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन वालचंद महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. डॉ. मनोहर जोशी उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर स्पर्धा परीक्षा केंद्राचे समन्वयक डॉ. संगमेश्वर निला, डॉ. नवराज काळदाते, उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी हिराचंद नेमचंद व वालचंद महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. व्याख्यानानंतर श्री केसरी यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे व शंकांचे निरसन केले. उपप्राचार्य डॉ. मनोहर जोशी यांनी देखील स्पर्धा परीक्षेचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्व अधोरेखित करून , तरुणाईने,स्पर्धा परीक्षेद्वारे यश प्राप्त करून विधायक कार्य करून देश सेवा करावी, असे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले. याप्रसंगी, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या विद्यार्थी करियर संसदेची/ कार्यकारिणीची निवड करण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते २०२३-२४ या वर्षातील महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा केंद्रातील यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्रक देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतन तुपकर यांनी केले. डॉ. नवराज काळदाते यांनी आभार मानले.

# प्रेसिडेंट चषक फुटबॉल स्पर्धा गणवेशाचे अनावरण

## गतवर्षीच्या स्पर्धेचे पारितोषिक वितरण उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

जिल्हा फुटबॉल संघटनेच्या प्रेसिडेंट चषक फुटबॉल स्पर्धेच्या गणवेशाचे अनावरण व गतवर्षीच्या जिल्हा फुटबॉल स्पर्धेचा शुभारंभ हॉटेल सिटी पार्क येथील हॉलमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला.




हा कार्यक्रम जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार व जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष महेश गादेकर यांच्या हस्ते झाला. यावेळी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सहा संघाचे प्रायोजक तसेच आयकॉन खेळाडू उपस्थित होते. यावेळी खेलो इंडिया वुमेन्स लीग आयोजनामध्ये स्पर्धेच्या वेळी वैद्यकीय सहकार्य केलेले प्राचार्य डॉ. सुरेश कुमार, डॉ. अनिल काळे, विशाखा जाधव, सायली पवार, लक्ष्मी बोगा, आरती अक्किम, वैष्णवी दुर्गम, श्रवंती पगड्याल, निकिता चाबुकस्वार, प्रशिक्षक डॉ. उज्वल मालजी, आरती मलजी, राफिया लंगोटे, प्रसेनजीत सूर्यवंशी, आनंद लिगाडे, गौरव साळुंखे, राजेंद्र गायकवाड, सनी भोसले यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रंचालन प्रशांत जाधव यांनी केले. प्रस्ताविक प्रा. डॉ. किरण चौगुले यांनी केले. प्रा.डॉ. आनंद चव्हाण यांनी आभार मानले.

**सत्कारमूर्ती संघ(प्रायोजक व ऑयकॉन खेळाडू) :** एसएसआयएस (किरण दुस्तकर, संकेत घोडके), एमएमएस (साई चौगुले, शुभम पवार), एचएमएफसी (सिद्धेश्वर सरवदे, गौरव साळुंखे). रेड युनायटेड (बोस्केय जैन, विनायक हत्ती) स्टार एफसी (विकी गायकवाड, वरुण भंडारी). योद्धा एफसी (प्रशांत जाधव, आदित्य साळवे).

**गतवर्षीचे संघ (विजयी व उपविजयी) :** युथ लीग १३ वर्षे : रायगड फुटबॉल क्लब, सिंहगड फुटबॉल क्लब, १५ वर्षे वर्ष वयोगट : सेंट जोसेफ फुटबॉल क्लब, रायगड फुटबॉल क्लब. खेलो इंडिया वुमेन्स फुटबॉल लीग १३ वर्षे मुली : सेंट जोसेफ फुटबॉल क्लब, सेंट थॉमस फुटबॉल क्लब. प्रेसिंडट चषक वरिष्ठ पुरुष लीग फुटबॉल स्पर्धाः एमएमएस, रेड युनायटेड.

फुटबॉल कोचिंग मध्ये डी. लायन्स परीक्षा उत्तीर्ण : ओंकार मस्के, विजय पंतुवाले, आदित्य साळवे. सी परीक्षा उत्तीर्ण : शुभम पवार, पंकज जाधव.

# गवंडी समाजसेवा संघाचे कार्य प्रेरणादायी : खा. शिंदे

## गवंडी संघातर्फे गुणवंतांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

गवंडी समाजातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनीचा शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांचा गौरव या समाजसेवी संघटनेकडून होत आहे. हे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी केले.




गवंडी सगर गवंडी समाजसेवा संघाच्या वतीने आयोजित विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभात खासदार शिंदे बोलत होत्या. अध्यक्षस्थानी उदगीरचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव सगर हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. श्रीनिवास मेहतने, समाजसेवक संस्थापक एम.के. फौंडेशन सोलापूर महादेव कोंगनुरे, कार्यकारी अभियंता अनिल सगर, समाजाचे अध्यक्ष अनिल हिरशेट्टी, सल्लागार माशाळकर, सुभाष हिरशेट्टी गुरुजी, पांडूरंग चंद्रपाटले, महिलो अध्यक्ष अनुजा बेजरपे उपस्थित होते. याप्रसंगी समाजसेवा संघाचे अध्यक्ष अनिल हिरशेट्टी यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याला स्मृती चिन्ह प्रमाणपत्र, शैक्षणिक साहित्य, आणि फोल्डर फाईल देवून गौरविण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. श्रीनिवास गवंडी, मार्गरेट सगर आणि विजय राकले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धनंजय सगर, मारुती चंद्रपाटले, भारत सगर, सिध्दाराम चंद्रपाटले, अविनाश बेंजरपे, भिमराव अण्णा बेंजरपे, बसवराज समदुर्ले, प्रा.डॉ.अशोक मर्डे, सुदर्शन यन्नल्ले, विजयकुमार चंद्रपाटले, लता यामजले, अॅड. अनुराधा येगडे, लक्ष्मण सगर, किशोर पेंडीले आदींनी परिश्रम घेतले.

जा.क्र./आअ/वै/-312
आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय
दि.08/08/2024

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

**जाहीर प्रसिध्दीकरणाचा मसुदा**

आरोग्य खाते अंतर्गत डी.एस.विभागासाठी जंतुनाशक व किटकनाशक औषध पायथ्रेम 2%EC ची खरेदी करणे **अनुक्रमांक -९३२७**

वर नमूद कामाचे टेंडर सोमनपाच्या www.solapurcorporation.gov.in या वेबसाईटवर पासून दि.07/08/2024 ते दि.13/08/2024 पर्यंत दुपारी 1 वाजेपर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.

**सही/-**
**(डॉ.राखी सुहास माने)**
आरोग्याधिकारी
सोलापूर महानगरपालिका

## निधन वार्ता

### भागीरथीबाई कोटा



**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

दत्तनगर येथील भागीरथीबाई तुकाराम कोटा (वय ८४) यांचे गुरुवार दि. ८ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवार दिनांक ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता राहत्या घरापासून निघणार आहे. कस्तुरबाई बी. एड. कॉलेजचे माजी कर्मचारी विवेकानंद कोटा यांच्या त्या मातोश्री होत.

### नवनाथ कसबे



**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट**

पांडुरंग वस्ती येथील नवनाथ सुरेश कसबे (वय ४४) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात भाऊ, पत्नी, ३ मुले असा परिवार होत. तरुण भारत वसुली विभागातील गणेश कसबे यांचे ते काका होत.

### शरद आडकी



**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

साखरपेठ येथील कुरहिनशेट्टी समाजाचे ज्येष्ठ नागरिक शरद रेवणसिद्ध आडकी (वय ८०) यांचे गुरुवारी निधन झाले आहे. त्यांच्या मागे एक मुलगा अन् एक मुलगी असा परिवार आहे.

**नावात बदल**

माझे जुने नाव **तेहसीन इफ्तेकार सय्यद** असे होते. ते नाव बदलून **तहसीन बानो इफ्तेकार सय्यद** असे झालेले आहे.
पत्ता : ५ विनायक नगर, मजरेवाडी, सोलापूर
Date.- 07/08/2024
Affidavit No.- 1836

**CHANGE IN NAME**

I HERE BY DECLARE THAT MY NAME MENTIONED IN ADHAR CARD, PAN CARD AND ELECTION VOTING CARD IS **KHALIDA ZAMEER AHMED SHAIKH** WHERE AS IN SOME WHERE MY NAME IS **KHALIDA ZAMEER SHAIKH** BOTH ARE SAME AND IT'S MYSELF.
RESIDENT AT PLOT NO 56 B, SAHARA NAGAR 1,NEAR IDEAL SCHOOL SOLAPUR 413003.KINDLY NOTE THE SAME.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

विभागीय भांडार कार्यालय मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित फर्म/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.Ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवतात. निविदा क्रमांक: SUR/Sr.DMM/T.No.96245330, तारीख: 05/08/2024. कामाचे नाव: कास्ट आयर्न स्टॅम्प केलेले चाचणी वजन 50 किलो. प्रत्येक IS:1056-2004 नुसार किंवा नवीनतम (पुरवठादाराने कायदेशीर मेट्रोलॉजिकल विभागाद्वारे जारी केलेल्या कॅलिब्रेशन प्रमाणपत्रासह चाचणी वजनाचा पुरवठा केला पाहिजे). प्रमाण: 2568 क्रमांक www.Ireps.gov.in वर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 26/08/2024 11:30 नंतर. तपशील खठएझड वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुध्दीपत्र/दुरुस्ती जर असेल तर ती फक्त वरील ई-खरेदी वेबसाइटवर अपलोड केली जाईल फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील मॅन्युअल/पोस्टल/ई-मॉल, फॅक्स, हाताने निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांनी कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवावे आणि www.Ireps.gov.in वर नोंदणी करावी. अधिक तपशिलांसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या, फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे पेमेंट ऑफ इमेस्ट मनी (EMD) स्वीकारले जाईल.

DMM/SUR
मध्य रेल्वे, सोलापूर
DE/Sur-034

आपल्या जनावरांना रेल्वे लाइनपासून दूर ठेवा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अधिसूचना**

अधिसूचना क्रमांक **SUR/P/GZ/CMP/2024 दिनांक 06.08.2024** नुसार, कंत्राटी वैद्यकीय व्यवसायी (डॉक्टर), अर्धवेळ लेडी डॉक्टर (सीएमपी) आणि अर्धवेळ दंतवैद्य (सीएमपी) यांना करारावर नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग नमूद केलेल्या ठिकाणांनुसार आवश्यकतेनुसार बाहेर पडेपर्यंत, नमूद केल्यानुसार अटींसह जे आधी असेल ते **-1)** विभागीय रेल्वे रुग्णालय सोलापूर, सोलापूर विभाग, मध्य रेल्वे येथे दोन कंत्राटी वैद्यकीय व्यवसायी (CMPS) नियुक्तीसाठी अधिसूचना. **2)** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागांतर्गत पॉलीक्लिनिक वाडी जंक्शनवर कंत्राटी पद्धतीने वन पार्टटाइम लेडी मेडिकल प्रॅक्टिशनर्स (CMP) च्या नियुक्तीसाठी अधिसूचना. **3)** विभागीय रेल्वे रुग्णालय सोलापूर, सोलापूर विभाग, मध्य रेल्वे येथे एक अर्धवेळ दंतचिकित्सक कॉन्ट्रॅक्ट मेडिकल प्रॅक्टिशनर्स (CMP) च्या नियुक्तीसाठी अधिसूचना. खुल्या बाजारातील इच्छुक उमेदवार / सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी **19.08.2024 पर्यंत 17:00** वाजेपर्यंत अर्ज आणि संबंधित कागदपत्रांसह **ईमेल आयडी: srdposurgmail.com** वर अर्ज करू शकतात. वॉक इन इंटरव्ह्यूची माहिती शॉर्टलिस्ट केलेल्या उमेदवारांना त्यांच्या नोंदणीकृत ईमेल आयडी/मोबाइल नंबरवर कळवली जाईल. **निवडलेल्या उमेदवारांची 20.08.2024 रोजी सकाळी 11:00 वाजल्यापासून वॉक इन मुलाखत घेण्यात येईल.** कृपया प्रकाशित केलेल्या तपशीलवार अधिसूचनेसाठी वेबसाइटला भेट द्या **www.cr.indianrailways.gov.in** आमच्या बद्दल विभाग सोलापूर कार्मिक अधिसूचना.

**मध्य रेल्वेचे वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी, सोलापूर**
DE/Sur-036

धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.




आयुक्त सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# समर्पित सेवक शरणप्पा शाबादे



**दैनिक सोलापूर 'तरुण भारत'मधील सर्वप्रिय सेवक शरणप्पा शाबादे हे अखंड ३८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर गेल्या मे महिन्यात सेवानिवृत्त झाले आहेत, आज शुक्रवार दि. ९ ऑगस्ट रोजी त्यांची एकसष्ठी 'तरुण भारत'च्या आजी-माजी कर्मचारी परिवारातर्फे समारंभपूर्वक साजरी करण्यात येत आहे. काही माजी कर्मचाऱ्यांच्या पुढाकारातून होत असलेल्या कार्यक्रमात आजी-माजी कर्मचाऱ्यांचा स्नेहमेळावा, माजी संपादकांचा सन्मान व शाबादे यांचा सत्कार होत आहे, या कार्यक्रमाच्या त्रिवेणी संगमात माझ्यासारख्या सामान्य व छोट्या कार्यक्रमात अक्षरशः न्हाऊन निघाल्याचा आनंद होत आहे. या कार्यक्रमाचे पौरोहित्य 'तरुण भारत'चे अध्यक्ष, माजी संपादक, ज्येष्ठ निरुपणकार विवेकजी घळसासी यांच्या दिव्य सानिध्यात होणार आहे. अध्यक्षस्थान भूषवतील 'तरुण भारत'चे मुख्य संपादक दिलीपराव पेठे.**

आजच्या धकाधकीच्या जीवानात माणसांचे आयुष्यमान फार कमी होत चालले आहे. माणसाचे सरासरी आयुष्य साठ वर्षांचे गणले जात आहे, जीवनात हे थोडे आयुष्य किती जगला? यापेक्षा कसे जगला? याला महत्व आहे. आपले जीवन जगताना आपण कसे वागतो हेच लोकांच्या लक्षात राहात असते. अशापैकी माझ्या सदैव लक्षात राहणारे व्यक्तीमत्व म्हणजे माझे सहकारी, सन्मित्र शरणप्पाआण्णा. ठेविले अनंते तैसेचि राहावे, चित्ती असू द्यावे समाधान असे राहण्यातच स्वतः ला धन्य मानणाऱ्या माझ्या या मित्राने आयुष्यात कायम टिकणारी माणसे व माणुसकी फार कमावली. कोणतेही काम नि:संकोच,प्रामाणिक व गतीने करण्यात ते पटाईत होते.चुकून कधी कुणाशी वाद,संघर्ष झालाच तो क्षणाचा असायचा आणि त्यानन्तर झालेली मैत्री, स्नेहभाव कायमचा राहात असे,हे त्यांचे खास वैशिष्टय आहे. त्यामुळे ते माझ्यासह अनेकांच्या लक्षात राहणारे आहेत. माझ्यासाठी तर ते सदैव, आदर्श सेवकाचे प्रतिक वाटतात. स्वतः होऊन निर्देश करणारे ते आगळे वेगळे व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या शरणप्पा या नावातच ते सेवेशी शरण गेलेले सेवक दिसून येतात. श्री. शरणप्पा बसलिंगप्पा शाबादे यांचा जन्म दिनांक १ जून १९६४ झाला. त्यांनी अक्कलकोट येथील शहाजी हायस्कूलमध्ये इयत्ता दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.आज ते सोलापूरच्या विजापूर रोडवरील कमला नगरात पत्नी सौ.सुमित्रा,दोन मुले बसवराज,सचिन, सून व नातवंडे यांच्यासमवेत समाधानाने राहात आहेत. मुलगा बसवराज हा दै. सकाळमध्ये तर सचिन हा किर्लोस्कर कंपनीत नोकरीस आहे. शाबादे परिवार हा मूळचा हिरोळी (ता. आळंद, जि. गुलबर्गा ) येथील आहे.त्यांची घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. त्यांचे वडील एका खाजगी दुकानात मुनिम होते. ते १९८३ साली सोलापुरात आले, त्यांना नोकरी करण्याशिवाय पर्याय नव्हता. अक्कलकोटचे तत्कालीन आमदार कै. बाबासाहेब तानवडे हे त्यांचे मावसभाऊ होते, त्यांच्या ओळखीतून त्यांना डिसेंबर १९८६ मध्ये दै. 'तरुण भारत'मध्ये सेवक पदाची नोकरी मिळाली. त्यावेळी त्यांना ३०० रूपये पगार होता. त्याच पदावर राहून ३८ वर्षे सेवा केली, यावरून त्यांची 'तरुण भारत' व राष्ट्रीय विचारावरील निष्ठा दिसून येते. घड्याळाच्या काट्याकडे पाहून काम करणारे सेवक अनेक असतात, पण घड्याळाच्या काट्यांकडे पाठ फिरवून काम करणारे शरणाप्पा हे जणू तरुण भारतचे पूर्णवेळ कार्यकर्ते च होते. अंगावर पडेल ते काम, जबाबदारी पार पाडण्याची त्यांची तयारी होती, त्यांनी काही महिने नांदेड व पंढरपूर येथेही सेवा केली आहे. राष्ट्रीय स्वयसेवक संघाच्या राष्ट्रीय विचारांची पकड मजबूत असल्यामुळेच त्यांनी एकाच ठिकाणी तरुण भारतमध्ये निम्म्याहून अधिक वर्षे खर्ची घातली.त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंगाचा मी साक्षीदार आहे. या सेवाकाळात त्यांनी तीस वर्षे सायकलच वापरली, त्यामुळे त्यांची प्रकृती ठणठणीत आहे. कामाचा कितीही व्याप असला तरी त्यांना मी कधीही चिडचिड करताना पाहिले नाही. प्रत्येक विभागातील वरिष्ठ व कर्मचारी सांगतील ते काम शरणप्पा न कंटाळता करीत असत.या दीर्घ सेवाकाळात त्यांना अनेक संपादक, संचालक,व्यवस्थापक, अधिकारी व अनेक कर्मचाऱ्यांचा निकटचा सहवास लाभला,त्यांच्या सहवासात त्यांची चांगली जडणघडण झाली.त्यांच्या सेवाभावी वृत्ती,विनम्र व शांत, मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांचे अनेकांशी जिव्हाळ्याचे व कौटुंबिक नाते निर्माण झाले होते आणि ते नाते आजही टिकून आहे.त्याचा पुरावा व पोचपावती म्हणजे आज सर्व कर्मचाऱ्यांतर्फे होत असलेला त्यांच्या एकसष्ठीचा आनंद सोहळा.यापुढील त्यांचे व त्यांच्या परिवाराचे आयुष्य अधिक आरोग्यदायी,फलदायी जावे म्हणून ईश्वरचरणी प्रार्थना!ईश्वर तर त्यांच्यासोबत सदैव असणारच आहे आणि आपण सर्व मित्र परिवारही त्यांच्यासोबत राहू त्यात, त्यासाठीच फूल है गुलाब का खुशबू लिया करो,प्यार है आपका,वह शरणप्पाआण्णा और उनके परिवार को दिया करो.

**लेखक - दशरथ वडतिले,**
**माजी अध्यक्ष, सोलापूर श्रमिक पत्रकार संघ,**
**मो.९४२२४५७१००**

## अयोध्येत कारसेवा व गुणवंत कामगार

अयोध्येतील वादग्रस्त बाबरी ढाचा पाडण्यासाठी झालेल्या आंदोलनात शरणप्पा शाबादे यांनी माजी महापौर किशोर देशपांडे व राम तडवळकर यांच्या नेतृत्वाखाली सहभाग नोंदविला होता. कारसेवक म्हणून ते दि.४, ५ व ७ डिसेंबर १९९२ रोजी ते प्रत्यक्ष अयोध्येत उपस्थित होते. तसेच शरणप्पा यांनी केलेल्या प्रामाणिक कामाची दखल घेऊन मैत्र फौंडेशनने १९९२ मध्ये त्यांना गुणवंत कामगार पुरस्कार देऊन सन्मानित केले होते.हे दोन्ही प्रसंग आपल्या जीवनातील संस्मरणीय अनमोल ठेव असल्याचे ते आवर्जून सांगतात,ही बाब आमच्यासाठी अभिमानाने कॉलर ताठ करणारी वाटते.

# 'न मे कर्मफले स्पृहा'

**दैनिक सोलापूर तरुण भारत' मुहूर्तमेढ १९८५ सालची. १९८६ साली शारणाप्पा तरुण भारत मध्ये सेवेस सिपाई या पदावर रुजू झाले. तरुण भारत मध्ये काम करताना 'न मे कर्मफले स्पृहा' हे ब्रीद वाक्य मनात रुजवून आपल्या सेवेची सुरवात केली.काम करीत असताना त्यांना जाणवले की तरुण भारत हे नुसता वृत्तपत्र नाहीं, तर हे प्रखर राष्ट्रीय विचाराचे दैनिक आहे. हे वृत्तपत्र राष्ट्रीय सेवा संघाच्या विचाराचे दैनिक आहे.या संस्थेत काम करणे म्हणजे राष्ट्र सेवा केल्यासारखे आहे या सेवा भावाने शरणप्पा काका यांनी ३८ वर्षे सेवा पूर्ण केली,३१ मे २०२४ रोजी ते सेवानिवृत्त झाले.**

दैनिक तरुण भारतचे मुख्य समूह संपादक दिलीप पेठे, निवासी संपादक प्रशांत माने, मुख्य कार्यकारी अधिकारी बी. श्रीनिवास, व्यवस्थापक विनायक पुला, मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख राजाराम मस्के, जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायनी, वितरण प्रमुख नागसेन शिवशरण, तरुण भारत मधील सर्व सहकारी कर्मचारी यांच्या उपस्थितीत सौ. व श्री शरणप्पा यांचा सेवानिवृत्ती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.


शरणाप्पा शाबादे यांना स्वर्गीय माजी संपादक चित्रंजन पंडित जी, मुंबई. माजी संपादक मनोहर कुलकर्णी, लातूर. प्रबंध संपादक विवेक कृष्णाजी घळसासी, माजी संपादक अरविंद जोशी, माजी संपादक अरुण करमरकर, माजी संपादक अनिल कुलकर्णी, माजी संपादक नारायण कारंजकर, माजी संपादक राजेश प्रभू साळगावकर, माजी संपादक विजयकुमार पिसे, सध्याचे मुख्य संपादक दिलीप पेठे निवासी संपादक प्रशांत माने यांचे सोबत काम करण्याचे भाग्य लाभले. यासोबत स्वर्गीय श्रीपाद अप्पा लिमये माजी चेअरमन हरिभाऊ गोडबोले माजी चेअरमन सुभाष बापू देशमुख, तरुण भारतचे स्वर्गीय यशवंतराव पेठे काका यांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले. शरणपा शाबादे यांची ऐक तीव्र इच्छा होती की,त्यांचा ६१ ठी चा कार्यक्रम व्हावा या कार्यक्रमास तरुण भारतचे सर्व माजी संपादक,सर्व माझी आजी सहकारी यांना येकत्र करून सर्वांच्या उपस्थितीत कार्यक्रम घ्यावं,अनेक सहकारी यांच्याशी याबाबत त्यांनी संवाद साधला.माजी वरिष्ठ उपसंपादक दशरथ वडतीले, माजी वरिष्ठ उपसंपादक रमेश बसाठे यांनी हि बाब मा .दिलीप पेठे यांच्या कानावर घातली. साहेबांनी यास तत्काळ दुजोरा दिला प्रबंध संपादक श्री.विवेकजी घळसासी,मुख्य समूह संपादक दिलीप पेठे,निवासी संपादक प्रशांत माने,व सर्व माजी संपादक व माजी सहकारी,सर्व सहकारी अधिकारी,तरुण भारत परिवार यांचे उपस्थितीत शुक्रवार दिनाक ९ ऑगस्ट २४ रोजी स्नेहमेळावा तरुण भारतच्या वतीने आयोजित केला.



शरनप्पा काका यांचा दिनक्रम ठरलेला सकाळी लवकर कार्यालयात येणे नेमून दिलेली सर्व कामे वेळेत पूर्ण करणे,कोचीही कामा विषयी तक्रार असता कामा नये याची ते दक्षता घेत.सकाळी सर्वप्रथम तरुण भारतचा पूर्ण अंक वाचत.अंकामध्ये कांहीं नजरचुकीने त्रुटी आढळल्यास लगेच याची कल्पना वरिष्ठांना देत.एखादी बातमी दिवसापूर्वी अंकात प्रसिद्ध झाली आणि पुन्हा ती कधी चुकून अंकात प्रसिद्ध झाली तर तरीही ते सर्वांना याची कल्पना देत.३८ वर्षाच्या सेवेत त्यांना अनेक संपादक,इतर विभागातील अधिकारी यांचे सोबत काम करणेचा अनुभव आला.तरुण भारत मधील सर्व सहकारी कर्मचारी यांना प्रेमाने,आपुलकीने व आनंदाने काम कस करावं याचं मूर्तीमंत उदाहरण आहे.तरुण भारत मद्ये येवढे दिवस काम करताना त्यांचे तरुण भारतच्या सर्व विभागीय कार्यालय येथील सर्व बातमीदार,जिल्हा प्रतींनीधी,तालुका प्रतिनिधी यांचा परिचय होता,कोणीही कार्यालयात आले की त्यांची ते आपुलकीने विचारपूस करून चहापान व्यवस्था करीत.संपादकीय विभाग,जाहिरात विभाग,वितरण विभाग,प्रिंटिंग विभाग,पार्सल विभाग कोणत्याही विभागात कोणाचेही कोणतेही काम असल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांनी काम सांगितल्यास ते काम पूर्ण करणे,कोणाचीही तक्रार कोणासही कधी चुकून केली नाही. शारणप्पा हे प्रखर हिंदुत्ववादी विचाराचे, एखाद्या ठिकाणी हिंदुंवर झालेल्या अन्यायाची बातमी वाचली की ते व्यथित होत, भारतीय जनता पक्षावर त्यांचे अतोनात प्रेम,पक्षाने कोणताही उमेदवार दिला की त्यांना मदत करणेच ते इतरांना आवर्जून सांगत. कामात कोणी चुकीचे वागले की त्यांचे ठरलेलं वाक्य असायचं कापायला पाहिजे म्हणजे चुकीचे काम करणाऱ्याला धडा शिकवायला पाहिजे असं ते नेहमी म्हणत. तरुण भारत मद्ये येवढे वर्ष काम करताना त्यांना पायाची झालेली जखम वगळता कधीही ते आजारी पडले नाहीत.शेवटच्या २०२४ वर्षी त्यांना थोड्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या,त्यातूनही ते बरे झाले.शरनप्पा काका यांना जीवनात अनेक संकटे आली तरी खचून न जाता ते त्यातून बाहेर पडले.ईश्वराने त्यांना उत्तम आरोग्य दिलेले आहे.ते अत्यंत कष्टाळू, बाधा सडपातळ, आयुष्यात ३० वर्षे सायकलवर प्रवास केला, बाळे येथील सोलापूर गुडस येथून वृत्पत्रसाठी लागणाली शाईचे २० किलोचे डबे ते कार्यालयात आणत, पोस्टात जाणे असो,किंवा चहा आणावयास ते सायकल वापरीत यामुळेच ते आजही एकदम तंदुरुस्त आहेत. शरणाप्पा यांना बसवराज व सचिन ही दोन मुले आहेत. त्यांच्या धर्मपत्नी सौ सुमित्रा यांचीही त्यांना मोलाची साथ लाभली. सुनबाई सौ. वैशाली ही पण अत्यंत प्रेमळ मनाची, समंज्यास पणा ठाई असणारी गुणी लाभली. नातू हर्षल व विराज यांच्यासह सोनामाता नगर विजापूर रोड येथे ते वास्तव्यास आहेत. श्री शरणाप्पा शबादे काका यांना पुढील आयुष्य आनंदात, ऐश्वर्यात जावो त्यांना उत्तम आरोग्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**- राजाराम मस्के**
**८८८८८४७२३९**

**सोलापूर तरुण भारतचे प्रधान सेवक श्री. शरणप्पा शहाबादे, शाबादे तरुण भारतची एकनिष्ठेने, प्रदीर्घ तसेच प्रामाणिक सेवा करून सेवानिवृत्त झाले. सचोटीने सेवा केली म्हणून तर त्यांचा गौरव सोहळा होत आहे. सहकारी शरणप्प्पा आपल्या कामात अपटूडेट होते.**



## सदैव शरण शरणप्पा

मी १ जून १९८६ रोजी तरुण भारतला आलो. तेव्हापासून शरणाप्पा यांचे कार्य, कार्यातील प्रामाणिक पणा पाहिला आहे. केवळ तरुण भारतच नाही तर सोलापुरातून प्रसिद्ध होणारी दैनिके, पुण्यामुंबईतुन येणारी दैनिके, इंग्रजी वृत्तपत्रे रोजच्या रोज फाइल्स मध्ये पुरवण्यासह शाबूत ठेवण्याचा त्यांचा हातखंडा दुसरे कोणीच करू शकले नाही. काही काळ माझ्याकडे तरुण भारतचा 'सं सं कृ ' विभाग होता. सं सं कृ म्हणजे संदर्भ, संपर्क, कृषी. या विभागात मला शरणप्पा यांच्या टापटीपमुळे कार्य करता आले. कोणी सहकारी अचानक एखाद्या जुन्या अंकाची मागणी करीत. ग्रंथालय जबाबदारीत अभिप्रायार्थ अनेक ग्रंथ, मासिके येत. त्यांना पाय फुटण्यापूर्वी ते नोंदीसाठी शरणप्पा माझेकडे आणून देत. तरुण भारतच्या दशक पुरतीनिमित्त तरुण भारतच्या जुन्या अंकांचे प्रसंगानुसार तसेच सर्व सहकाऱ्याच्या नावाने प्रसिद्ध साहित्याचेही प्रदर्शन शरणाप्पा व कै. दत्ताजी व्हनमाने यांच्या योगदानातून मी करू शकलो. आम्ही वाचून कोठेही टाकलेले पेपर शरणप्पा तत्परतेने गोळा करून व्यवस्थित ठेवीत. कामाचे तास त्यांनी कधी पाहिलेच नाही. दिवस रात्र कधीही ते सेवेत असत. सुट्टीदिवशीही त्यांची एखादी धावती भेट तरुण भारतला असेच. नावच शरणप्प्पा असल्याने सर्वच बाबतीत ते शरणच असत. कोणतेही काम ते टाळत नसतं. कौटुंबिक जबाबदारीकडेही त्यांनी कधी दुर्लक्ष केले नाही. कार्यालयातील स्वच्छता कडे विशेष लक्ष दिले. श्रद्धा पूर्वक ते राहिले. अयोध्याला ते कारसेवेसाठी आवर्जून गेले होते. कार्यालयातील कुजूबूजी त्यांनी मनातच ठेवल्या, त्या पसरविल्या नाहीत. 'न मे कर्म फले स्पृहा ' हे तरुण भारतचे ब्रीदवाक्य त्यांनी जीवनात खऱ्या अर्थाने साकारले. त्यांचे जीवनच बहुपयोगी आहे. मी कधीही अधून मधून तरुण भारत कार्यालयात जातो. शरणप्प्पा नमस्कारच नाही तर पायाही पडतात. माझ्या कुंभ राशीला चांगले आहे ना? मीही सकारात्मक बोलून त्यांना आनंदच देत आलो आहे. त्यांचे पुढील आयुष्य सुखी, शांततेचे, आरोग्यदायी जावो, हीच श्री सिद्ध्येश्वर चरणी प्रार्थना.

सोलापूर तरुण भारत इतिहासात शरणप्प्पा हे एक अविस्मरणीय पान आहे. त्यांची आपुलकीची, मृदुभाषा आजच्या जमान्यात दुर्मिळ झाली आहे. तरुण भारतने खऱ्या अर्थाने त्यांना सुसंस्कार दिले. शुभं भवतु. कल्याणमस्तु.

**- नारायण कारंजकर,**
**माजी संपादक, कुर्डुवाडी.**
**मो. ९४२३७५८४०**

## क्राईम वृत्त

### अज्ञात चोरट्याने मेटल कटिंग मशीन पळवली

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

अज्ञात चोरट्याने मेटल कास्टिंग मशीन चोरून नेल्याची घटना ६ ऑगस्ट रोजी सकाळी दहा ते साडेअकरा वाजण्याच्या दरम्यान अशोक चौक येथे घडली.याप्रकरणी सिराज उद्दिन हुसेन शेख (वय-३२,रा. दमानी नगर भैरव कॉलनी) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांचे अशोक चौक गायकवाड हॉस्पिटल जवळ चालू बांधकामाच्या मोकळ्या जागेतून देवत कंपनीचे दहा हजार रुपये किमतीचे मेटल कटिंग मशीन चोरून नेली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हवालदार पटेल हे करीत आहे.

### किरकोळ कारणावरून लोखंडी पाईपने मारहाण; चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

किरकोळ कारणावरून वाद होऊन लाथा बुक्क्यांनी व लोखंडी पाईपने मारहाण करून जखमी केल्याची घटना ५ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास गुरुप्रसाद हॉटेल येथे घडली. याप्रकरणी असलम सरदार शेख (वय-३९,रा.आंबेडकर नगर होटगी,सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून गुरुप्रसाद हॉटेलचे मालक व



त्यांचा मुलगा व इतर अज्ञात दोन इसम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी व त्यांचा भाऊ स्टेशन समोरील गुरुप्रसाद हॉटेलमध्ये नाष्टा करण्यासाठी गेले होते.त्यावेळी फिर्यादी यांनी वेटरला पकोडा व जामुनची ऑर्डर दिली. ऑर्डर आल्यानंतर फिर्यादी यांना पकोडे कच्चे तळलेले वाटल्याने फिर्यादी यांनी वेटरला परत तळून दे असे म्हणाले असता,वेटरने नकार देत त्यावरून वाद होऊन वरील संशयित आरोपी यांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण करून फिर्यादी यांना लोखंडी पाईपने मारून जखमी केले व तसेच भाऊ ईसाक याला लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास मपोह.लांबतुरे हे करीत आहेत.

### प्रताप नगरात घर फोडून ५४ हजारांचा साहित्य लंपास

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**



प्रताप नगर येथे अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून घरातील ५४ हजार रुपये किमतीचे साहित्य चोरून नेल्याची घटना ३० जुलै रोजी सकाळी साडेनऊ ते दुपारी अडीच वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी अशोक मल्लेश धुरराळ (वय-४३,रा.हरळ्या नगर,विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार हार हे करीत आहेत.

# जिल्ह्यात लाडकी बहिण योजनेचे सहा लाख अर्ज : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

राज्य शासनाची अत्यंत महत्वकांक्षी योजना म्हणून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची राज्यात सर्वत्र प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने ही जिल्ह्यात या योजनेची प्रचार प्रसिद्धी सुरू असून दिनांक ७ ऑगस्ट २०२४ सायंकाळी पाच वाजेपर्यंत ६ लाख १४ हजार ९७० अर्ज या योजनेत तालुकास्तरीय समितीकडे प्राप्त झालेले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.



जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत जिल्ह्यातील एक ही पात्र लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणा दक्ष राहून काम करत आहे. ग्राम स्तरावर अशा सेविका ग्रामसेवक त्यांच्याकडे अर्ज प्राप्त होत आहेत तर महा-ई-सेवा केंद्रा द्वारे ऑनलाईन पद्धतीने अर्ज अपलोड केले जात आहेत. जिल्हा महिला व बाल विकास विभाग जिल्हा परिषद जिल्हा परिषदेचा महिला बाल विकास विभाग आदी विभागाच्या वतीने अत्यंत काटेकोरपणे नियोजन करून ही योजना सर्वसामान्य लाभार्थ्यापर्यंत पोहोचवण्यात प्रशासनाला यश प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम स्तरावर अंगणवाडी सेविका मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचे अर्ज भरून घेत आहेत. तसेच प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना या योजनेविषयी सविस्तर माहिती देऊन कोणत्या कागदपत्राची पूर्तता करणे गरजेचे आहे याविषयी मार्गदर्शन अंगणवाडी सेविकेकडून केले जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागात या योजनेचे अर्ज भरण्यासाठी पात्र महिला मोठ्या संख्येने येत आहेत.



या योजनेअंतर्गत ग्रामपंचायत स्तरापर्यंत अर्ज स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेले असल्याने जवळपास चार लाख अर्ज ऑफलाइन पद्धतीने प्रशासनाकडे प्राप्त झालेले होते. तर नारीशक्ती दूत पवर दोन लाख पंधरा हजार अर्ज ऑनलाईन प्राप्त झालेले आहेत. ऑफलाइन पद्धतीने प्रशासनाकडे आलेले सर्व अर्ज अत्यंत गतीने ऑनलाईन करण्यात आलेले आहेत.

प्राप्त सर्व अर्जांची तपासणी तालुकास्तरीय तपासणी समितीने केलेली असून यातील ५ लाख ४८ हजार ६५९ अर्ज समितीने जिल्हास्तरीय समितीकडे पाठवलेले आहेत तर ५९ हजार ३८९ अर्ज कागदपत्रांच्या त्रुटीमुळे रद्द करण्यात आलेले असून कोणत्या कागदपत्राची कमतरता आहे याविषयीचा मेसेज संबंधित लाभार्थ्यांच्या मोबाईलवर तालुकास्तरीय समितीने पाठवलेले आहेत. रद्द केलेल्या अर्जावर संबंधित लाभार्थ्यांनी त्रुटीबाबतचे कागदपत्र अपलोड केल्यास त्यांचे अर्ज पुन्हा जिल्हास्तरीय समितीकडे वर्ग करण्यात येणार आहेत, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी आर. बी. काटकर व जिल्हा परिषदेचे महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी दिली आहे.

तालुकास्तरीय समितीकडून प्राप्त झालेले ५ लाख ४८ हजार अर्ज यावर जिल्हास्तरीय समिती कडून छाननी करण्यात येऊन विधानसभा क्षेत्रनिहाय गठित होणाऱ्या समितीची अंतिम मंजुरी घेऊन पुणे येथील आयुक्त महिला व बालविकास यांच्याकडे पाठवण्यात येणार आहेत. आयुक्त महिला व बालकल्याण पुणे यांच्याकडे प्राप्त झालेल्या मंजूर अर्जावर महिला व बालकल्याण आयुक्त कार्यालयाकडून संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट पैसे जमा करण्याची कार्यवाही होणार आहे. जिल्ह्यात तालुकास्तरीय समितीकडे प्राप्त झालेल्या अर्जावर तालुकास्तरीय समितीकडून छाननी करण्यात येऊन जिल्हास्तरीय समितीकडे पाठवण्याची टक्केवारी ८९.२२% इतकी आहे.

# जिल्हा पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी दिलीप पतंगे

## उपाध्यक्षपदी श्रीशैल बनशेट्टी, सचिवपदी मल्लिकार्जुन केंदुळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनची नुतन कार्यकारणी निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक उपनिबंधक दत्तात्रय भवर यांनी जाहीर केली. त्यात फेडरेशनच्या अध्यक्षपदी राज्य सहकार परिषदेचे माजी संचालक दिलीप पतंगे यांची तिसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली. उपाध्यक्षपदी श्रीशैल बनशेट्टी यांची तर सचिवपदी मल्लिकार्जुन केंदुळे यांची निवड बिनविरोध करण्यात आली. निवड बिनविरोध झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक उपनिबंधक दत्तात्रय भवर यांनी केली. अध्यक्ष पदासाठी सुचक संचालक मुरलीधर चव्हाण तर अनुमोदन रंगनाथ गुरव यांचे होते. उपाध्यक्ष पदासाठी सुचक राजेंद्र कुलकर्णी तर अनुमोदन चंद्रकांत रमणशेट्टी तसेच सचिव पदासाठी सूचक विष्णू नागटिळक त्यास आप्पाराव विटेकर यांचं अनुमोदन होते. यावेळी नूतन संचालक इंद्रजीत पवार, रंगनाथ गुरव, चंद्रकांत रमणशेट्टी, राजेंद्र कुलकर्णी, मुरलीधर चव्हाण, डॉ. राजेश फडकुले, विष्णू नागटिळक, संजय पाटील, विकास दास, अशोक मराठे, अजय पोन्नम, किरण करमरकर,शिवानंद बोरामणी, आप्पाराव विटेकर, रोहिणी तडवळकर, शुभदा पटवर्धन, प्रमिला बाबर उपस्थित होते. निवडीनंतर नूतन पदाधिकारी व संचालकांचा सत्कार करण्यात आला.





### पतसंस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी तत्पर : पतंगे

सोलापूर जिल्ह्यात सहकारी पतसंस्था फेडरेशन स्थापन झाले. त्यामुळे पतसंस्थांच्या कारभाराला बळ मिळाले. संस्थांच्या थकबाकी वसुलीसह ठेवी वाढवणे, कर्जवाटप याचबरोबर संस्थांसमोरील अडीअडचणी सोडविण्यासाठी फेडरेशनचे कार्य सुरू आहे. आगामी काळात देखील त्यासाठी फेडरेशनचे पदाधिकारी तत्पर राहतील, अशी ग्वाही फेडरेशनच्या वतीने नूतन अध्यक्ष दिलीप पतंगे यांनी अध्यक्षीय पदभार स्वीकारल्यानंतर दिली.

## श्रावणमास प्रवचनमाला - ३

# संत एकनाथ महाराजांची वंशपरंपरा आणि भानुदास महाराज चरित्र

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ ऑगस्ट-**

**जेणें बालपणी आकळिला भानु। स्वयें झाला चिद् भानु।**
**जिंतोनि माना अभिमानु। भगवत्कृपा वनी स्वयें झाला।।**

'संत एकनाथ महाराज चरित्र व तत्वज्ञान' या विषयावर निरुपण करताना श्रीगुरु डॉ.जयवंत महाराज बोधले संत एकनाथ महाराजांची



वंशपरंपरा आणि भानुदास महाराजांचे चरित्र वर्णन आपल्या अभ्यासपूर्ण अमृतवाणीतून आज प्रवचनमालेतच्या तिसऱ्या सत्रात विशद करतात.

संत एकनाथ महाराजांचे पणजोबा म्हणजे संत भानुदास महाराज होत. वयाच्या आठव्या वर्षी उपनयन संस्काराचा विधी झाल्यावर गुरुगृही ज्ञानार्जनासाठी पाठविण्याचा निर्णय घरात होताच, भानुदास महाराज ते टाळण्याकरिता गुपचूपपणे लांब एका गुहेत जातात. गुहेतून बाहेर निघणं त्यांना नकोस झालं. आपल्या निरागस बालमनाने त्या गुहेत असलेल्या सूर्यनारायण देवतेच्या मूर्तीला नेत्राश्रूंनी अभिषेक करतात. तिथेच भानुदास महाराजांनी सूर्यनारायणाची उपासना केली. उपास्यभक्तिने सूर्यनारायणाचा आशीर्वाद प्राप्त करुन ते जेव्हा बाहेर पडतात; तेव्हा ते चिद् भानु अर्थात चैतन्यस्वरुप होतात, असे डॉ. जयवंत महाराज स्पष्ट करतात. परंपरागत असणारा कपड्यांचा व्यापार करण्यासाठी गेल्यावर त्यांच्या प्रामाणिकतेमुळे व्यापारमार्गात तोटा मिळू लागला. व्यवसायाची घडी विस्कटली. परंतु, कालांतराने लोकांना भानुदासांची व्यवहारातील विश्वासार्हता पटू लागली. उत्तम व्यवसाय चालल्याने, हा उत्कर्ष अन्य व्यापा-यांना बघवेना. एके दिवशी भजनकरिता भानुदास महाराज मंदिरात गेल्यावर उपद्रवी व्यापा-यांनी त्यांचे घोडे व गाठेडे सोडून दिले. नवल काय...त्या रात्री सर्व व्यापा-यांची गाठोडी चांगला चोप देऊन चोरांनी लुटली. एका ब्राह्मण गृहस्थाने भानुदास महाराजांचे घोडे व गाठोडे घेऊन आला. तो पांडुरंग परमात्माच होता. पांडुरंगाला माझ्या व्यापारामुळे हा त्रास सहन करावा लागला म्हणून त्यांनी व्यापारावर तुळशीपत्र ठेवले.

**न करी कोणाचे उपार्जन। प्रपंच चिंतेत न घाली मन।**
**कुटुंब कलत्र असोन। उदासपणे वर्ततसे।।**

भानुदास महाराजांना आता स्थितप्रज्ञता प्राप्त झाली होती. त्यांनी अभंग लिहायला सुरुवात केली. आता त्यांना पांडुरंगाला भेटण्याची ओढ लागली. इ.स. १३३६ मध्ये दक्षिणेत हरिहर व बुक्क या भावांनी विजयनगर राज्याची स्थापना केल्यानंतर कृष्णदेवराय हा जनप्रिय; विद्वान राजा इ.स.१५०९ मध्ये गादीवर आला. पंढरपूरला आल्यावर त्याने अनुष्ठान करुन पांडुरंगाला हट्टाने विजयनगरला घेऊन जातो. तेव्हा, सर्व संतांच्या सांगण्यावरुन भानुदास महाराज विजयनगरला पांडुरंगाला परत आणण्यासाठी जातात. विजयनगरमध्ये पांडुरंगाची गळाभेट झाल्यावर मुद्दामहून पांडुरंग भानुदासांच्या गळ्यात पंचरत्नांचा हार घालतात. विजयनगरचे सैन्य चोर समजून त्यांना फासावर देण्यासाठी निघते. भानुदास महाराज पांडुरंगाला बोलतात- देवा, अनन्य प्रेमाने जशी एखादी पतीव्रता कोणत्याही परिस्थितीत प्रेमाची पराकाष्ठा करण्यासाठी पतीपासून तोंड फिरवत नाही. तद्वतच, आकाश खाली पडो, सात समुद्र एक होवो, पृथ्वी प्रलय होवो तरी तुझ्याप्रती माझी निष्ठा कमी होणार नाही. तेवढ्यात पांडुरंग एका निरापराध ब्राह्मणावर अन्याय केला म्हणून मंदिर सोडतात. असे भावपूर्ण निरुपण डॉ. जयवंत महाराजांनी केल्याने मंदिरात याप्रसंगी धीरगंभीर शांतता पसरली होती.

# ‘कर्णा’ला ब्रह्मास्त्र लाभलं नाहीच

बऱ्याचदा वस्तुस्थिती ठाऊक नसतानाही आपण एकदम सोशल मीडियावर अत्यंत आत्मविश्वासानं असं काही व्यक्त होतो, जणू काही ती सगळी घटना प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांसमोरच घडली आहे आणि आपणच तिचे एकमेव साक्षीदार आहोत..! पण तसं नसतं. अनेकदा सोशल मीडियावर व्यक्त होताना वास्तविक परिस्थितीची सत्य माहिती नसल्यामुळे आपल्या अभिव्यक्तीची सत्यताच संपून जाते. तिच्यातलं सत्व नष्ट होतं. भावनांचा कल्लोळ टाळून एखाद्या घटनेकडं बघता आलं तर सोशल मीडियावर अर्धवट माहितीतून मोठ्या अभिनिवेशानं व्यक्त होणाऱ्यांचं प्रमाण बऱ्याच अंशी कमी होऊ शकेल. असो. विषय पॅरिस ऑलिम्पिकमधील ५० किलो वजनी गटातील महिला कुस्ती अंतिम सामन्याचा आहे.

विनेश फोगट तिच्या मूळ वजनी गटात न खेळता त्याहून कमी असणाऱ्या वजनी गटात खेळायला गेली. तिने त्यासाठी स्वतःचा वजनी गट बदलला. साहजिकच, इव्हेंट देखील बदलला. पण ५० किलो वजनी गटात दुसरी पात्र खेळाडू असतानाही असं कसं झालं?

शिवानी पवार ही ५० किलो वजनी गटासाठी सहज पात्र ठरेल अशी खेळाडू असतानाही विनेश फोगाटने त्याच गटातून खेळण्यासाठी हट्ट का धरला असेल? शिवानी पवार ही मध्यप्रदेश मधल्या छिंदवाडा जिल्ह्यातल्या एका अत्यंत सामान्य शेतकरी कुटुंबातून वर आलेली आंतरराष्ट्रीय खेळाडू आहे, हे आपल्यापैकी अनेकांना ठाऊकच नसेल. तिचे वडील नंदलाल पवार आणि आई नंदिनी पवार केवळ ३ एकर जमीन कसून शेती करतात. आता तीन एकर शेतीतून उत्पन्न असं किती मिळत असेल? पण खरोखरच परवडत नसतानासुध्दा आई वडिलांनी शिवानीचा हिरमोड केला नाही. विविध ठिकाणच्या कुस्तीच्या स्पर्धा जिंकून रोख बक्षीसं मिळवून त्यातून तिच्या क्रीडा विषयक करिअरचा खर्च भागवला जाई.


सर्बिया येथील २०२१ मध्ये झालेल्या २३ जागतिक कुस्ती स्पर्धेत रौप्य पदक जिंकलेली ती पहिलीच भारतीय महिला आहे. म्हणूनच, ५० किलो वजनी गटातून पॅरिस ऑलिम्पिक २०२४ साठी ती भरवशाची दावेदार असल्याचं जवळपास निश्चित समजलं जात होतं.

मार्च २०२४ हा महिना फार उलथापालथी करणारा होता. पतियाळा मध्ये पॅरिस ऑलिम्पिकसाठी कुस्तीच्या निवड चाचण्या सुरु होत्या. विनेश स्वतःच्या वजनी गटात निवड चाचणीच्या पात्रता फेरीतच हरली. तिला सेमीफायनल मध्येच ०-१० ने पराभव पत्करावा लागला. आणि त्यानंतर तिने ५० किलो वजनी गटासाठीची पात्रता मिळवण्यासाठी त्या गटातील पात्र ठरेल अशा शिवानी पवारला ११-६ ने हरवलं आणि ५० किलो वजनी गटात स्थान मिळवलं. ह्या सगळ्या उपद्व्यापात आपण नक्की चूक करतो आहोत, याची जाणीव आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या अनुभवी खेळाडूला असणं अध्याहृत आहे.

पतियाळामध्ये नेमकं काय झालंय, हे सगळ्यांनी समजून घेणं आवश्यक आहे. पतियाळा मध्ये पात्रता चाचण्यांच्या वेळी विनेश फोगाट तब्बल तीन तास वाद घालत होती. कारण, तिला ५० किलो आणि ५३ किलो अशा दोन्हीं गटातून ऑलिंपिक पात्रता हवी होती आणि ५३ किलोची पात्रता चाचणी ऑलिंपिकच्या अगदीं अलिकडं घेण्यात यावी, अशीही तिची मागणी होती. कारण उघड आहे - ऐनवेळी निर्णय घ्यायचं ठरलं तर, या वजनी गटात आपल्याशिवाय दुसरा कुणी पर्याय राहणार नाही आणि ती पात्रतासुद्धा आपल्याला देण्यावाचून फेडरेशन समोर दुसरा कुठला पर्यायच उरणार नाही, हे तिला पक्कं ठाऊक होतं. म्हणूनच तिनं डहॉक समितीसमोर ही मागणी ठेवली. एवढंच नाही तर, तसं लेखी आश्वासन आपल्याला मिळावं असाही हट्ट धरला. तीन तास सगळी वादावादी सुरू राहिली आणि शेवटी समिती सदस्यांनी तिची मागणी मान्य केली. तिला लेखी आश्वासन मिळालं. ह्या सगळ्या गोंधळात ५० किलो वजनी गटात पात्र ठरण्यासाठी आलेले सगळे खेळाडू तासन् तास ताटकळत बसून राहिले. आता खरा नियमभंग इथंच झाला आहे, ज्याकडं कुणीच म्हणावं तसं लक्ष दिलं नाही. युनायटेड वर्ल्ड रेसलिंगचा स्पष्ट नियम आहे की, एका दिवशी एका खेळाडूला केवळ एकाच वजनी गटातून खेळता येईल. पण इथं तर विनेशनं दोन वेगवेगळ्या वजनी गटातून खेळण्यासाठी भाग घेतला. अंतिम पांघालनं ५३ किलो वजनी गटात ऑलिम्पिक पात्रता मिळवली होती. पण विनेशनंही चाचणी सुरुच होऊ दिली नाही आणि लेखी आश्वासनाची मागणी लावून धरली. पंघालने ऑलिंपिक पात्रता आधीच मिळवली होती. पण तरीही विनेशनं हा खोडा घालून ठेवला होता.

मी मुद्दामच दोन्हीं वजनी गटातून पात्रता मिळवली आहे. कारण, मला ५३ किलो वजनी गटातून जिंकण्याची खात्री नाही. दुसरा मुद्दा म्हणजे, निवड समितीनं ऐनवेळी एखादा बदल केला किंवा पात्रतेचा एखादा निकषच बदलला तर? मला हे ऑलिंपिक हातून निसटू द्यायचं नव्हतं. असं विनेशनं पत्रकारांशी बोलताना तेव्हांच स्पष्ट सांगितलं होतं. ५० किलो वजनी गटात खेळणं मी २०१८-१९ पासूनच थांबवलं आहे. आणि आता वजन कमी करणं माझ्यासाठी प्रचंड आव्हानात्मक आहे. पण तरीही पॅरिस ऑलिम्पिकला जायचं म्हणून, मी वजन कमी करणार. पण माझा खरा आवडता इव्हेंट ५३ किलो हाच आहे. असंही विनेशनं पत्रकारांशी बोलताना सांगितलं होतं. हे सगळं वृत्त आजही गूगलवर उपलब्ध आहे. आता विनेशने केलेल्या ह्या सगळ्या प्रकाराला नेमकं काय नाव द्यावं, असा प्रश्न पडणार नाही का? थयथयाट करुन, अवास्तव मागण्यांचा दबाव आणून स्वतःची निवड करवून घेतली आणि शिवानी पवार या खेळाडूची पॅरिस ऑलिंपिकची संधी घालवली. ऑलिंपिकमध्ये सहभागी होण्याची संधी शिवानी पवारसाठी आता चार वर्षं पुढं गेली..! ह्याचं उत्तरदायित्व कुणी घ्यायचं, हा तर मोठा गहन प्रश्न आहे. अत्यंत जिवापाड मेहनत करुन, पै पै जमा करुन शिवानीला ऑलिंपिकमध्ये जिंकताना पाहण्याचं तिच्या आईवडिलांचं स्वप्न आता थेट चार वर्षं पुढं गेलं आहे. कालचक्र हे किती अनपेक्षित आणि कठोर परिक्षा पाहणारं असतं, हे सूज्ञांना अधिक सांगायला नकोच. म्हणून, या सगळ्या प्रकारात खरं नुकसान झालंय ते शिवानी पवारचं..! आज ऑलिंपिक अंतिम सामन्यापूर्वी विनेशला अपात्र ठरवल्याचा क्षण पाहताना शिवानीला काय वेदना झाल्या असतील, याची कल्पना कुणालाही करता येणार नाही..!

ही सगळी पूर्वपीठिका पाहिली की, प्रत्यक्ष पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५० किलो गटाच्या अंतिम सामन्यापूर्वी नेमकं जे काही झालं आणि विनेशला अपात्र घोषित करण्यात आलं, हे खरोखरच अनपेक्षित आणि धक्कादायक होतं का? या प्रश्नाचं उत्तर नाही असंच येतं. हा प्रश्न केवळ १०० ग्रॅम वजनाचा नाही, तर अशा एका अविवेकी महत्वाकांक्षेचा आहे, जिनं कर्मसिद्धांताचा इंगा नेमक्या मोक्याच्या क्षणी दाखवला आहे. महारथी कर्णानं परशुरामांकडून खोटं बोलून मिळवलेली अस्त्रविद्या ऐन युद्धाच्या वेळी त्याच्या कामी आली नाही. कारण, ती मिळवण्यासाठी त्यानं त्याच्या गुरुंशी असत्य व्यवहार केला होता. अन्य महिला कुस्ती खेळाडूंवर अन्याय होऊ नये म्हणून आंदोलन करणारी विनेश खरी? की, आपल्या महत्वाकांक्षेपोटी शिवानी पवारची संधी हिरावून घेणारी विनेश खरी? असा प्रश्न पडतोच. अत्यंत सामान्य शेतकरी कुटुंबातून आलेल्या आणि खरोखरच पात्र असलेल्या शिवानीची संधी हिरावून घेऊन विनेशनं नेमकं काय साध्य केलं, हा प्रश्न समाजानं तिला परखडपणे विचारणं नितांत आवश्यक आहे.



**(लेखक क्रीडा मानसतज्ज्ञ असून अनेक राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना गेल्या अनेक वर्षांपासून मानसशास्त्रीय तंत्रांचे प्रशिक्षण देतात.)**

**- मयुरेश उमाकांत डंके**
मानसतज्ज्ञ, संचालक-प्रमुख
आस्था काऊन्सेलिंग सेंटर, पुणे.

# सापांचे महत्त्व पटवून देणारा नागपंचमी सण

आज नागपंचमी. श्रावण शुद्ध पंचमी. या दिवशी नागाची पूजा केली जाते. फणा काढण्याच्या प्रवृत्तीमुळे नाग प्रसिद्ध आहे. नाग हा सर्पकुळातील आहे. तो फणा काढतो या वैशिष्ट्यामुळे नाग हा साप आदीमानवापासून आकर्षण बनला आहे. साप हा शेतकऱ्यांचा मित्र आहे. शेतात पिकाचे नुकसान करणाऱ्या उपद्रवी उंदरांचा नायनाट साप करतो. त्यासोबतच उंदरांपासून होणाऱ्या आजारांवरही साप नियंत्रण ठेवतो. या सर्व गोष्टी आपल्या पूर्वजांनी जाणल्या होत्या आणि त्यांना सापांचे महत्त्व पटले होते. सापांपासून होणारे फायदे त्यांच्या लक्षात आले होते. नैसर्गिकरीत्या उंदरांवर सापच नियंत्रण ठेवू शकतो. त्या काळात उंदीरनाशके उपलब्ध नव्हती म्हणूनच सापांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी व साप मानवावर करत असलेल्या उपकाराचे आभार मानण्यासाठी 'नागपंचमी' हा सण साजरा केला जाऊ लागला. ज्याप्रमाणे शेतीसाठी उपयुक्त असणाऱ्या बैलासाठी पोळा हा सण साजरा केला जाऊ लागला तसाच सापांचे महत्त्व पटवून देण्यासाठी नागपंचमी हा सण साजरा होऊ लागला. आपल्या पूर्वजांना हेही माहीत होते की सापांची जर मोठ्या प्रमाणात हत्या झाली तर साप पृथ्वीतलावरून नष्ट होतील व निसर्गाचा समतोल बिघडेल. नागपंचमी दिवशी नागदेवाची मनोभावे पूजा केली जाते. स्त्रिया वारुळावर जाऊन लाह्या व दूध वाहून वारुळाला पूजतात. लाह्या व दूध हे पदार्थ साप खात नसले तरी लाह्या खाण्यासाठी उंदीर बिळाजवळ येतात आणि सापांना आयते भक्ष्य मिळते. मानवी दृष्टिकोनातून पाहिल्यास सापांचे सकारात्मक व नकारात्मक या दोन्ही बाजू आहेत. पण त्यांच्या सकारात्मक दृष्टिकोनाकडे दुर्लक्ष केले जाते आणि नकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले जाते. नकारात्मक गोष्टी पसरविण्यापासून चित्रपटही कसे मागे राहतील. हिंदी चित्रपटातील 'नागीन, नगिना, दूद्ध का कर्ज' अशा चित्रपटांनी सापांबद्दल एक नकारात्मक छाप माणसांवर पाडली तर मराठीतील 'काळभैरव'मध्ये सापांबद्दल सकारात्मक गोष्टी सांगण्यात आल्यात. भारतातील सापांना १९७२ सालच्या वन्यजीव संरक्षण कायद्याअंतर्गत संरक्षण देण्यात आले आहे. परंतु याची अंमलबजावणी होत नसल्याने सर्पहत्या अजूनही थांबलेल्या नाहीत. त्यामुळेच साप आपला शत्रू नसून मित्र आहे, हे जेव्हा प्रत्येकास कळेल तेव्हा खऱ्या अर्थाने नागपंचमी साजरी होईल, असे म्हणायला हरकत नाही. भारतात सापांच्या ३३५ प्रजाती आढळल्या असून त्यातील २२० प्रजाती बिनविषारी आहेत. ४५ निमविषारी असून फक्त ७० प्रजाती विषारी आहेत. त्यातही नाग, मण्यार, घोणस, फुरसे या ४ विषारी प्रजाती प्रामुख्याने महाराष्ट्रात सर्वत्र आढळत असून मानवास धोकादायक आहेत.



**जनजागृतीकरीता काही सर्जनशील कल्पना...**

**सामुदायिक स्पर्धा :** सर्प जनजागृतीवर रेखाचित्र, निबंध किंवा पोस्टर बनवण्याच्या स्पर्धा आयोजित करा. हे मुलांना शिकण्यासाठी आणि माहिती त्यांच्या कुटुंबासह सामायिक करण्यास प्रोत्साहित करते.

**सर्प दंश जागरूकता वॉक :** एक वॉकथॉन किंवा मिरवणूक आयोजित करा जिथे सहभागी सर्प सुरक्षा संदेशांसह बॅनर आणि फलक घेऊन जातात. हे लक्ष वेधून घेऊ शकते आणि संभाषण सुरू करू शकते.

**रेडिओ ब्रॉडकास्ट:** स्थानिक रेडिओ स्टेशन्ससह लहान कार्यक्रम प्रसारित करण्यासाठी किंवा सर्प तज्ञांच्या मुलाखती, प्रतिबंधात्मक उपाय, स्थानिक साप वर्तन आणि आपत्कालीन पावले यावर चर्चा करण्यासाठी सहयोग करा.

**मोबाईल स्नेक अवेअरनेस व्हॅन:** वाहनांना ऑडिओ-व्हिज्युअल एड्सने सुसज्ज मोबाइल जागरूकता युनिटमध्ये रूपांतरित करा. वेगवेगळ्या गावांमध्ये प्रवास करा, माहितीपूर्ण व्हिडिओ प्ले करा आणि छोट्या बक्षिसांसह ऑन-द-स्पॉट क्विझ आयोजित करा.

**स्नेक बाईट मॉक ड्रिल्स:** मॉक ड्रिल आयोजित करा जेथे समुदायाचे सदस्य नक्कल केलेल्या साप चावण्याच्या परिस्थितीला प्रतिसाद देण्याचा सराव करतात. हा प्रत्यक्ष अनुभव सज्जता वाढवू शकतो.

**समुदाय संवाद:** सर्पदंशातून वाचलेले, वैद्यकीय व्यावसायिक आणि त्यांचे अनुभव आणि ज्ञान सामायिक करणार्या तज्ञांशी समुदाय संवाद आयोजित करा. हा वैयक्तिक स्पर्श कायमस्वरूपी प्रभाव पाडू शकतो.

**प्राथमिक आरोग्य केंद्रात जनजागृती :** ग्रामीण स्तरावर असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्पांची ओळख, सर्पदंश उपचारपद्धती यावर मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित कराव्यात. भविष्यात सर्पदंश मृत्युदर कमी करण्याकरिता जनजागृतीचा मोलाचा वाटा असणार असून त्याची सुरुवात आपल्या स्वतः पासून होणे गरजेचे आहे.

**-राहुल शिंदे**
सर्प अभ्यासक (९८६००९३७१२)




# संत सेवालाल निधी घोटाळा पोहोचला दोन कोटींवर

## जाधव गुरुजींना न्यायालयाने सुनावली तिसऱ्यांदा पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि ८ ऑगस्ट-**

मंद्रूपच्या संत सेवालाल निधी बँकेतील ठेवीदाराची फसवणूक केल्याप्रकरणी अटकेत असलेले मंद्रूप झेडपी शाळेचे माजी मुख्याध्यापक शिवाजी जाधव गुरुजींचा घोटाळा दोन कोटीवर पोहोचला आहे. दरम्यान जाधव गुरुजीला तिसऱ्यांदा दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे.



याप्रकरणी ठेवीदार योगेश पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सात जणाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी जाधव गुरुजी व त्याच्या मुलास अटक केली आहे. या दोघांना न्यायालयासमोर हजर केले असता आधी दोन दिवस व नंतर तीन आणि आता पुन्हा दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. जाधव गुरुजींना अटक केल्यानंतर फसवणूक झालेल्या ठेवीदारांनी तक्रार देण्यासाठी सदर बझार पोलिसांकडे धाव घेतली आहे. यामध्ये मंद्रूप व वडकबाळ परिसरातील ठेवीदार मोठ्या संख्येने पुढे आले आहेत. घोटाळ्याचा आकडा आता एक कोटी ९९ लाखापर्यंत गेला आहे.

तपास अधिकारी पोलीस निरीक्षक लकडे, हवालदार राहुल आवारे यांच्या पथकाने जाधव गुरुजीच्या मंद्रूप येथील घर, वांगी रस्त्यावरील शेत, सैफुल येथील घराची झाडाझडती घेतली आहे. जाधव गुरुजीने बँकेच्या व्यवहारासंदर्भात अद्याप महत्त्वाची कागदपत्रे दिलेली नाहीत. तोंडीच हिशोब ते सांगत आहेत. पोलिसांनी सीएचा रिपोर्ट घेतला आहे. त्यामुळे या बँकेची नेमकी उलाढाल किती हे अद्याप समजलेले नाही. ठेवीदार अजून तक्रार देण्यासाठी येतच आहेत. त्यामुळे हा आकडा वाढणार आहे. बँकेच्या व्यवहारातून जाधव गुरुजींनी काय काय संपत्ती जमा केली याची चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### पोलिसांशी संपर्क करावा

संत सेवालाल निधी बँक मार्फत ज्या लोकांची फसवणूक झालेली आहे अशा लोकांनी सदर बाजार पोलिसांची संपर्क साधून तक्रारी नोंदवाव्यात असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे

# ५० हजार दे नाही तर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करेन

## मनोहर नगर झोपडपट्टीतील पाचजणांवर गुन्हा दाखल; एकास अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

रिक्षा चालकास ५० हजार रूपये दे नाही तर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत मारहाण करीत सोन्याचे लॉकेट तोडून १५०० रोकड जबरदस्तीने काढून घेतल्याप्रकरणी पाजजणांवर सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबबात रिक्षाचालक बालाजी गंगाराम जगताप (वय ४९, रा. मार्डी, ता. उत्तर सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन प्रताप शिवराज भोसले (वय २५), शिवराज भोसले (वय २९), करण भोसले (वय २६), कृष्णा भोसले, आणि शिवराज कट्टीमणी (वय ३०, सर्व रा. मनोहर नगर झोपडपट्टी, आडवा नळ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील प्रताप भोसले यास पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्यास पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.




बालाजी जगताप हे रिक्षाचालक आहेत. ५ ऑगस्ट रोजी सकाळी ९ च्या सुमारास मार्डी रिक्षा स्टॉप येथे प्रताप भोसले याने रिक्षात प्रवासी बसवण्याच्या कारणावरून बालाजी जगताप यांच्याशी वाद करून भांडण उकरून काढले. प्रताप भोसले याने त्याचे वडील व भाऊ यांना मार्डी येथे बोलावून घेतले. या सर्वांनी मिळून जगताप यांना ५० हजार रुपये दे नाही तर तुझ्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करीन अशी धमकी देऊन जगताप यांना मारहाण करून त्यांच्या गळ्यातील १५ हजार रुपये किंमतीचे अर्धा तोळ्याचे लॉकेट तोडले आणि त्यांच्या खिशातील १५०० रुपयांची रोकड जबरदस्तीने काढून घेतली. म्हणून सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी प्रताप भोसले यास अटक केली असून त्यास न्यायालयाने पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. पोलिस उपनिरीक्षक कांबळे पुढील तपास करीत आहेत.





सोलापूर : नागपंचमीच्या पूर्वसंध्येला शहरात गुरुवारी महिलांनी नवीपेठेत हातावर मेंहदी काढून घेण्यासाठी गर्दी केली होती. दुसऱ्या छायाचित्रात महिलांचा खरेदी करताना टिपलेला क्षण. (छायाचित्र : केवल तिवारी)

## संक्षिप्त वृत्त

### डॉल्बी सिस्टिम लावून नाचकाम; टेम्पो मालक-चालक, डॉल्बीच्या मालकावर गुन्हा

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

सोलापूर-पुणे महामार्गावरील जुना पूना नाका परिसरातील नागोबा मंदीरसमोर महामार्गावर टेम्पोमध्ये डॉल्बी सिस्टिम लावून नाचकाम करणाऱ्या मुलांना थांबविण्यास गेलेल्या पोलिस कर्मचाऱ्यास धक्काबुक्की करणाऱ्या टेम्पो चालक-मालक व डॉल्बी सिस्टिमच्या मालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिस शिपाई प्रविण भोसले यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन टेम्पो क्र. एमएच १३ बी ०८२५ चा चालक व मालक आणि त्यावरील डॉल्बी सिस्टिचा मालक यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ ऑगस्ट रेजी दुपारी अडीचच्या सुमारास नागोबा मंदीर येथील पुणे महामार्गावर डॉल्बी लावून मुले नाचत असल्याचे पोलिस कर्मचारी भोसले यांना दिसले. त्यामुळे त्यांनी त्यांना पोलिस ठाण्याकडून परवानगी न घेता डॉल्बी कसा काय चालू केला याबाबत विचारणा केली असता टेम्पो चालक-मालक व डॉल्बी सिस्टिमच्या मालकाने) मुला कोणतीही परवानगी लागत नाही म्हणून पोलिस कर्मचाऱ्यास ढकलून दिले व धक्काबुक्की करून डॉल्बी बंद करायची नाही, तुम्हांला जे करायचे आहे ते करा असे म्हणून शासकीय कामात अडथळा आणला. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.

### काळी मशिद परिसरातून दोन दुचाकी लंपास

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

मुरारजी पेठेतील काळी मशिद परिसरातून चोरट्याने ५० हजार रुपये किंमतीच्या दोन दुचाकी चोरून नेल्या. याबाबत नागेश चंद्रकांत गिरी (वय ३२, रा. घर नं. १०२, सरवदे नगर, आदर ऊर्द शाळेजवळ, मुळेगाव रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ ऑगस्ट रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास नागेश गिरी यांनी त्यांची एमएच १३ डीके ६६१८ क्रमांकाची दुचाकी तसेच अमोल दत्तात्रय चव्हाण यांनी त्यांची एमएच ४५ ए ०६९५ क्रमांकाची दुचाकी काळी मशिदीच्या पाठीमागे लावलेल्या होत्या. त्या दोन्ही दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार पाडवी पुढील तपास करीत आहेत.

### दहा हजारांचा हप्ता मागणाऱ्या डी. के. विरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

पान टपरी चालवायची असेल तर महिना १० हजाराचा हप्ता द्यावा लागेल अन्यथा घरात घुसून खल्लास करण्याची धमकी देणाऱ्या डी. के. विरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अर्जुन अशोक वाघमारे (वय ३३, रा. शाहीर वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मोहसीन नदाफ उर्फ डी. के. (रा. शास्त्री नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील अर्जुन वाघमारे व त्याचा मित्र आयाज शेख यांनी संत तुकाराम चौकाजवळील रिमझिम बारच्या समोर गेल्या काही दिवसापूर्वी पान टपरी सुरु केलेली आहे. १ ऑगस्ट रोजी पान टपरीवर मोहसिन नदाफ हा आला व त्याने तु इधर नई पान टपरी शुरू किया ना तो हर महिना १० हजार रुपये हप्ता दे, इधर के सब लोक मुझे हप्ता देते, मै तेरे को भी देणा पडेगा, तु अगर मुझे हप्ता नही दिया तो मैं तेरे हात पावां तोडके तुझे तेरे घरवालोंको घर मे घुसके खल्लास कर दुंगा, तु इधर धंदा कैसे कर सकता है असे जोरजोरात ओरडून धमकी दिली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

### नातेवाईकास भेटण्यास आलेल्या महिलेस हॉटेलमध्ये मारहाण

**सोलापूर, दि ८ ऑगस्ट-**

नातेवाईकांना भेटण्यासाठी हॉटेलात गेली असता, तू येथे का आली ? असे म्हणत महिलेस लाथाबुक्याने मारहाण करण्यात आली. ही घटना गुरुवारी दुपारच्या सुमारास विजापूर नाका परिसरातील रेवणसिद्धेश्वर हॉटेल येथे घडली. शिवलिंगव्वा सिद्धण्णा देसाई (वय ५०, रा. अक्कलकोट) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे . त्यांना शिवानंद शिदोरे (नातेवाईक) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. शिवलिंगव्वा देसाई या दुपारी १२ वाजेच्या सुमारात रेवणसिद्धेश्वर हॉटेल येथे नातेवाईकास भेटण्यास गेल्या होत्या. त्यावेळी तू येते का आली. असे म्हणत लक्ष्मी सिद्धाराम देशट्टी व इतर दोघांनी मिळून त्यांना मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

# पात्र मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्या

## विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

१ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार नोंदणी अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित मतदार यादी पुनर्रीक्षण कार्यक्रम आढावा बैठकीत विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपायुक्त पूनम मेहता, अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, मनपा उपआयुक्त मच्छिंद्र घोलप, जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी वीणा पवार उपस्थित होते.

मतदार यादीमध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी राहणार नाही व एकही पात्र मतदार येणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये मतदानापासून वंचित राहणार नाही याची खात्री मतदान अधिकारी यांनी करून घ्यावी, असे त्यांनी सूचित केले. ज्या मतदारांना तपशिलामध्ये दुरूस्त्या करावयाच्या असतील त्यांनी अर्ज क्रमांक ८ भरावा. विशेष संक्षिप्त पुर्ननिक्षण कार्यकम अंतर्गत एखाद्या मतदारासंघातील एखादा मतदार, यादीत दिलेल्या पत्यावर राहात नसेल, तर अशा नावाबद्दल त्याच मतदारसंघातील एखदा मतदार आक्षेप घेऊ शकतो. त्यामध्ये जर तथ्य आढळून आले तर पडताळणी करून संबंधित मतदाराच्या नावाची वगळणी केली जाते. मतदार याद्यांचे अद्यावतीकरण होण्यासाठी अशा अपात्र मतदारांची नावे वगळताना मतदार अधिकारी यांनी योग्य खबरदारी घ्यावी असे निर्देश डॉ. पुलकुंडवार यांनी दिले.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पीपीटीद्वारे मतदार नोंदणी, दुरूस्ती व वगळणी यासाठी १० व ११ ऑगस्ट व १७ व १८ ऑगस्ट या दिवशी विशेष संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रम राबविला जाणार असून, या दिवशी प्रत्येक मतदान केंद्रावर BLO मतदार यादीसह उपस्थित राहतील, तसेच २३ जानेवारीच्या अंतिम मतदार यादीमध्ये एकूण मतदार ३५ लाख ७८ हजार ९७२ इतकी होती, तसेच लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४, ३६ लाख ५६ हजार ८३३ इतकी होती. आज दि.६ ऑगस्ट २०२४ रोजी सदर मतदार संख्या ही ३६ लाख ९२ हजार ४०९ इतकी असून यामध्ये पुरूष- १९ लाख ८ हजार १४६, महिला-१७ लाख ८३ हजार ९६६ व इतर २९७ मतदारांचा समावेश आहे. यामध्ये लोकसभेच्या तुलनेत ३५ हजार ५७६ इतक्या मतदारांची वाढ झाल्याची माहिती त्यांनी दिली.

### आरडीसी यांनी महसूल पंधरवड्याची दिली माहिती

निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी दिनांक १ ऑगस्ट पासून सुरू झालेल्या महसूल पंधरवडा अंतर्गत आज रोजी पर्यंत घेण्यात आलेल्या विविध उपक्रमाची माहिती विभागीय आयुक्त डॉक्टर पुलकुंडवार यांच्यासमोर सादर केली. मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कार्यक्रम मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना आधीची माहिती बैठकीत सादर करण्यात आली.

### आसार मैदान येथे मारहाण तरुण जखमी

**सोलापूर, दि ८ ऑगस्ट-**

मोबाईलवर एसएमएस पाठवण्याच्या कारणावरून चाकू आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत दाऊद बाबूलाल शेख (वय ३२ रा.शास्त्रीनगर) हा विवाहित तरुण जखमी झाला. ही घटना आसार मैदान येथे गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात रेहान शेख (मित्र) यांनी दाखल केले. जखमी दाऊद शेखला तुझी भाची माझ्या बायकोस सारखे एसएमएस करते. ते करू नको, असे तिला समजावून सांग, असे म्हणाला होता. त्यावेळी तुला काय करायचे? असे म्हणत सोहेल शेख, रफिक शेख आणि इतर तीन जणांनी त्याला मारहाण केली आहे.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● निवासी संपादक : **प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# ‘तरुण भारत’च्या आजी-माजी कर्मचाऱ्यांचा आज स्नेहमेळावा

**सोलापूर, दि.८ ऑगस्ट-**

क्रांतीदिनी ९ ऑगस्ट रोजी दैनिक तरुण भारतच्या आजी-माजी कर्मचाऱ्यांचा मेळावा इंडस्ट्रियल इस्टेट सभागृह, दैनिक तरुण भारतच्या पाठीमागे, होटगी रोड येथे सकाळी १०.३० वाजता आयोजित केला आहे. या कार्यक्रमास ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांचे दिव्य सानिध्य लाभणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य संपादक दिलीप पेठे असणार आहेत. यावेळी शरणप्पा शाबादे यांचा सेवानिवृत्ती आणि एकसष्टीनिमित्त सत्कार करण्यात येणार आहे. तसेच माजी संपादकांचाही सत्कार आणि वयाची ६१ पूर्ण झाली आहेत अशांचा सन्मान करण्यात येईल. तरी या स्नेहमेळावा सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## क्राईम वृत्त...

### चूल पेटवताना आगीच्या भडक्यात विवाहितेचा भाजून मृत्यू; मुलगा जखमी

**सोलापूर, दि ८ ऑगस्ट-**

चूल पेटवताना आगीच्या भडक्यात ४५ वर्षीय विवाहीता भाजून मयत झाली. त्यांना वाचविताना २४ वर्षीय मुलगा हा देखिल किरकोळ भाजून जखमी झाला.ही घटना केगावतांडा (ता. उत्तर सोलापूर) येथील शिवाजीनगरात गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. रुक्मिणी हरिदास राठोड (वय ४५ रा. शिवाजीनगर केगाव तांडा, उत्तर सोलापूर ) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या आज गुरुवारी सकाळी ६ वाजेच्या सुमारास घरासमोर चूल पेटवत होत्या. चुलीत तेल ओतताना अचानक आगीचा भडका उडून अंगावरील कपडे पेटल्याने त्या गंभीर भाजल्या. त्यांना वाचविताना विकास हरिदास राठोड (वय २४) हा देखील भाजून किरकोळ जखमी झाला होता. दोघांनाही उपचारासाठी शासकीय रुग्णालयात हरिदास राठोड यांनी दाखल केले होते. त्यापैकी रुक्मिणी राठोड या उपचारादरम्यान दुपारी २ वाजेच्या सुमारास मयत झाल्या. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.

### अज्ञात चोरट्याने महागडा मोबाईल पळविला

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

सिव्हिल हॉस्पिटल मधील ए ब्लॉक मेल वार्ड बेड क्रमांक एक येथून ८० हजार रुपये किमतीचा एप्पल कंपनीचा आयफोन १५ हा मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ७ ऑगस्ट रोजी घडली.याप्रकरणी योगेश गुणवंत वढणकर (वय-२४,रा.मूळ गुप्तरोड,जठार पेठ, अकोला,सध्या-वॉटर फ्रंट,पत्रकार भवन चौक,सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोहेकॉ.फुटाणे करीत आहेत.

## दैनिक तरुण भारतच्या ४०व्या वर्धापन दिनास शुभेच्छा देणारे मान्यवर



सोलापूर : भारतमातेचे पूजन मुख्य संपादक दिलीप पेठे यांनी केले. यावेळी निवासी संपादक प्रशांत माने व संपादकीय स्टाफ.



विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे.



म्हाडा सोलापूरचे अभियंता मिलींद आटकळे.



राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक नितीन धार्मिक.



शुभेच्छा देताना सुनील दावडा व जान्हवी माखिजा.



शुभेच्छा देताना सोमश वैद्य



भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, बालाजी बनसोडे.



डॉ. व्यंकटेश मेतन व सिद्धाराम सक्करगी.



पु.अ. होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य धन्यकुमार बिराजदार



म.सा.प.चे पद्माकर कुलकर्णी, गिरीश दुनाखे, प्रकाश केकडे.



श्रीकांत खानापुरे, अविनाश कुलकर्णी, विनायक व्हटकर,बसवराज बिराजदार.



पचांगकर्ते श्री. मोहन दाते.



अक्कलकोट भाजपाचे नेते रमेश पाटील.



सीमा यलगुलवार, गीता भूदत्त, मेघा इट्टम.




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८५५

**आम्ही विष्णूचे दास । न मानू आणीक देवास ।।**
**स्तुती आणिकांची करिता । ब्रम्हहत्या घडे माथां ।।**

बोटावर मोजता येण्याइतपत म्हणजेच ज्यांना जीवन म्हणजे नेमके काय आहे, हे कळते असे लोक सोडले तर संसारात अडकलेले बहुतांश जीव अवास्तव इच्छा, अपेक्षा करीत असतात. या इच्छा, अपेक्षांच्या पूर्तीसाठी सांसारिक जीव केव्हाही, कांहीही करायला तयार होतो. दैनंदिन जीवनात परिस्थितीनूरुप तो मित्रही बदलतो. ज्यावर विश्वास आहे किंवा जो त्याच्यावर विश्वास करतो त्याच्यापासूनही दूर जाण्यात हा जीव कमी करत नाही. माणसांचे तर सोडाच, साक्षात भगवंत बदलण्याचीही त्याची तयारी असते. आज एका देव-



ाला तर उद्या दुसऱ्या देवाला नवस करायला किंवा त्याच्या पूजापाठाला तो तयार होतो. एका देवावर विश्वास ठेवून त्याच्या भक्तित रमणारे कमी भक्त आहेत. काहींना तर तेह-तीस कोटी देवही पुरत नाहीत. हे सर्व केवळ इच्छा, अपेक्षांच्या पूर्तीसाठी घडते. ज्याला भौतिक व नाशवंत प्रकारची कसलीच इच्छा, अपेक्षा नाही, असा जीव एका भगवंताच्या ठिकाणी स्थिर होतो. सेनाजी हे भौतिक व नाशवंत सुखापासून अलिप्त असल्याने ते त्यांच्या,

**आम्ही विष्णूचे दास । न मानू आणीक देवास ।।, स्तुती आणिकांची करिता । ब्रम्हहत्या घडे माथां ।।**

या म्हणण्याप्रमाणे एका विष्णूच्या ठिकाणी स्थिर आहेत. ते इतर देवदेवता शोधण्यात वेळ घालवू इच्छित नाहीत. आपणालाही एका ठिकाणी स्थिर होता आले तर निश्चितच बरे होईल.

संत सेनाजी इतर देवदेवतांची व संसारात अडकलेल्या माणसांचीही स्तुती करीत नाहीत. स्तुती अजिबात आवडत नाही असा माणूस सापडणे तसे खरेच कठीण आहे. समोर जरी एखादा म्हणत असेल की, मला मोठेपण देऊ नको, माझी स्तुती करू नको, तरी पण कांही अंशी का होईना; पण त्याला मनात आनंद हा होतच असतो. म्हणूनच लोक कीर्तन, प्रवचन, व्याख्यान, जेवण, कार्यक्रम होऊन गेल्यानंतर कसे काय झाले, असे विचारतात. असे विचारण्यामागे समोरच्याने व्वा फार छान होते, असे म्हणावे ही अपेक्षा असते. आमच्याकडे चांगले काय ते सांगू नका, कमी काय ते सांगा असे जरी कोणी म्हणत असेल तरी तेथेही कांही अंशी का होईना जे उपलब्ध आहे, त्याबद्दल समोरच्याने दोन शब्द चांगले बोलावेत ही अपेक्षा असतेच. असो ही नैसर्गिक वृत्ती आहे. सत्याबद्दल सत्य,चांगल्याबद्दल चांगले बोलणे आवश्यकही असते. केवळ समोरच्याला बरे वाटावे म्हणून बोलणे योग्य नसते. काहींचे आयुष्य तर केवळ इतरांची स्तुती करण्यात जाते. पण संत महात्म्यांच्या बाबतीत असे घडत नाही. सामान्याची तर सोडाच; पण ते ज्या एका ईश्वरावर त्यांची श्रध्दा आहे, त्याला वगळता ते इतर देवदेवतांची सुध्दा स्तुती करत नाहीत. सेनाजींचे सुध्दा असेच आहे. ते एका पांडूरंगाशिवाय इतर कोणची स्तुती करत नाहीत. आनंदासाठी व अनुभूतीसाठी आपणालाही एका देवाच्या ठिकाणी स्थीर होता आले पाहीजे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार**
**दि. ९ ऑगस्ट २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - श्रावण**
**शु. पंचमी (२७.१३)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र- हस्त (२६.४३)**
**योग - सिध्द (१३.४४)**
**करण - बव (१३.५४)**
**दिनविशेष - नागपंचमी, जागतिक आदिवासी दिन, ऑगस्ट क्रांतिदिन, महालक्ष्मी स्थापना**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : व्यापारात नवीन योजना आखताल. राजकीय किंवा शासनाकडून मान सन्मान मिळण्याचे योग आहेत. आरोग्याची काळजी घ्या.

**वृषभ** : जमीनी संदर्भातील व्यवहार सुरळीत पार पडतील. प्रभावपूर्ण वातावरण राहील. व्यवसायिक करार फायदेशीर ठरतील.

**मिथुन** : आपल्या सल्ला घेतला जाईल. रोजगारात विस्तार होण्याची शक्यता आहे. अनोळखी व्यक्तिवर विश्वास दाखवू नका.

**कर्क** : विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने समाजात मान मिळेल. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**सिंह** : प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे.

**कन्या** : व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन कामाची योजनेमुळे फायदा होईल. मेहनतीचे उचीत फळ मिळेल. मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ** : चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक** : सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा. आपल्या पराक्रमवृत्तीमुळे आपल्याकडे येणाऱ्या लोकांचा ओढा जास्त राहील. कोणाचाही तिरस्कार करू नका.

**धनु** : न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या.

**मकर**: अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा. विशेष सहकार्य व मार्गदर्शन मिळेल. विलासी प्रवृत्ती वाढेल.

**कुंभ** : प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल. आर्थिक लाभ होईल.

**मीन** : आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. आपल्या कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे.

# भारतातील प्राचीन मंदिरे स्थापत्य अभियांत्रिकीची अद्भुत रचना : डॉ. मेतन

## परमपूज्य महातपस्वीश्री कुमारस्वामीजी महोत्सवानिमित्त व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

भारतातील प्राचीन मंदिरे हे स्थापत्य अभियांत्रिकेची अद्भुत रचना आहे असे प्रतिपादन डॉ. वेंकटेश मेतन यांनी केले.

परमपूज्य महातपस्वीश्री कुमारस्वामीजींच्या ११५ व्या जयंती महोत्सवानिमित्त व्याख्यानमाला व सांस्कृतिक कार्यक्रमाचे पहिले पुष्प गुंफताना प्राचीन भारतीय मंदिरे व त्यांची वैशिष्ट्ये या विषयावर ते बोलत होते.

डॉ. मेतन पुढे म्हणाले, दक्षिणेतील मंदिरे ही चालुक्य आणि पुलकेशी या राजवटीतील असून त्यात द्रविड संस्कृतीचा प्रभाव आहे. शिवमंदिर यांची रचना त्यामध्ये गोपूर, कीर्तीमुख, गणेशपट्टी, नंदी, कासव, गाभारा,



शिखर, कळस,दीपमाळा, नागशिल्प याबद्दल सूक्ष्म माहिती त्यांनी दिली. त्यामागील शास्त्रीय उद्देश त्यांनी सांगितला. यादवकालीन हेमाडपंथी मंदिराची रचना याबद्दल माहिती दिली. हेमाडपंथी मंदिरे विशेषतः महाराष्ट्रात आहेत असे त्यांनी सांगितले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी अनेक मंदिराचे जीर्णोद्धाराचे कार्य केल्याचे हे सांगितले. त्यांनी तंजावर, हंपी, जगन्नाथपुरी, तिरुपती बालाजी, इत्यादी मंदिराची वैशिष्ट्ये सांगितले. प्राचीनमंदिरे ही वास्तुशास्त्रा प्रमाणे असून वास्तुपुरुषाच्या आधारावर आहेत असे सांगितले . मंदिरात गेल्यानंतर भाविकांनी दर्शन घेण्याच्या पद्धती बद्दल विवेचन केले. या संबंधात महिलांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते श्री च्या मूर्तीचे पूजन होऊन भक्ती गीताने झाली. तदनंतर आंतरराष्ट्रीय प्रार्थना योग मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांनी कार्यक्रमाचा उद्देश व परम पूज्य श्री कुमारस्वामीजी यांचे कार्य हे आपल्या प्रास्ताविकात करून मान्यवरांचे व उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. व्यंकटेश मेतन यांचा सत्कार शाल, पुष्पगुच्छ व ग्रंथ देऊन संस्थेचे उपाध्यक्ष श्री निळकंठप्पा कोनापुरे यांनी केले. दैनिक सकाळचे संपादक श्री अभय दिवाणजी यांचा सत्कार संस्थेचे सचिव बाबासाहेब कुलकर्णी यांनी केले. प्रमुख व्याख्याते डॉ. व्यंकटेश मेतन यांचा अल्पपरिचय संस्थेचे विश्वस्त विश्वनाथ म्हेत्रे यांनी केले. कार्यक्रमास बहुसंख्य महिला उपस्थित होत्या. उषा लोणी, संध्यारजनी दानवे, प्रतिभा मंगळूरकर, हिरा कुंभार, सावित्री मुंडेवाडीकर, विंचुरकर, सुभाष कुलकर्णी, दयानंद माशाळकर, बाळासाहेब नष्टे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागनाथ चौगुले यांनी केले तर आभार प्रदर्शन बाबासाहेब कुलकर्णी यांनी केले. सामूहिक मंगल आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.



# मोफत नेत्र तपासणी शिबिराचा ३०० जणांना लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

बाळीवेस परिसरातील संत नामदेव विठ्ठल मंदिरात श्री संत शिरोमणी नामदेव महाराज परिवार व संत जनाबाई यांच्या ६७४ व्या संजीवनी समाधी सोहळ्या प्रित्यर्थ मिश्रीबाई मुलाबचंद तोष्णीवाल नेत्रपेढी व श्री नामदेव विठ्ठल मंदीर विश्वस्त मंडळ यांच्यावतीने मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर घेण्यात आले. शिबीरात तब्बल ३०० पेक्षा जास्त लोकांनी सहभाग नोंदविला व त्यापैकी ५० नेत्ररुग्णांची मोफत नेत्रशस्त्रक्रियासाठी निवड करण्यात आली.

प्रारंभी डॉ. नवनीत तोष्णीवाल आणि मनीष केत, डॉ. निखील तोष्णीवाल, डॉ. आयुषी तोष्णीवाल, मुरलीधर रेळेकर यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमासाठी दक्षिण अमेरिकेतील इक्वेडोर देशातील हॅवीअर, डॉ. जमेल हे नेत्रतज्ञ व डॉ. माहेश्वरी हे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेश बुरांडे, चंद्रकांत जवंजाळ, बाळकृष्ण राशिनकर, नागेश राशिनकर, सचिन बारटक्के, वासुदेव सोडाळ, गोवर्धन निकते, मनोज भस्मे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शिवराज नगरकर यांनी केले तर आभार प्रदर्शन गणेश राशिनकर यांनी केले.

# प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे काम कौतुकास्पद

## उपशिक्षणाधिकारी रूपाली भावसार; गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हातील खासगी प्राथमिक शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय आणि आर्थिक पाठबळ देण्याच काम कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी रूपाली भावसार यानी व्यक्त केले.

नुमवि शाळेच्या सभागृहात सोलापूर जिल्हा खासगी प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर सेवक सहकारी पतसस्थेच्या वतीने आयोजिलेल्या गुणवत विद्यार्थी पारितोषिक वितरण आणि सेवानिवृत्त तसेच आदर्श शिक्षक शिक्षकेतर सत्कार समारभात प्रमुख पाहुणे म्हणून भावसार बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे जिल्हा शिक्षक महासंघाचे अध्यक्ष नारायण शिदे होते. वैभव राऊत लेखाधिकारी शिक्षण जिल्हा सोलापूर याची प्रमुख



उपस्थिती होती. यावेळी सचिव जितेंद्र पायगुडे, शशिकात केंद्रे, संजय घोडके, अतुल यादव, ज्ञानेश्वर गायकवाड, राजश्री तडकासे, नूरजहाँ पेरमपल्ली, रमेश बेडगे, विश्वजीत माणिकशेट्टी, विद्या शिपी, आरती गायकवाड, शोभा चव्हाण, सगीता सक्करगी, शरद शिंदे आदी संचालक उपस्थित होते.

शिक्षक महासंघाचे जिल्हाअध्यक्ष आणि पतसंस्थेचे चेअरमन कलप्पा फुलारी यांनी प्रास्ताविक केले. लेखाधिकारी वैभव राऊत यानी सेवापुस्तक अद्यावत असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन करून मार्गदर्शन केले. महासघांचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड आणि पुणे जिल्हा अध्यक्ष नारायण शिदे यानी संघटनेचे महत्व विशद करून पतसंस्थेच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सेवनिवृत्त शिक्षकांना पूर्ण आहेर, बुके, सन्मान चिन्ह, लेखणी देऊन तर गुणवत शिक्षिकेस शाल, सन्मान चिन्ह, लेखणी देऊन सन्मान करण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह, रोख रक्कम आणि गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका निकहत शेख आणि गुणवत शिक्षिका आशा भागे यानी पतसंस्थेप्रती आपले विचार व्यक्त केले. सूत्रसंचलन पतसंस्थेचे सचालिका शोभा चव्हाण यांनी केले तर आभार सचिव महादेव होमकर यानी मानले.

# आरपीएफमुळे २० मुलं सुरक्षित आपापल्या घरी

## प्रवाशांच्या साहित्य चोरीच्या गुन्ह्यांत २९ आरोपींना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

एप्रिल ते जुलै २०२४ या तीन महिन्याच्या कालावधीत रेल्वे सुरक्षा बलाने घरातून पळून गेलेल्या २० मुलांचा शोध घेत त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केले. एप्रिल ते जुलै २०२४ या तीन महिन्याच्या कालावधीत रेल्वे सुरक्षा बलाने चांगले काम करीत अनेक गुन्हे उघडकीस आणले. यामध्ये घरातून पळून गेलेल्या २० मुलांची (१४ मुले आणि ६ मुली) रेल्वे सुरक्षा विभागाने सुटका केली आणि महिला व बाल संरक्षण समितीकडे सुपूर्द केले.

त्या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले. प्रवाशांचे सामान चोरी करणाऱ्यांविरुद्ध रेल्वे सुरक्षा विभागाने सखोल मोहीम राबवून २३ गुन्हे उघडकीस आली असून २९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. रेल्वेकडून अंमली पदार्थ तस्करी विरुद्ध मोहीम राबवून २ गुन्हे उघडकीस



आणून एकूण ३ लाख ८ हजार रुपये किमतीचा ५८ किलो गांजा जप्त करण्यात आला. गांजा जप्त करून आवश्यक कारवाईसाठी लोहमार्ग पोलिसांकडे सोपवले आहे. रेल्वे गाड्यांमध्ये मालाची विक्री करणाऱ्या अवैध फेरीवाले/विक्रेत्यांवर मोहीम राबवून एकूण ८३३ अवैध फेरीवाल्यांना अटक करून त्यांना न्यायालयासमोर हजर करण्यात आले. त्याच्याकडून एकूण ७ लाख ४९ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने विभागीय रेल्वे व्यवस्थापक निरज कुमार दोहरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि रेल्वे विभागीय सुरक्षा आयुक्त आदित्या यांच्या देखरेखीखाली रेल्वे सुरक्षा विभागाने ही कारवाई केली आहे.



# विद्यापीठात क्विक हिल सायबर क्लबचे उद्घाटन

## ३० विद्यार्थ्यांची सायबर वॉरीयर्स म्हणून निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल व क्वीक हिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम राबविला जातो. या अंतर्गत विद्यापीठात सायबर क्लबचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली व क्विक हिल फाऊंडेशनच्या प्रमुख अनुपमा काटकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या उपक्रमाव्दारे समाजातील विविध घटकामध्ये सायबर गुन्हेविषयी माहिती दिली जाते. तसेच अशा प्रकारचे गुन्हे टाळण्यासाठी विविध उपाययोजना सेमीनारव्दारे सांगितले जाते. जसे की ओटीपी कोणास सांगू नये, स्ट्राँग पासवर्ड वापरावा, सोशल मिडीयावर आलेले मेसेजेस व लींकची शहानिशा करावी व आपली माहिती, ही आपली जबाबदारी असे सांगितले जाते. क्वीक हिल फाऊडेंशनने या वर्षी हा उपक्रम राबविण्यासाठी संकुलातील ३० विद्यार्थ्यांची सायबर वॉरीयर्स म्हणून निवड केली आहे. तसेच ४ विद्यार्थ्यांची सायबर क्लब ऑफीसर्स म्हणून निवड केली आहे. सायबर क्लबमध्ये मालती जाधव (प्रेसीडेंन्ट), सायली शेळके (सेक्रेटरी) शंकुतला बेल्ले व सुप्रीया शिंदे यांची निवड केली आहे. संचालक प्रा.व्हि.बी. घुटे यांनी प्रास्ताविक केले. प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, डॉ. आर. एस. मेंते, डॉ.ए. आर. शिंदे, डॉ. एस. डी. राऊत, डॉ. जे. डी. माशाळे, सी.जी. गार्डी तसेच डॉ. ए.एस. साखरे, संदीप पोटे, सुधीर वाघमारे उपस्थित होते. सूत्रसंचालन कांचन निकंबे व सयी आवताडे यांनी केले.

# डॉ. गौरी बाचल यांचा विशेष सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

सोलापुरातील सुप्रसिद्ध डॉ. गौरी प्रभाकर बाचल यांचा संत नामदेव भक्त सेवा प्रतिष्ठान भोसरी, पुणे यांच्यातर्फे विशेष सत्कार

संत नामदेव भक्त सेवा प्रतिष्ठान भोसरी स्थापना २१-२-२००० मध्ये झालेली आहे.दरवर्षी रांगोळी स्पर्धा,भजन स्पर्धा, आरोग्य शिबिर, शिक्षक दिन, महिला दिन, ज्येष्ठ नागरिक सन्मान,ज्येष्ठ नागरिक संघ स्थापना असे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.

मागील तीन वर्षांपासून श्री. नामदेव महाराजांची जयंती सोहळा मोठ्या प्रमाणात पार पडत आहे. ज्येष्ठांचा मानचिन्ह देऊन सत्कार, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, एकूण ६५ श्री नामदेव गाथा व चरित्र पुस्तकांचे वाटप असेही कार्यक्रम आयोजित केलेले



आहेत. भजन,भारुड, हरिपाठ हे नित्यनियमाने होत आहे. यंदाच्या वर्षी नवीन उपक्रम राबवत समाजातील एकूण सात डॉक्टरांचा सन्मान करण्यात आलेला आहे. तसेच संत नामदेव समाजभूषण जीवनगौरव पुरस्कार सुरू केलेला आहे व या वेळेचे वैशिष्ट्य म्हणजे दुसऱ्या जिल्ह्यातील संत नामदेव शिंपी समाजातील डॉक्टरांचा त्यांच्या कार्याचा आढावा घेऊन त्यांचा सुद्धा गुणगौरव करण्यात आलेला आहे. सोलापूर येथील डॉ. गौरी बाचल यांच्या कार्याची दखल घेत त्यांना श्रीफळ, गुलाब पुष्प व मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. संत नामदेव शिंपी समाजातर्फे डॉ. गौरी बाचल यांचा सलग पाचव्यांदा सत्कार होत आहे. यामुळे त्यांचे विशेष कौतुक केले. मंदिर समितीचे अध्यक्ष अरुण क्षीरसागर, कार्याध्यक्ष सुधीर बकरे सहकार्यादक्ष सुरेश पाटसकर, खजिनदार वामन बोरकर व सहखजिनदार सूर्यकांत हिरवे यांनी कार्यक्रमाचे सहसंयोजन केले. हा कार्यक्रम अतिशय सुंदर रित्या संपन्न झाला.

# रावजी सखाराम हायस्कूलचे शिक्षक अण्णा दीक्षित सेट परीक्षा उत्तीर्ण

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

सम्राट चौकातील रावजी सखाराम हायस्कूल मधील सहशिक्षक आण्णा बाबू दिक्षित हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाद्वारे घेण्यात आलेल्या सहाय्यक प्राध्यापक पदासाठीच्या पात्रता परीक्षेत (सेट) शिक्षणशास्त्र विभागातून उत्तीर्ण झाले आहेत. विद्यापीठाच्या सेट विभागातर्फे महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांसाठी सेट परीक्षा घेतली जाते. त्यानुसार ३९ वी सेट परीक्षा ७ एप्रिल रोजी राज्यातील १७ शहरांमधील केंद्रांवर घेण्यात आली होती. या परीक्षेत पात्र ठरलेल्यांची टक्केवारी ६.६६ आहे. नुकताच त्यांना विद्या विकास प्रतिष्ठानचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेला आहे. ते अष्टपैलू व उपक्रमशील शिक्षक असून उच्चशिक्षित आहेत. त्यांच्याकडे बी.एस्सी., एम.एस्सी. मॅथेमॅटिक्स, एम.ए. इंग्लिश, बी.एड., एम.एड., डी.एस.एम., एम.सी.जे. अशा



सात पदव्या आहेत. सध्या ते शिक्षण शास्त्र विभागातून पीएच.डी. करत आहेत. आण्णा दिक्षित सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल संस्थेच्या मध्य विभागाचे कार्याध्यक्ष संजीव पाटील, डॉ. सुरेश ढेरे, स्थानिक व्यवस्थापन कमिटीचे सदस्य केतन शहा, उद्योजिका माधुरी पाटील, प्रख्यात कर सल्लागार धीरज जवळकर, प्रभारी मुख्याध्यापक संतोष वालवडकर, मुख्याध्यापिका निलीमा सिरसाठ, अमर देशमुख, चंद्रकला भोरे यांनी अभिनंदन केले आहे.

# आडम मास्तरांना आमदार करण्याचा निर्धार

## तेलुगू भाषिक मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ८ ऑगस्ट -**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरात चांगले राजकीय वातावरण तापले आहे. शहर मध्य विधानसभा जागेसाठी माजी आमदार आडम मास्तर यांनी तयारी सुरू केली आहे. त्या तयारीला तेलुगु भाषिक तरुणांनी ऊर्जा देत आडम मास्तर यांना आमदार करण्याचा निर्धार केला आहे.

बुधवारी कॉ. गोदूताई परुळेकर महिला विडी कामगार वसाहत कुंभारी येथे स्थानिक सर्व तेलुगू भाषिक तरुणांचा मुरलीधर सुंचू यांच्या अध्यक्षतेखाली मेळावा पार पडला. यावेळी स्थानिक तरुणांनी वसाहतीतील समस्यांबाबत चर्चा केली. प्रामुख्याने वसाहतीत घनकचरा व्यवस्थापन, स्मशानभूमी, अवैध धंदे, बेकायदेशीर दारू अड्डे, बेरोजगार तरुणांना रोजगारराच्या संधी, विद्यार्थिनींनी साठी वरिष्ठ महाविद्यालय, महिलांसाठी घरगुती काम यासंबधी मास्तरांनी योग्य ती मदत करावी अशा



अपेक्षा व्यक्त केले.

आडम म्हणाले की, निरंतर परिश्रमातून गोदूताई वसाहतीत लोकांच्या पिण्याची पाण्याची टंचाई दूर केली आहे. वसाहतीत सर्व तेलुगू भाषिक लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत.ही एकी चिरंतन राहावी. आपल्या श्रद्धा प्रती मी प्रचंड आदर करतो.तरुणांनी मांडलेले मुद्दे हे अत्यंत महत्त्वाचे व कळीचे आहेत.त्याला न्याय देण्यासाठी मी कटिबद्ध आहे.तरुण हे या देशाचे भवितव्य असून ते आज अंधारात चाचपडत आहे.हे अत्यंत गंभीर आहे. एवढेच नसून

यावेळी अशोक इंदापूरे, ॲड.अनिल वासम, अशोक बल्ला आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी व्यापीठावर मधुकर पुठ्ठा, नितीन यादगिरी, बालाजी कोडम, रवि गेंट्याल, राजू मिठ्ठा आदी तरुण कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन विजय हरसुरे व आभार प्रदर्शन योगेश आकीम यांनी केले. मेळावा यशस्वी करण्यासाठी दिनेश बडगु, नरेश गुल्लापल्ली, शाम आडम, चंटी बिटला, बाळकृष्ण मल्याळ, मधुकर चिल्लाळ, बालाजी तुम्मा, नागेश जल्ला, कुमार येलगेटी, प्रभाकर गेंट्याल, राजेंद्र गेंट्याल, राधा गोपालबंडी आदींनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### हिंदी सुलेखन बोध परीक्षेत सद्गुरू धुळेश्वर शाळेचा १०० टक्के निकाल

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

महाराष्ट्र राज्य हिंदी शिक्षक महामंडळ, पुणे यांच्याकडून २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या हिंदी सुलेखन बोध परीक्षेत मंद्रूपच्या सद्गुरू धुळेश्वर शाळेचा १०० टक्के निकाल लागला असून एकूण २८ विद्यार्थी ह्या परीक्षेत सहभागी झाले होते. त्यापैकी ८ विद्यार्थी विशेष योग्यतासह १४ विद्यार्थी प्रथम श्रेणीसह आणि ६ विद्यार्थी द्वितीय श्रेणी घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष अप्पासाहेब काळे, सहसचिव प्रमोद व्हनकोरे, मुख्याध्यापक सुलोचना पाटील यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक यांनी देखील विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. परीक्षेचे कामकाज काशिनाथ रगटे यांनी पाहिले.



### अक्कलकोट तालुका कबड्डी स्पर्धेला सुरुवात

**अक्कलकोट, दि. ८ ऑगस्ट-**

अक्कलकोट स्टेशन-श्री काशीविश्वेश्वर प्रशाला जेऊर येथे अक्कलकोट तालुकास्तरीय १४, १७ व १९ वर्ष शालेय कबड्डी स्पर्धेस सुरवात झाली. याचे उद्घाटन जेऊरचे माजी सरपंच शिवाजी कलमदाणे यांच्या हस्ते मैदानी पूजनाने करण्यात आले. यावेळी उपसरपंच काशीराया काका पाटील, अंबाराया कतोजी, सुभाष पाटील, शिवराज बोरीकरजगी, मुख्याध्यापक महेशकुमार चानकोटे, तालुका क्रीडा समन्वयक परमेश्वर व्हसुरे, उपप्रमुख नागराज कलबुर्गी, प्रमुख उमेश नेवाळे, दत्तात्रय हिळी, प्रकाश ननवरे, सचिन गडसिंग, प्रकाश सोनटक्के यांच्यासह तालुक्यातील क्रीडा शिक्षक खेळाडू उपस्थित होते. या स्पर्धेसाठी पंच अविनाश राठोड, गोविंद राठोड, रविकिरण इंगळे, कुमार जाधव, कल्याणी लकशेटी, सोहेल शेख, धोंडू राठोड, दयानंद उटगे, एकनाथ मोसलगी, परमेश्वर पाटील, फारुख शेख, बाबू पवार, विजय खोबरे, पंचप्पा सोनकवडे, रमेश सोनकर तुकाराम शिंदे,राठोड कांबळे आदी यांनी काम पाहिले.



### सागर कल्याणशेट्टी यांचा सेनेतर्फे सत्कार

**अक्कलकोट, दि. ८ ऑगस्ट-**

शिवसेना प्रणित कामगार सेना अक्कलकोट तालुक्याच्या वतीने हन्नूरचे माजी सरपंच युवा नेते सागर कल्याणशेट्टी यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. युवा नेते सागर कल्याणशेट्टी यांचा शाल, पुष्पहार देऊन फेटा बांधून कामगार सेना तालुकाप्रमुख स्वामीनाथ हेगडे, कामगार सेना तालुका उपप्रमुख परशुराम जाधव, कामगार सेना शहर उपाध्यक्ष आकाश बबलाद, शहर उपाध्यक्ष लक्ष्मण पुजारी आदी पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना कामगार सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



### मैंदर्गी येथे राष्ट्रीय हातमाग दिन साजरा

**मैंदर्गी, दि. ८ ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील कोष्टी समाजातर्फे देवरदासिमय्या यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय हातमाग दिन राष्ट्रीय नेकार दिन म्हणून साजरा करण्यात आला यावेळी अभिनव रेवणसिद्ध पट्टदेवरु, मृत्युंजय महास्वामी, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, महेश शावरी, सुरेखा होळीकट्टी, सुरेश नागूर, बसवराज पाटील, चैतन्य जावळकोटी, बसवराज गोब्बूर, बसवराज वच्चे, गुरनिंगप्पा गोब्बूर, मल्लिनाथ सलगर, रेवणसिद्ध हुलमनी, शिवचलप्पा मड्डे, गुरू म्हेत्रे, धानप्पा गुंडद, मल्लिकार्जुनप्पा मड्डे उपस्थित होते. याप्रसंगी दहावी व बारावीतील गुणवत्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

### खांडवी येथील सोजर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये केंद्रीय प्रवेश प्रक्रिया सुरु

**बार्शी, दि. ८ ऑगस्ट-**

तालुक्यातील खांडवी येथील सोजर कॉलेज ऑफ फार्मसी हे प्रथम वर्ष बी. फार्मसी व डी. फार्मसीकरिता सुविधा केंद्र घोषित करण्यात आले आहे. सदर सुविधा केंद्रावर बी. फार्मसी व डी. फार्मसीचे प्रथम वर्षाकरिता अभ्यासक्रमाचे ऑनलाईन पद्धतीने फॉर्म भरणे व निश्चित करण्याची सोय करण्यात आली आहे. या प्रक्रियेद्वारे बी. फार्मसीचे ऑनलाईन अर्ज १४ ऑगस्टपर्यंत व डी. फार्मसीचे २८ ऑगस्टपर्यंत स्वीकारले जाणार आहे. बी. फार्मसीचे प्रवेशाबाबतचे संपूर्ण वेळापत्रक हे MHCET यांच्या संकेतस्थळावर व डी. फार्मसीचे DTE Maharashtra यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना दोन पद्धतीने फॉर्म निश्चित करण्याची सोय देण्यात आली आहे. प्रथम पर्यायांमध्ये सुविधा केंद्रावर जाऊन अर्ज भरणे सत्यप्रती तपासणी पडताळणी व निश्चिती करणे तर दुसऱ्या पर्यायांमध्ये विद्यार्थी सुविधा केंद्रावर न जाता ऑनलाइन पद्धतीचा वापर करून अर्ज भरावा व तो e-scrutin मोडद्वारे निश्चित करणे तरी बार्शी शहर व आजूबाजूच्या ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांनी सदर सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थाध्यक्ष अरुण बारबोले व प्रा. सुजित करपे यांनी केले आहे.

# उंचच उंच झोके, फुगडीने रंगणार नागपंचमी

## मुख्यमंत्री लाडकी बहिणमुळे महिला वर्गांमध्ये आनंदाला उधाण

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुक्यात यंदा पाऊसाने मोठी ओढ दिली आहे. तरीदेखील जेमतेम वारंवारचा भीज पावसाने निसर्गानेच हिरवी चादर पांघरल्यासारखे श्रावणातील अवघी सृष्टी बहरलेली आहे. घरोघरी लहनांपासून ते तरुणी, नवविवाहिता, महिला यंदा मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेमुळे आनंदित आहेत. यामुळे यंदा महिलांचा आवडीचा नागपंचमी सण मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. ऊंचच ऊंच झोके, झिम्मा-फुगडी फेर धरणे उखाण्यांना यंदा चार चाँद लागणार आहे.

यंदा मोठ्या प्रमाणात महिलांनी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे फॉर्म भरले आहेत. त्यांना नागोबा-नरसोबा पैशाला



दोन पंचमी झाल्यावर पुसतंय कोण? एरव्ही नाग साप दिसला की लोक काठ्याने मारायला उठतात. पण नागपंचमी सणाला आवर्जून नागोबाचे पूजन केले जाते. नागपंचमी सण हा विशेषतः महिलांच्या आवडीचा सण. संसारातील कितीही अडचणी, संकटे असली तरी नवविवाहिता महिला माहेरी येतात. लेक माहेरी आल्यावर माता-पिता भाऊराया यांच्या आनंदाला पारावार राहत नाही. घरोघरी महिलांकरिता बांगड्या, चुडे, नवी वस्त्रे आभूषणे वस्त्रालंकार खरेदी होतात. मेंहदीने हाथ सजले जातात. उंचच उंच झोके खेळण्यात जणू स्पर्धाच लागते. तरुणी, नवविवाहित महिला साजश्रृंगार करून नागोबा-नरसोबाचे पूजन करतात. नागनाथ मंदिरात वारुळावर दूध, लाह्या, कान्होलेचे नैवैद्य दाखवले जाते. तरुणी, नवविवाहिता साऱ्या एकत्र येऊन उंचच उंच झोका, फेर धरणे, झिम्मा-फुगडी गाणी उखाणे आदी महिलांच्या खेळाने पंचमी रंगते. शहरी भागात महिलांवर कुंटुंबाची मोठी जबाबदारी असल्याने असे सण, परंपरा, उत्सव साजरे करण्यात मर्यादा आल्यात. पण आजही विशेषतः ग्रामीण भागात पंचमी सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यंदा तालुक्यात भीज पावसामुळे राने हिरवीगार बहरली आहेत. यातच मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेमुळे महिला वर्गात आनंदाचे वातावरण आहे. याचा निश्चितच नागपंचमी सणावर परिणाम दिसून येणार आहे.

### झोपाळ्यांनी घेतली झोक्याची जागा

मोठ्या प्रमाणात होत असलेल्या शहरीकरणामुळे उंचच उंच झोक्याची जागा आता शहरात झोपाळ्याने घेतली आहे. मात्र उंचच उंच झोक्याची मजा झोपाळ्यात येत नाही, अशी प्रतिक्रिया महिलांनी व्यक्त केली आहे.



# गौडगावचे राहुल भड यांना कार्यगौरव पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ ऑगस्ट-**

तालुक्यातील गौडगाव येथील सहारा वृद्धाश्रमचे संस्थापक राहुल भड यांना सातत्यपूर्ण साहित्यिक, सामाजिक व शैक्षणिक चळवळ उदगीर या संस्थेच्यावतीने कार्यगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

उदगीरचे उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. व्ही. पी. पवार होते. यावेळी ईशान संगमनेरकर, अनंत कदम, राजपाल पाटील, तुळशीदास बिरादार, आनंद बिरादार, रणजीत पवार, प्रभू जाचक, राजेंद्र सगर, देवेंद्र गावंडे उपस्थित होते. सन्मानपत्र, शाल, पुस्तक भेट देऊन राहुल भड यांना कार्यगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गौडगावसारख्या ग्रामीण भागात राहून वृद्धाश्रमाच्या माध्यमातून अनेकांना सहारा देण्याचे काम करणारे तसेच शेतकरी, शेतमजूर तरुणांमध्ये व्यसनमुक्ती रुजवणारे, पुस्तकाची चळवळ गतिमान करणारे, संस्था, शाळेंना पुस्तकरुपी भेट देऊन ज्ञानाचा जागर करणारे राहुल भड यांना त्यांच्या या कार्याबद्दल गौरवण्यात आले. भड यांना यापूर्वीही विविध संघटना, संस्थांच्या माध्यमातून १४ पुरस्कार मिळाले आहेत.

# वेळेवर एसटी बस नसल्याने निलेगावच्या विद्यार्थ्यांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ७ ऑगस्ट-**

तुळजापूर तालुक्यातील टोकाचे गाव असलेल्या निलेगाव येथील कॉलेज विद्यार्थी, विद्यार्थिनींची केवळ वेळेवर बस नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

तुळजापूर एस. टी. प्रशासनाने याबाबत सकाळी ९ वाजता निलेगाव येथून बस सोडावी या बाबतीत ग्रामपंचायत निलेगावने वारंवार, निवेदन, पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला तरीही एस. टी. प्रशासनास जाग येत नसून, ताबडतोब सकाळी ९ वाजता बस नाही सोडल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा कॉलेज विद्यार्थ्यांनी दिला आहे. तुळजापूर तालुक्यातील निलेगाव हे शेवटचे गाव असून, या गावाची लोकसंख्या ५ हजार आहे. या गावातून शेकडो विद्यार्थी विद्यार्थिनी नळदुर्ग, अणदूर येथील कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहेत. त्यांचे कॉलेज सकाळी १० वाजता असते. परंतु निलेगाव येथून सकाळी त्यांना जाण्यासाठी बसच नाही. तुळजापूर-निलेगाव ही बस सकाळी १०.३० ला असून कुरनूर सोलापूर ही बस ११ वाजता आहे. या दोन्ही बस त्यांच्यासाठी व इतर लोकांसाठी काहीही उपयोगाच्या नाहीत. तुळजापूर डेपोची बस निलेगाव येथे ९ वाजता आल्यास या विद्यार्थ्यांची सोय होऊ शकते. तसेच नळदुर्ग-अक्कलकोट व्हाया शहापूर या बस दर तासाला एक असून, यातील एक बस सकाळच्या वेळेस सोडावी, याबात निलेगाव ग्रामपंचायतीने तुळजापूर, नळदुर्ग एसटी प्रशासनाला निवेदन देऊनही उपयोग झाला नाही.

# शैक्षणिक, सामाजिक कार्यात अग्रेसर राहणार

## महेश कोठारी : ट्विंकल स्टार स्कूलमध्ये शैक्षणिक साहित्यांचे वाटप, वृक्षारोपण



**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ८ ऑगस्ट-**

मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी रोटरी तसेच कॅन्सर फाउंडेशनच्या माध्यमातून प्रत्येक शाळांना मदत करणार आहे. मागील काळात शैक्षणिक व सामाजिक कार्यात जे उल्लेखनीय काम केले आहे, तेच काम पुढील काळातही करण्यासाठी मी अग्रेसर असेन, असे मत रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष महेश कोठारी यांनी व्यक्त केले.

ट्विंकल स्टार स्कूलमध्ये शैक्षणिक साहित्य व वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. खर्चाला फाटा देत माझा वाढदिवस शैक्षणिक साहित्य वाटप करून व वृक्षारोपण करून केला जातो, हे मी माझ्यासाठी भाग्याचे समजतो. वाढदिवसानिमित्त त्यांचा सन्मान संस्थेच्या वतीने करण्यात आला. त्यावेळी सत्कारला उत्तर देताना त्यांनी संस्थेचे व शाळेचे आभार मानले. पुढे कोठारी म्हणाले की शाळेला येणाऱ्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आमची टीम नेहमीच कटिबद्ध असेल. या लावलेल्या झाडांचा वाढदिवस येणाऱ्या पुढील काळात वर्षानुवर्ष आपण करत राहू असे मत संस्थेचे संस्थापक प्रा. हरिश्चंद्र गाडेकर यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी रोटरी क्लबचे नूतन अध्यक्ष श्रीकांत लोंढे होते. यावेळी रोटरी क्लबचे सचिव संदीप मोकाशी, कॅन्सर फाउंडेशनचे अध्यक्ष योगेश भणगे, क्रांतिकारी संघर्ष सेनेचे टेंभुर्णी शहराध्यक्ष निलेश खरात, पारस कटारिया, महेश कोकीळ, मारुती वाघे, हरिश्चंद्र गाडेकर, रेखा गाडेकर, अर्चना गाडेकर, मनीषा सोनवणे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन दीपाली सितारे यांनी केले. आभार ज्येष्ठ शिक्षिका मनीषा सोनवणे यांनी मांनले. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष श्रीकांत लोंढे, कॅन्सर फाउंडेशनचे अध्यक्ष योगेश भणगे, क्रांतिकारी संघर्ष सेनाचे टेंभुर्णी शहराध्यक्ष निलेश खरात, महेश कोकीळ, प्रिन्सिपल रेखा गाडेकर यांनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीपाली सितारे, प्रियांका पांडगळे, आशा सुतार, सोमनाथ खरसांडे, नितीन बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भाजपातर्फे राष्ट्रीय हातमाग दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ ऑगस्ट-**

७ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय हातमाग दिन म्हणून ओळखला जातो. आजच्या दिवशी स्वदेशी चळवळीचा शुभारंभ झाला आणि ७ ऑगस्ट २०१५ रोजी हातमाग दिन हा चेन्नई मध्ये घोषित झाला आणि त्यानंतर संपूर्ण देशामध्ये हातमाग वस्तू विकत घेण्याची लाट ही निर्माण झाली. येथील भारतीय जनता पक्षाच्या महिला आणि पुरूष कार्यकर्त्यांनी खादी ग्राम उद्योग दुकानांमध्ये जाऊन ७ ऑगस्ट हा राष्ट्रीय हातमाग दिन दिन साजरा केला.

यामध्ये खादी किंवा आपल्या भारतामध्ये तयार होणाऱ्या सर्व वस्तू ह्या घरोघरी पोहोचल्या. वास्तविक ७ ऑगस्ट १९४५ हा स्वदेशी चळवळीचा दिवस असल्याने या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वदेशी वस्तूंना आणि



त्याचबरोबर आपल्या लोकांच्या कामाला चालना मिळावी आणि ते स्वतःच्या पायावरती सक्षमपणे उभे राहावेत यासाठी ते नेहमीच प्रयत्न करीत असतात. पंढरपूर येथे भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यकारणी महिला मोर्चा त्याचबरोबर जिल्हा संयोजक या सर्वांच्या वतीने हातमाग दिन साजरा करण्यात आला.

यावेळी पंढरपुरातील अत्यंत जुने खादीचे दुकान म्हणजेच खादी ग्रामोद्योग या ठिकाणी जाऊन सर्वांनी खादीचे रुमाल, खादीचे शर्टचे कापड, त्याचबरोबर स्वदेशी बनावटीचे गुलकंद अशा अनेक वस्तू विकत घेतल्या आणि हातमाग दिवस साजरा केला. खादी ग्रामोद्योग दुकानचे मालक मोहनदादा आरस यांच्याकडे जाऊन खादीचे कपडे, हातमागाच्या वस्तू खरेदी केल्या. यावेळी संयोजक बादल सिंह ठाकुर, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष डॉ. प्राजक्ता बेणारे, सुजाता वगरे, सरिता मुंडे, जयश्री क्षीरसागर, अंजना जाधव, पार्थ बेणारे, सुदर्शन निंबाळकर, मोहनदादा आरस उपस्थित होते.

# 'आरोग्यवर्धिनी'ला मनुष्यबळ पुरवणाऱ्या कंपनीची चौकशी करा

### अन्यथा स्वातंत्र्यदिनी जिल्हा परिषद पूनम गेटसमोर धरणे आंदोलन करणार : किरण साठे

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ८ ऑगस्ट-**

जिल्ह्यातील आरोग्यवर्धिनी केंद्रास नित्यर्थ फॅसिलिटी मॅनेजमेंट अँड सर्व्हिसेस कंपनीकडून मनुष्यबळ पुरवण्यात आले आहे. या कंपनीची चौकशी करावी अनथ्या १५ ऑगस्ट रोजी धरणे आंदोलन करण्याचा इशारा किरण साठे यांनी दिला आहे.

कंपनीबाबत महाराष्ट्र विकास सेनेचे प्रमुख किरण साठे यांनी निवेदन दिले असून आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये सफाई कामगार व अटेंडंट याबाबत आपल्या कार्यालयाने निविदा प्रक्रिया कधी केली व निविदामध्ये मंजूर झालेला दर व पीएफ व ईएसआ टी सर्व दराबद्दल एजन्सीची माहिती देण्यात यावी व सदरील एजन्सीला आपण कोणत्या पद्धतीने निविदा दिली, याबाबत खुलासा देण्यात यावा, सदरील एजन्सी ही कामगारांची पीएफ भरत नसल्याचे व पगार वेळेवर करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे. या एजन्सीचे काम अतिशय खालच्या दर्जेचे दिसून येत आहे. या निवेदामध्ये अफरातफर केल्याचे स्पष्ट दिसत आहे. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या वर्चस्वाखाली आर्थिक देवाण-घेवाण करून जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी ही एजन्सी नेमल्याची चर्चा सर्वसामान्य जनतेमध्ये दिसत आहे. या एजन्सीबद्दल त्वरित चौकशी करून पूर्ण माहिती देण्यात यावी आणि एजन्सीच्या निविदेमध्ये नमूद असलेल्या नियम, अटी,अशर्तीनुसार सोलापूर जिल्ह्यात काम चालू आहे का? याचीही चौकशी करण्यात यावी, अन्यथा १५ ऑगस्ट म्हणजे स्वातंत्र्यदिनी जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

# शासनाचे कर्ज मिळत नसल्याने खासगी कारखाने अडचणीत

## चेअरमन राजेंद्र गिरमे : सासवड माळी फॅक्टरीच्या रोलरचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, दि. ८ ऑगस्ट-**

येथील दि. सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या येणाऱ्या सिझन २४-२५ च्या गळीत हंगामासाठी सज्ज होत असलेल्या कारखान्यातील रोलरचे पूजन शुगरकेन विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन अमोल ताम्हाणे यांच्या हस्ते विधिवत पूजा करून करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी कारखान्याचे चेअरमन राजेंद्र गिरमे, मॅनेजिंग डायरेक्टर सतिश गिरमे, होल टाइम डायरेक्टर परेश राऊत, संचालक नीलकंठ भोंगळे, निखिल कुदळे, नंदकुमार गिरमे त्याचप्रमाणे एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी अजय गिरमे, व्हाईस चेअरमन नितीन इनामके, संचालक पृथ्वीराज भोंगळे, दिलीप इनामके, जयवंत चौरे, दीपक गायकवाड, सिकंदर जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

चेअरमन राजेंद्र गिरमे यांनी राज्य शासनाकडून सहकारी साखर कारखान्यांना कर्ज, अनुदान दिले जाते. परंतु खासगी साखर कारखान्यांना कुठलेही कर्ज अनुदान मिळत नाही. त्यामुळे आम्हाला संचालक मंडळाच्या प्रॉपर्टी गहाण ठेवून कर्ज काढावे लागते आणि असे कर्ज काढतच आम्हाला कारखाना चालवावा लागतो आहे. त्यामुळे काही वेळेस कामगारांचे पगार, उसाचे पेमेंट देण्यास मागेपुढे होते. परंतु कामगार सभासदांचे सहकार्य असल्याने ऊस सिझन यशस्वी करत आलो आहोत.

### जास्तीत जास्त गाळपाचे उद्दिष्ट

येणाऱ्या सीझनमध्ये ऊस कमी आहे. त्यामुळे सीझन अडचणीचा ठरणार आहे. उन्हाळ्यात तापमान खूप होते, त्याचा ऊस लागणीवर आणि त्याच्या वाढीवर परिणाम झाला आहे. तसेच अद्याप पाऊस नसल्याने आडसाली उसाच्या लागणी पुरेशा न होता सुरू ऊसाच्या लागणी करणे शेतकरी पसंत करत आहेत. सुरु ऊस लागवडीत उत्पन्न कमी निघते. परेश राऊत म्हणाले सभासद, कामगाऱ्यांच्या सहकार्याने नेहमीप्रमाणे आपण येणारा गळीत हंगाम ऊसाचे क्षेत्र कमी असले तरी जास्तीत जास्त गाळप करून यशस्वी करणार आहोत, असे चेअरमन राजेंद्र गिरमे यांनी सांगितले.



# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## एक हजार विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हसू

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

माजी आ. दिलीपराव माने यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून डॉ. पृथ्वीराजभैय्या माने यांच्या हस्ते आणि अनिल जाधव व सुनील जाधव यांच्या संयुक्त विद्यामानाने शाळेतील विद्यार्थ्यांना वही वाटपचा कार्यक्रम पार पडला. कन्या प्रशाला, जि.प. प्राथमिक मराठी मुलींची शाळा, ऊर्दू शाळा येथील विद्यार्थ्यांना



वह्या वाटप करण्यात आल्या. यावेळी त्यांच्या चेहऱ्यांवर हसू फुलले. या कार्यक्रमास अध्यक्षा म्हणून मंद्रुपच्या सरपंच अनिता कोरे होत्या. दादा कोरे, रमेश नवले, उपसरपंच भगवान व्हनमने, श्रीकांत मेलगे-पाटील, माजी सभापती गुरुसिध्द म्हेत्रे, निखिल देशपांडे, बंडू शेंडगे, राम पवार, सचिन साठे, अल्लाउद्दीन पटेल, श्रीशैल माळी यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हवालदार यांनी केले तर आभार अजिंक्य जाधव यांनी मानले.



## संक्षिप्त वृत्त...



### महानगरपालिकेतर्फे हातमाग करणाऱ्या प्रतिकात्मक पुतळ्यास अभिवादन

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने यंत्रमाग दिनानिमित्त विणकर बागेतील हातमाग काम करणाऱ्या प्रतीकात्मक पुतळ्यास महापालिकेच्या वतीने उपायुक्त आशिष लोकरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त ज्योती भगत-पाटील, माजी विरोधी पक्षनेते महेश कोठे, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, माजी नगरसेवक पांडुरंग दिड्डी, नागेश वल्याळ, सायक कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी नितीन साके, इंदिरा कुडक्याल, रामचंद्र जन्नू, कॉंग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, पद्मशाली युवक संघटना अध्यक्ष शेखर कटकम, राकेश पुंजाल, पद्मशाली शिक्षण संस्थेचे सरचिटणीस दशरथ गोप, यंत्रमाग संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, हरिओम विणकर बाग बहुउद्देशिय संस्थेचे अध्यक्ष गणेश सिध्दम, राकेश पुंजाल, रामगोपाल म्याकल, सिध्दारूढ जेवरगी, सिध्दारूढ निंबाळे, विजय झुजा, विजय निली, वासुदेव अडकी, ॲड. अनिल वासम, नवनाथ साका, गणेश बोध्दूल, नागेश बंडी, श्रीनिवास दासरी, गणेश गुज्जा आदी मान्यवर उपस्थित होते. वॉल हॅगिंचे नॅशनल ऑवार्ड राजेंद्र अंकम, हटगार कोष्टी सामाजाचे प्रदेश महिला अध्यक्ष वंदना शरणबसप्पा अष्टगी अक्कलकोट, विजयालक्ष्मी हुलमनी, वॉल हॅगिंचे प्रविण फलमारी, श्रीनिवास अनंतुल, अंबादास करली, लक्ष्मण गणपा, दत्तात्रय जल्ला आदींचा सन्मान करण्यात आला.

### राजकुमार पाटील यांचे सेट परीक्षेत यश

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने एप्रिल २०२४ मध्ये घेतलेल्या सहायक प्राध्यापक पदाच्या पात्रता अर्थात सेट परीक्षेत आहेरवाडी



येथील ड.राजकुमार पाटील हे अर्थशास्त्र विषयातून उत्तीर्ण झाले आहेत. पुणे विद्यापीठाने एप्रिल मध्ये घेतलेल्या व आरक्षणाच्या मुद्यावरून रेंगाळलेला बहुप्रतिक्षित सेट परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. राज्यातील एक लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. केवळ ६.६६ टक्के विद्यार्थ्यांनी यात यश मिळविले आहे. शिक्षक असणारे राजकुमार पाटील हे कायद्याचे पदव्युत्तर पदवीधारक अर्थात एलएलएम आहेत. याशिवाय त्यांनी इंग्रजी, अर्थशास्त्र, पत्रकारिता, औषधनिर्माण, कृषी अशा अनेक विषयात प्रावीण्य मिळविले आहे.



अध्यक्ष नागनाथ कोंतम | उपाध्यक्ष युवराज चिंता | सेक्रेटरी अनिल कंदी | सहसेक्रेटरी हिरालाल येरपूल | खजिनदार अरविंद भिमरती

### तोगटवीर क्षत्रिय समाजाच्या अध्यक्षपदी नागनाथ कोंतम, युवराज चिंता उपाध्यक्ष

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

श्री चौडेश्वरी वरप्रासादिक तोगटवीर क्षत्रिय समाजाची सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षपदी नागनाथ कोंतम यांची बिनविरोध निवड झाली. विश्वस्त मंडळाची सन २०२४-२०२७ या सालाकरिता त्रैवार्षिक निवडणूक होऊन आतापर्यंतच्या समाजाच्या परंपरेप्रमाणे विश्वस्त मंडळाची निवड बिनविरोध झाली. उपाध्यक्ष युवराज चिंता, सेक्रेटरी अनिल कंदी, सहसेक्रेटरी हिरालाल येरपूल, खजिनदार अरविंद भिमरती यांची निवड झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. अंबादास कंदीकोंडा यांनी काम पाहिले. निवडणूक बिनविरोध होण्यासाठी तोगटवीर समाजाचे माजी पदाधिकारी, सल्लागार, निमंत्रित सदस्य सर्व फंडाचे मानकरी व समाज बांधव यांनी परिश्रम घेतले.



### अण्णा भाऊंच्या जयंतीनिमित्त युवा भीम सेना संघटनेच्यावतीने शालेय साहित्यांचे वाटप

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

युवा भिम सेना सामाजिक संघटनेच्यावतीने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सोमपा मराठी हेडक्वॉर्टर मुलांची शाळेत गरिब व होतकरु विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ व सुवर्णबिंदू प्राशन ड्रॉपचे वाटप संस्थापक अध्यक्ष महेश डोलारे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी विरेंद्र जाधव, मुस्ताक शेख, विकास गायकवाड, लिंगप्पा रामपूरे, किरण लकशेट्टी, परशुराम कोंचीकोरवी, कलिम शेख, सुरज तुपसुंदर, ज्ञानेश्वर पवार, विद्या जाधव, पुष्पा धसाडे, रेश्मा शिंदे, स्वाती सुरवसे, कौसर शेख, गिता पवार, गीता जाधव यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## बळीराजांनो जागे व्हा! पेर घटवा... भाव वाढवा...

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

मागील अनेक वर्षापासून बळीराजाने कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणात केली होती. परंतु उत्पादन वाढवून भाव मिळत नव्हता. गतवर्षी तर कांदा लागवड केलेल्या शेतकऱ्यांना व सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील अडत्यांना विक्री करताना खूपच अडचणी येत होत्या. व त्यात भावही मिळत नव्हता, शेतकऱ्यांनो जागे व्हा.. पेर घटवा, भाव वाढवा अशी परिस्थिती बाजारात दिसून येत आहे.

मागील अनेक वर्षापासून बळीराजा कांदा पिकाची लावगड मोठ्या प्रमाणात करत आहेत. या पिकाला उत्पादन खर्चही मोठ्या प्रमाणात येत असतो. या उत्पादन खर्चाच्या मानाने कांद्याला भाव २ ते ३ हजारापर्यंतच मिळाला म्हणून अनेक शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होऊन भाव न मिळाल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले. अनेक शेतकरी वर्ग शेतीमध्ये काबाडकष्ट करून उत्पादन वाढवितात. परंतु केवळ हमी भावाअभावी शेती व्यवसाय तोट्यातच चालला आहे. आंधळा दळतो आणि कुत्रे पीठ खातो अशी अवस्था शेती व्यवसायाची झाल्याने शेतकऱ्यांनी याकडे लक्ष देऊन जागे होऊन पेरा घटवून भाव मिळवावा, असे आवाह कृषी तज्ज्ञ करत आहेत.





“ शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शेती करत असताना बाजाराचा अंदाजही घ्यावा. मागणीचा कल विचारात घेऊन पिकांची लागवड करावी. इतरांचे अनुकरण करुन पिके घेणे टाळावे. सध्या फळपिके, भाजीपाल्यांबरोबरच नगदी पिकांसाठी दिवस चांगले आहेत. यासाठी अभ्यास आणि कौशल्याचा वापर करावा. यामुळे शेतकऱ्यांना चांगला फायदा होऊ शकतो.

**-गजानन होनराव, अडत व्यापारी, श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर**



“ बळीराजानी पेरा घटवून भाव मिळवावा अशा प्रकारची परिस्थिती सध्या शेती व्यवसायात दिसू लागली आहे. मध्यम व हलक्या प्रतीच्या शेतीमध्ये अतोनात उत्पादन खर्च करूनसुध्दा उत्पादन वाढवून शेतकऱ्याला बाजारात भाव मिळत नसल्यामुळे दरवर्षी शेतकरी वर्ग आर्थिक संकटात सापडत आहेत. हलक्या प्रतिची शेती पडीक ठेवून चांगल्या प्रतीच्या जमीनीत कमी खर्चात उत्पादन घेऊन शेतकऱ्यांनी बाजारात भाव मिळवावा.

**-यशवंत कटारे, कांदा उत्पादक**



“ आमच्या कष्टाला तरी किंमत द्या, शेतकऱ्यांची दयनीय आवस्थेमागे केवळ कष्टाला किंमत मिळत नाही हेच कारण आहे. शेतकरी वर्ग दररोज आपल्या लेकराबाळाबरोबर शेतामध्ये अतोनात कष्ट करून पिकांची निगा राखून उत्पादन वाढीसाठी बाटेल तो खर्च करतो. उत्पादन वाढवत असतो. हलक्या व कमी दर्जाच्या शेतीमध्ये खत, बी-बियाणे व महागाड्या किटकनाशकांच्या फवारण्या करून पिकांचे संरक्षण करतो. परंतु बाजारात विक्रीसाठी गेला असता उत्पादन भाव मिळत नाही, म्हणून शेती व्यवसाय वर्षानुवर्ष तोट्यातच चालला आहे. बळीराजाने याकडे लक्ष देऊन जमिनी पडीक पडल्या तरी चालतील. परंतु पेरा घटवावा व शेतकऱ्यांच्या कष्टाचे फळ मिळवावे.

**-चंद्रकांत मळेवाडी, शेतकरी, कुंभारी**

## शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करा

### दक्षिणचे तहसीलदार किरण जमदाडे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

आधुनिक तंत्रज्ञानामुळे मातीची परिस्थिती, पाण्याचा वापर आणि हवामान यासारख्या गोष्टींचे निरीक्षण करणे सोपे जाते. यावर्षी शेतीत कोणते पीक घेतले पाहिजे, उत्पन्न वाढीसाठी, तण नियंत्रणासाठी काय केले पाहिजे, पिकांवरील रोग आपण किती लवकर पकडणे व त्यावर लवकर कोणता उपाय करावा यासाठी शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन दक्षिणचे तहसीलदार किरण जमदाडे यांनी कुंभारी येथे महसूल पंधरवडा निमित्त आयोजित केलेल्या शेती कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना सांगितले.

यावेळी कुंभारीचे सरपंच श्रुती निकंबे, तालुका कृषी अधिकारी रामचंद्र माळी, पंचायत समिती तालुका कृषी अधिकारी उमेश काटे, कृषी विज्ञान केंद्राचे एस जवळगे, विस्तार अधिकारी सचिन चव्हाण मंडल अधिकारी पाटील, तलाठी भीमाशंकर भुसारे कृषी सहाय्यक सोनाली नाईकनवरे उपस्थित होते. तालुका कृषी अधिकारी रामचंद्र माळी यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली विस्तार




अधिकारी जोजन यांनी रेशीम उत्पादन व बांबू लागवडी विषयी माहिती दिली. कृषी विज्ञान केंद्राचे जवळगे यांनी खरीप पिकातील रोग व त्यावर उपाय याविषयी मार्गदर्शन केले.

## भाजपतर्फे ९ ते १५ ऑगस्टदरम्यान सांगोल्यात हर घर तिरंगा अभियान

### जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ८ ऑगस्ट-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमामध्ये हर घर तिरंगा अभियान साजरा करण्याबाबत केलेल्या आवाहनानुसार भाजपतर्फे राज्यभरात ९ ते १५ ऑगस्टदरम्यान हे अभियान मोठ्या उत्साहात साजरे केले जाणार आहे. ९ ऑगस्टच्या क्रांतीदिनापासून ते स्वातंत्र्यदिनापर्यंत प्रत्येक घर, दुकान व कार्यालयावर राष्ट्रध्वज लावण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी दिली.



भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली या अभियानातील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. देशप्रेमाची भावना जागृत होण्यासाठी ९ ऑगस्टच्या क्रांतीदिनापासून ते स्वातंत्र्यदिनापर्यंत प्रत्येक घर, दुकान व कार्यालयावर राष्ट्रध्वज लावण्याचे नियोजन केले आहे. अधिकाधिक लोकसहभागासाठी बूथ स्तरापर्यंतचे कार्यकर्ते जनजागृतीवर भर देणार आहेत. शाळा,महाविद्यालयांशी संपर्क साधून ध्वजारोहणासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. ११ ते १४ ऑगस्ट या काळात पक्ष संघटनेच्या प्रत्येक मंडलात तिरंगा यात्रा होणार आहेत.१२ ते १४ ऑगस्ट दरम्यान महापुरुषांचे स्मारक, पुतळा परिसर, स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मारक परिसराची स्वच्छता करण्यात येणार आहे.

## मोरोचीत तंबाखू न दिल्याने एकाला बेदम मारहाण

### मोरोचीतील घटना; दोघे अटकेत

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ८ ऑगस्ट-**

नातेपुते पोलीस ठाणे हद्दीतील मोरोची येथे ७ ऑगस्ट रोजी रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास मोरजाई मंदिर येथे तंबाखू न दिल्याने एकाला बेदम मारहाण करण्यात आली. या प्रकरणातील दोघांना अटक करण्यात आली आहे.

उमाजी जाधव हा मंदिरात बसला असताना सचिन पांडुरंग खिलारे, ऋतिक बाळु जगताप (दोघे रा. मोरोची, ता. माळशिरस) हे दोघे तिथे आले तू आम्हाला तंबाखू का दिली नाही, असे म्हणून तुला आज जीवंत सोडणार नाही, असे म्हणत शिवीगाळ, दमदाटी करुन आरोपी ऋतिक बाळू जगताप याने उमाजी जयसिंग जाधव यास हाताने लाथाबुक्क्यांनी मारहाण करु लागला. त्याचवेळी आरोपी सचिन पांडुरंग खिलारे याने कुऱ्हाडीच्या तुंब्याने डोक्यात, हाताच्या दंडावर, मनगटावर, पायाच्या नडगीवर जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने गंभीर दुखापत करुन जखमी केल्याने जखमीचे नातेवाईक जनार्दन आंदू चव्हाण यांच्या फिर्यादीवरून सचिन पांडुरंग खिलारे, ऋतिक बाळू जगताप यांच्या



वरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९, ११८(२), ११५ (२), ३५२, ३५१(२), ३५१(३), ३(५) अन्वये कलमाद्वारे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना तात्काळ अटक करण्यात आलेली आहे. परंतु सदरचा गुन्हा हा तंबाखूचा विडा न दिल्याने घडलेला असल्याने एका व्यसनाच्या तंबाखूच्या विड्याने जीव घेण्यापर्यंत घटना घडत आहे.

तंबाखूचा विडा न दिल्याच्या किरकोळ कारणावरून गुन्हा घडलेला आहे. गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून यापुढे किरकोळ कारणावरून वारंवार शरीराविषयी दोन किंवा अधिक गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारावर तडीपार, मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

**-सपोनी महारुद्र परजणे, पोलीस ठाणे, नातेपुते**

## जमीन सुपिकतेसाठी हवा जैविक खतांचा ‘डोस’

### रासायनिक खतांच्या अतिवापराने जमिनीचा बिघडतोय पोत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

गेल्या अनेक वर्षांपासून दक्षिण तालुक्यातील सीना-भीमा नदीकाठच्या शेतामध्ये रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे शेत जमिनीचा पोत बिघडत चालला आहे. एकीकडे तालुक्यात शेकडो एकर जमीन क्षारपड झाली असून, ती क्षारपडमुक्त करण्यासाठी प्रयत्न सुरू असतानाच आता रासायनिक खतांच्या अतिवापराचाही फटका बसत आहे. यामुळे उत्पादनात घट होत आहे. शेतातून कोणतेही पीक घ्यायचे झाले तर शेतातील सुपीकता गरजेचे आहे. ही सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी जैविक खतांचा बुस्टर डोस महत्त्वाचा आहे.



दक्षिण सोलापूरसह पंढरपूर, माढा, माळशिरस, अक्कलकोट तालुक्यातील काही भागात तालुक्यात सीना, भीमा, बोरी अशा नद्या आहेत. यामुळे तेथे मुबलक पाणी उपलब्ध होत आहे. त्यामुळे उसासह भाजीपाला शेतात उच्चांकी प्रमाणात घेतला जातो. एकीकडे तालुक्यातील अतिपाण्यामुळे जमिनी क्षारपड झाल्या आहेत. आता दुसरीकडे तालुक्यातील शेतीत अतिप्रमाणात टाकण्यात येत असलेल्या रासायनिक खतांमुळे शेतीचा पोत बिघडत चालला आहे. यात शेतीच्या सुपिकतेसाठी महत्त्वाचे असलेले नैसर्गिक अन्नघटक नैसर्गिकरित्या मिळतात. शेत जमिनीच्या १ ग्रॅम मातीत २ कोटी ४० लाखांपेक्षा जास्त जीवाणू व ते १३० प्रकारचे असतात. ज्या जमिनीचा सामू ६.५, तसेच सेंद्रीय कर्बाची पातळी ०.८ च्या पुढे आहे. अशी शेती सुपीक मानली जाते. मुख्य दुय्यम आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये घ्यावे लागतात. पिकास अन्नघटक जसेच्या तसे जमिनीत देण्याचे काम जीवाणू करतात. या जीवाणूंची संख्या व कार्यक्षमताही अत्यंत महत्त्वाची असते. नत्र स्थिर करणाऱ्या सहजिवी जैविक गटात रायझोबियमचा समावेश होतो. तर असहजिवी पद्धतीने नत्र स्थिर करणाऱ्या गटात अझेटोबॅक्टर, अझोस्पिरिलम, असिटोबॅक्टर यांचा समावेश होतो. याशिवाय अन्य प्रकारची खते असतात. त्याचबरोबर नैसर्गिक अन्न घटकांमध्ये कार्बन, हायड्रोजन, ऑक्सिजन आदींचा समावेश असतो. हे घटक नैसर्गिकरीत्या हवा, पाणी, सूर्यप्रकाश यांच्यापासून मिळतात. तर दुय्यम अन्नद्रव्यामध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम, गंधकाचा समावेश होतो. ही अन्नद्रव्ये मुख्य अन्नद्रव्याच्या मानाने कमी प्रमाणात पुरवावी लागतात. या अनुषंगाने शेतकऱ्यांनी कृषी विभागाचा सल्ला व माती व पिकांचे परीक्षण करणे गरजेचे आहे.



### जैविक खतांचा वापर करा

पिकाची वाढ होण्यासाठी जैविक कर्ब द्यावा लागतो. जैविक कब हा सेंद्रिय खतातून मिळतो. यात जीवामृत, वेस्ट डी कंपोजर, ह्युमिक, रायझो, पीएसबी, केएसबी अशी जैविक खते व हिरवळीची खते कमी खर्चात पिकांना देता येतात. या जैविक खते किंवा जिवाणूमुळे शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळू शकते. जमिनीत जिवाणू नसतील, तर कितीही रासायनिक खते दिली तरी उत्पन्न कमी मिळते त्यासाठी जैविक खते वापरणे गरजेचे आहे.

**-सोनाली नाईकनवरे, कृषी सहाय्यक, कुंभारी**

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### तेर-ढोराळा रस्त्याची चौकशी करण्याची मागणी

**तेर, दि.८ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील तेर-ढोराळा रस्त्याच्या नित्कृष्ट कामाची चौकशी करण्याची मागणी तेर येथील नागरिकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की,तेर-ढोराळा रस्ता मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण यांचे काम पूर्ण झाले असून त्यामध्ये दोन्ही बाजूंनी ५० ते १०० फुट रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आलेले नाही. रस्त्यालगत साईड पट्टीला मुरूम टाकला नाही.तो अपूर्ण आहे. तर या ठिकाणी काम चालू असताना ते काम नित्कृष्ट होत असल्याबाबतची ग्रामस्थांनी लेखी तक्रार जिल्हा परिषदेचे उपकार्यकारी अभियंता जे.ए.मैंदाड यांच्याकडे बोगस व कमी साहित्य निवेदापेक्षा कमी वापरलेबाबत केली होती.त्याबाबतची अद्याप चौकशी केली नाही. परत तेच काम दुसऱ्या एजन्सी माफत चौकशी करावी व कामाची अंदाजपत्रकाची व झालेल्या कामाचे इस्टीमेंट व एम.बी.रेकॉर्ड तपासणी करावी व झालेल्या बोगस कामाची चौकशी करावी. झालेल्या कामाचे आत्तापर्यंतचे बिल संबंधित ठेकेदार यांना देण्यात येऊ नये व लवकरात लवकर आपले स्तरावरून चौकशी करावी अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केले जाईल, असा इशारा जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे. या निवेदनावर माजी सरपंच महादेव खटावकर व नागरीकांच्या सह्या आहेत.

### चंद्रकांत गायकवाड यांची सहा.फौजदारपदी पदोन्नती

**उमरगा, दि.८ ऑगस्ट -**

उमरगा येथील पोलीस उपविभागीय कार्यालयात कार्यरत असलेले चंद्रकांत गायकवाड यांची सहाय्यक पोलीस फौजदारपदी पदोन्नती झाल्याने जिल्ह्याचे पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी यांनी गायकवाड यांना फीत व स्टार लावून सन्मानित करण्यात आले. बुधवारी धाराशिव पोलीस मुख्यालयात हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी पोलीस दलातील मोटार परिवहन विभागातील एकूण पाच पोलीस अंमलदारांना पदोन्नती देण्यात आली. या निमित्याने जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी या पदोन्नती झालेल्या पाच अंमलदारांना फीत व स्टार लावून सन्मानित केले. यावेळी पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.





### तालुकास्तरीय योगा स्पर्धेत एकलव्यचे वर्चस्व

**धाराशिव, दि.८ ऑगस्ट -**

तालुकास्तरीय शालेय योगासन क्रीडा स्पर्धा दि.७ रोजी श्री श्री गुरुकुल आणदुर येथे पार पडल्या या स्पर्धेमध्ये आपल्या एकलव्य विद्या संकुलातील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्तम कामगिरी करून यश संपादन केले. त्यामध्ये १४ वर्ष वयोगट मुले/ मुलीमध्ये विजया पवार द्वितीय क्रमांक, प्रियंका देवकतेतृतीय क्रमांक, जानवी क्षीरसागर चौथा क्रमांक, आकाश दूधभाते प्रथम क्रमांक १७ वर्ष वयोगट मुले/ मुलीमध्ये सोनाक्षी पवार द्वितीय क्रमांक, आरती मेंडके पाचवा क्रमांक, ज्ञानेश्वर काळे द्वितीय क्रमांक, महेश राठोड तृतीय क्रमांक, ज्योतीराम पवार पाचवा क्रमांक रिदमिक योगामध्ये अजित पाखरे प्रथम क्रमांक, प्राची पाटोळे प्रथम क्रमांक व आर्टिस्टिक योगामध्ये ज्योतीराम पवार प्रथम क्रमांक, जानवी क्षिरसागर प्रथम क्रमांक मिळाऊन यश संपादन केले. यांनी योगासन मध्ये चांगली कामगिरी केली व त्यांची पुढे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी यांची निवड झाली आहे. या सर्व खेळाडूंचे व क्रीडा विभाग प्रमुख व क्रीडा प्रशिक्षक ज्ञानेश्वर भुतेकर, योगा प्रशिक्षक प्रणिता, बालाजी क्षीरसागर, सुजाता दीदी गणवीर यांचे संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र वैद्दू, कार्यवाह, विवेक आयचीत, उपाध्यक्ष डॉ.अभय शहापूरकर, मुख्याध्यापक अण्णासाहेब कोल्हटकर, विठ्ठल म्हेत्रे,संस्थेचे संचालक मंडळ गोविंद सोमाणी व क्रीडा समितीचे सर्व सदस्य व सर्व कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



### शालेय तालुकास्तर बुद्धिबळ स्पर्धेत मयुरेश स्वामी प्रथम

**धाराशिव, दि.८ ऑगस्ट -**

येथील श्रीपतराव भोसले हायस्कूल येथील इयत्ता ७ वी मधील मयुरेश महेश स्वामी याने १४ वर्ष वयोगटात शालेय तालुकास्तर बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला तर जिल्ह्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी पात्र झाल्याने तालुका क्रीडा संयोजक बिभीषण पाटील, भोसले हायस्कूलचे क्रिडा शिक्षक आर.पी.पवार व प्रा. अमित लोमटे तसेच जिल्हा आर्बिटर भोरे, डॉ.बुर्ले व भालेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील, सरचिटणीस प्रेमाताई पाटील, कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील व प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम व पर्यवेक्षक यशवंत इंगळे, बी.बी.गुंड, सुनील कोरडे, राजेंद्र जाधव, धनंजय देशमुख, एन.एन.गोरे, प्रा.विनोद आंबेवाडीकर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेच्या लाभासाठी ई-केवायसी करण्याचे आवाहन

**धाराशिव, दि.८ ऑगस्ट -**

मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना वार्षिक ३ गॅस सिलेंडरचे पुनर्भरण मोफत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेसाठी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचे लाभार्थी तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे लाभार्थी या योजनेच्या लाभासाठी पात्र ठरतील.हा लाभ केवळ १४.२ कि.ग्रॅ.वजनाच्या गॅस सिलेंडरची जोडणी असलेल्या गॅसधारकांना देण्याचे निर्देश आहे. या योजनेच्या पात्र लाभार्थ्यांची ई-केवायसी असणे गरजेचे आहे. आपले संलग्न असलेल्या गॅस एजन्सीकडे जाऊन तात्काळ ई-केवायसी करून घ्यावी.असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील महत्त्वाच्या प्रकल्पाबाबत दूरगामी परिणाम करणारे निर्णय

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सक्त अंमलबजावणीचे निर्देश... आ.राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ ऑगस्ट-**

धाराशिव जिल्ह्यातील महत्त्वाच्या प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथी गृहावर बैठक घेण्यात आली.



या बैठकीत जिल्ह्यातील चालू व प्रलंबित प्रकल्पावर दुरगामी सकारात्मक परिणाम करणारे निर्णय घेण्यात आले असून यामुळे जिल्ह्याच्या अर्थकारणाला निश्चितच मोठी गती मिळणार असल्याची माहिती आमदार श्री राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प, निम्न तेरणा उपसा सिंचन प्रकल्प, कौडगाव येथील एमआयडीसीच्या माध्यमातून उभारण्यात येणारा तांत्रिक वस्त्रनिर्मिती प्रकल्प, तुळजाभवानी मंदिर विकास आराखडा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी लागणाऱ्या जागेची उपलब्धता या सर्व महत्त्वाच्या विषयावर बैठकीत सर्वंकष चर्चा झाली व कालमर्यादा ठरवून देत झालेल्या निर्णयांची सक्त अंमलबजावणी करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी आजच्या बैठकीमध्ये संबंधित अधिकाऱ्यांना दिले. आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या विनंतीवरुन सदरील बैठक आयोजित करण्यात आली होती.

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प टप्पा एक अंतर्गत चालू असलेले काम जुलै महिना अखेर पूर्ण करणे अपेक्षित होते, मात्र तांत्रिक व भूसंपादनाच्या अडचणीमुळे ८०% काम पूर्ण झाल्याचे उपस्थित अधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले. या अडचणी दूर करून डिसेंबर अखेरपर्यंत काम पूर्ण करण्याच्या सूचना देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या असून आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून देण्याचे देखील त्यांनी मान्य केले आहे. निम्न तेरणा उपसा सिंचन योजना दुरुस्तीच्या कामास तांत्रिक मान्यता प्राप्त असून पुढील आठवड्यात प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतोठी प्रस्ताव सादर करण्यास जलसंपदा तसेच वित्त व नियोजन विभागाच्या सचिवांना आदेशित करण्यात आले आहे. कौडगांव औद्योगिक वसाहतीमध्ये एमआयडीसीच्या माध्यमातून मंजूर तांत्रिक वस्त्रनिर्मिती प्रकल्पासाठी अँकर युनिट आणणे व तेथील पायाभूत सुविधांची कामे सुरू करण्याच्या सुचना एमआयडीसीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आल्या, तर महाजनकोच्या कार्यकारी संचालकांना उंचवट्यावरील उपलब्ध जागेवर सौर उर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्याचे सुचित करण्यात आले आहे. तुळजाभवानी विकास आराखड्याबाबत पुढील आठवड्यात उच्चाधिकार समितीच्या निर्णयासाठी प्रस्ताव सादर करण्याचे ठरले असून जिल्हाधिकारी यांना तातडीने सदरील प्रस्ताव पाठविण्याचे आदेश देण्यात आले. तसेच छत्रपती संभाजीनगर येथील मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीतील निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी आवश्यक जलसंपदा व कौशल्य विकास विभागाची १२ हेक्टर जागा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करून घेण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून घेण्याचे जिल्हाधिकारी यांना आदेशित करण्यात आले आहे. आजच्या बैठकीत झालेल्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनासाठी पाणी, युवकांना रोजगार व पर्यटनाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या अर्थकारणाला मोठी गती मिळणार असल्याचा विश्वास आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे. सदरील बैठकीस अतिरिक्त मुख्य सचिव नियोजन राजगोपाल देवरा, प्रधान सचिव जलसंपदा दीपक कपूर, वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, कौशल्य विकास विभागाचे प्रधान सचिव गणेश पाटील, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा, महाजनकोचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, कृष्णा खोऱ्याचे कार्यकारी संचालक त्रिमनवार, जिल्हाधिकारी धाराशिव डॉ.सचिन ओंबासे यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## भैरवनाथ अध्यापक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे वार्षिक परीक्षेत घवघवीत यश







**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.८ ऑगस्ट-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या जुन २०२४ मधील डी.एल.एड्.वार्षिक परीक्षेत भैरवनाथ अध्यापक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. यामध्ये प्रथम वर्षाला एकूण ४८ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते त्यापैकी २१ विद्यार्थी हे विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाले तर २७ विद्यार्थी हे एटीकेटीसह उत्तीर्ण झाले तसेच द्वितीय वर्षात एकूण ४४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट त्यापैकी ३७ विद्यार्थी हे विशेष प्राविण्यसह व प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

डी.एल.एड्.प्रथम वर्षातून हुके स्वप्नाली नारायण यांनी ८३.३० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक, जगताप तेजस्विनी बाळासाहेब यांनी ८१.१० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर सोनवणे रूपाली दामोदर यांनी ८०.३० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला तर डी.एल.एड्. द्वितीय वर्षातील चोरघडे सीमा भिकाजी यांनी ८३.०० टक्के गुण मिळवून प्रथम,कोरे बालाजी पांडुरंग यांनी ८०.९० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक रितापुरे साक्षी रामहरी यांनी ८०.२० टक्केगुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. प्रथम द्वितीय व तृतीय आलेल्या व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ.दयानंद जटनुरे, डायट अधिव्याख्याता व भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे संपर्कप्रमुख डॉ.गजेंद्र जमादार, भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य सतिश मातने, अध्यापकाचार्य श्रीकांत पवार, अविनाश घोडके व मोहिनी शिंदे यांनी अभिनंदन व कौतुक केले.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक

**माजी आ.ज्ञानेश्वर पाटील व राहुल बनसोडे यांच्या हस्ते प्रतिमा पुजन**



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.८ ऑगस्ट-**

क्रांतीवीर लहुजी साळवे युवा प्रतिष्ठान आयोजित साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून मंगळवार पेठ अण्णा भाऊ साठे नगर मधुन भव्य मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला.

यावेळी माजी नगराध्यक्ष सुभाष शिंदे, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेश सचिव नसीर शहाबर्फीवाले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे, ओबीसी सेलचे जिल्हा कार्याध्यक्ष डॉ.नवनाथ वाघमोडे, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख रईस मुजावर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे शहर अध्यक्ष श्रीहरि नाईकवाडी, मा.नगरसेवक डॉ.अब्बास मुजावर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते गनीभाई हावरे, नंदु शिंदे, खय्युंम तुटके, युवा सेना शहर प्रमुख कुणाल जाधव, सेवा सहकारी सोसायटीचे सचिव मधुकर गायकवाड, पोलिस पाटील संजय कदम, सोमनाथ अल्बत्ते, सेवा सहकारी सोसायटीचे संचालक नाना शिंदे संतोष मेहेर आदी उपस्थित होते.

शहराच्या चौका-चौकातून वाजत गाजत सवाद्य लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेची भव्या मिरवणूक काढण्यात आली.. मिरवणुकी मध्ये तरूण व महिलांसह समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा सरचिटणीस घनश्याम शिंदे, युवा नेते सचिन शिंदे, दत्ता शिंदे, उमेश शिंदे, किरण शेलार, विशाल शिंदे, समाधान लोंढे, ओंकार शिंदे, केशव शेलार, जयराम शिंदे, दादा शिंदे, भीमा शिंदे, बालाजी थोरात आदींनी परिश्रम घेतले.

## तांत्रिक अडचण दुर होताच प्रमाणपत्रांचे वितरण होणार : एसडीओ

**धाराशिव, दि.८ ऑगस्ट-**

नागरिक व विद्यार्थी यांना उपविभागीय कार्यालय यांच्याकडून वितरित केले जाणारे जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र हे महाऑनलाईन प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येतात.मात्र महाऑनलाईनच्या पोर्टलवर वारंवार एरर येत आहे. प्रमाणपत्र निर्गमित करताना, बायोमेट्रिक थंम दिल्यानंतर ही प्रमाणपत्र जनरेट होण्यासाठी महाआयटीच्या स्तरावर विलंब होत असून तांत्रिक अडचण दुर होताच तात्काळ प्रमाणपत्र वितरण करण्यात येणार आहेत. सद्यस्थितीत शाळा,महाविद्यालय प्रवेशासाठी या प्रमाणपत्रासाठी मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त होत आहेत. तथापि, महाऑनलाईनचे पोर्टलवर वारंवार ४०४ या एरर येत आहे.प्रमाणपत्र निर्गमित करताना, बायोमेट्रिक थंम दिल्यानंतर ही प्रमाणपत्र जनरेट होण्यासाठी महाआयटीचे स्तरावर विलंब होत आहे. नागरिक व विद्यार्थी यांनी यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी, धाराशिव यांनी केले आहे.

## माजी सैनिकाचा मुलगा झाला फौजदार



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.८ ऑगस्ट-**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत माजी सैनिकांच्या मुलाने यशाला गवसणी घालता येते हे दाखवून दिले आहे. परंडा शहरातील सोमवार गल्ली येथील सोहन चांगदेव हजारे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळविले आहे. त्याची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली आहे. सोहनचे वडील हे माजी सैनिक होते त्यांचे अपघाती निधन झाले तेव्हा सोहन हा दहा वर्षाचा होता. आई मंगल हजारे यांनी मोठ्या कष्टाने मुलाला शिक्षण दिले आहे. सोहन यांनी परंडा शहरात जि.प.शाळेत प्राथमिक शिक्षण घेतले तर माध्य.चे शिक्षण कै.महारुद्र बप्पा मोटे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय परंडा येथे घेतले होते, पुढे हडपसर येथे वाणिज्य शाखेची पदवी घेतली पदवीनंतर फौजदार होण्याचे स्वप्न उराशी बाळगून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत यश मिळविले आहे. कै.महारुद्र मोटे माध्य. व उच्च माध्य.विद्यालयाच्या वतीने सोहमचासत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य हनुमंत यादव, दादासाहेब जगताप, पटेल, प्रा. शरद झोंबाडे, काळे, सरडे, भोसले, प्रा.मारकड, प्रा.आटोळे, प्रा.अजित देशमुख, प्रा.रणजित देशमुख, प्रा.खैरे, प्रा.मणियार, प्रा.अजय मेटकर, प्रा.वनवे, प्रा.अंजली, हाके, सुरवसे, भैरट, राजाभाऊ बनसोडे, देविदास गरड, सोमनाथ जाधव यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे

**जिल्हयातील शासकीय,निमशासकीय कार्यालय,खाजगी उद्योगात नोकरीची संधी... शिक्षणानुसार विद्यावेतन आणि अनुभव प्रमाणपत्रही मिळणार...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ ऑगस्ट-**

युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना चालू आर्थिक वर्षापासून कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविण्यता विभागाने सुरु केली आहे. त्याअनुषंगाने शिक्षण पूर्ण करुन नोकरीसाठी अनुभवाच्या शोधात असलेल्या युवक वर्गाला विद्यावेतनासह शिक्षणाच्या बळावर अनुभवाची जोड देता यावी या उद्देशाने राज्य शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु केली आहे.जिल्हयातील युवकांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी केले आहे.



मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतंर्गत युवकांना विद्यावेतनासह नोकरीचा अनुभव मिळण्यासाठी मोठया प्रमाणात संधी उपलब्ध झाली आहे.उमेदवारांनी विविध शासकीय, निमशासकीय कार्यालयात तसेच उद्योजकाकडील विविध पदावरील कामाचा अनुभव प्राप्त करण्यासाठी सहा महिन्याकरिता इंटर्नशीसाठी संबंधित शासकीय कार्यालय, निमशासकीय कार्यालय तसेच उद्योजक यांचेकडे उपलब्ध असलेल्या पदाकरिता उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक पात्रतेनुसार rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करुन संबंधित आस्थापनेकडे इच्छूकता दर्शवावी.

बारावी पास विद्यार्थ्यांना प्रतिमहा सहा हजार आयटीआय, पदविका उत्तीर्ण युवकांना आठ हजार तर पदविधर, पदवित्तर युवकांना दहा हजार रुपये असे विद्यावेतन या योजनेअंतर्गत दिले जाणार आहे. हे विद्यावेतन प्रशिक्षणार्थीच्या थेट बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने दरमहा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाकडून अदा केले जाईल. प्रशिक्षणार्थी एका महिन्यात दहा दिवस किंवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असेल तर त्या महिन्याचे विद्यावेतन त्यांना दिले जाणार नाही.

१८ ते ३५ वयोगटातील युवक-युवतींना या योजनेत सहभागी होता येणार आहे.या योजनेअंतर्गत खाजगी क्षेत्रातील उद्योजकांना एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के व सेवा क्षेत्रासाठी २० टक्के उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील.तर शासकीय, निमशासकीय आस्थापना उद्योग, महामंडळ यामध्ये मंजूर पदाच्या ५ टक्के किंवा कमीत कमी एक याप्रमाणे उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील. तरी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा जास्तीत जास्त उमेदवारांनी लाभ घ्यावा व या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित तालुक्याच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,धाराशिव येथे संपर्क साधावा असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

# तुळजापूर विधानसभेवर शिवसेनेचा भगवा फडकविणार : कमलाकर चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ ऑगस्ट-**

तुळजापुर विधानसभा मतदार संघात शिवसेना पक्ष प्रमुखांनी अपल्याला उमेदवारी दिली तर आपण ही निवडणुक पुर्ण ताकदिनीशी लढवुन या मतदार संघावर पहिल्यांदाच शिवसेनेचा भगवा फडकवुन दाखविणार असल्याचे शिवसेनेचे माजी उपजिल्हाप्रमुख कमलाकर चव्हाण यांनी पत्रकार परीषदेत बोलतांना म्हटले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर दि. ७ ऑगस्ट रोजी नळदुर्ग येथे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख कमलाकर चव्हाण यांनी पत्रकार परीषद आयोजित केली होती. या पत्रकार परीषदेस शिवसेनेचे उपतालुका प्रमुख सरदारसिंग ठाकुर, शहर प्रमुख संतोष पुदाले, शंकर चव्हाण आदिजन उपस्थित होते.

पत्रकार परीषदेत बोलतांना कमलाकर चव्हाण यांनी म्हटले की, यावेळी राज्यात विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना होणार आहे. तुळजापुर विधानसभा मतदार संघ हा महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसकडे आहे मात्र शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे याच्या आदेशानुसार शिवसेनेचे जिल्हासंपर्क प्रमुख सुनिल काटमोरे यांनी विधानसभा निवडणुकी निमित्त धाराशिव जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघाचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी जे विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी इच्छुक आहेत त्यांनी पक्षाकडे रीतसर उमेदवारीची मागावी करावी असे सांगितले त्यानंतर आपण तुळजापुर विधानसभा मतदार संघातुन उमेदवारी मिळावी यासाठी आपण पक्षाकडे रीतसर उमेदवारीची मागणी केली असल्याचे कमलाकर चव्हाण यांनी म्हटले आहे. हिंदुहृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे आई तुळजाभवानीच्या तुळजापुर विधानसभा मतदार संघावर शिवसेनेचा भगवा फडकवावा हे एक स्वप्न होते. मात्र आजतागायत बाळासाहेबांचे हे स्वप्न पुर्ण होऊ शकले नाही मात्र यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या जागा वाटपामध्ये हा मतदार संघ शिवसेनेला सोडवुन घेऊन मला उमेदवारी दिली तर मी हिंदुहृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी ही निवडणुक पुर्ण ताकदीनीशी लढवुन या मतदार संघावर पहिल्यांदा शिवसेनेचा भगवा झेंडा फडकवुन दाखविणार असल्याचे कमलाकर चव्हाण यांनी म्हटले आहे.

आपण गेली ३५ वर्षे शिवसेनेत निष्ठेने काम करीत आहोत. १९९० साली ज्यावेळेस छगन भुजबळ शिवसेना सोडुन काँग्रेसमध्ये गेले त्यावेळेस धाराशिव जिल्ह्यात शिवसेनेमध्ये प्रचंड मोठे वादळ निर्माण झाले होते. जिल्ह्यातील शिवसेनेचे अनेक मातब्बर नेते व पदाधिकारी शिवसेना सोडुन काँग्रेसमध्ये गेले होते. त्यावेळी शिवसेनेतुन बाहेर पडलेल्या गद्दारांनी जिल्ह्यातील शिवसेना संपविण्याचा विडा उचलला होता मात्र त्यावेळी आपण शिवसेनेमध्ये खंबीरपणे उभे राहिलो इतकेच नव्हे तर जिल्ह्यातील एकही शिवसेनेची शाखा बरखास्त होऊ दिले नाही. गेल्या ३५ वर्षात शिवसेनेच्या माध्यमातुन आपण अनेक आंदोलने करून शेतकरी तसेच सर्वसामान्य नागरीकांना न्याय देण्याचा प्रयत्न केलो. जिल्ह्यातील काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या मातब्बर नेत्यांना टक्कर देतांना प्रसंगी मी जेलमध्ये गेलो मात्र शिवसेनेचा भगवा ध्वज कधीच खाली पडु दिलो नाही म्हणुन आज शिवसेना धाराशिव जिल्ह्यात मोठ्या दिमाखात उभी आहे. तुळजाभवानी साखर कारखान्यावरील आंदोलन असेल किंवा नळदुर्गच्या पेट्रोलपंपावर झालेले आंदोलन हे आंदोलन त्यावेळी फार गाजले होते. फुलवाडी टोलनाक्यावर आंदोलन करून नळदुर्गकराना टोलमाफी मिळवुन घेण्याचे कामही आपण केले आहे. या कामाच्या जोरावर शिवसेना पक्षप्रमुखांचा आशिर्वाद मिळाला तर या विधानसभा निवडणुकीत आपण आई तुळजाभवानीच्या तुळजापुर विधानसभा मतदार संघातुन निश्चितपणे विजयी होऊन दाखवु असेही कमलाकर चव्हाण यांनी म्हटले आहे. तुळजापुर तालुक्यातील आजी माजी आमदारांनी ना शेतकऱ्यांचे भले केले ना युवकांना रोजगार मिळवुन देण्यासाठी तालुक्यात कुठला उद्योग सुरु केला. केवळ या आजी माजी आमदारांनी आपले घर भरण्याचे काम केले असेही कमलाकर चव्हाण यांनी म्हटले आहे. त्यामुळे या मतदार संघातील जनता ही शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे असेही कमलाकर चव्हाण यांनी म्हटले आहे.

# पोलीस अधिक्षकपदी अविनाश बारगळ



तभा वृत्तसेवा
बीड दि.८ ऑगस्ट

**पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या जागी अविनाश बारगळ अमरावतीवरून येतं आहेत. बारगळ यांची अमरावतीतील कारकीर्द राज्यात चर्चेत राहणारी ठरलेली होती.नंदकुमार ठाकूर यांची बदली झाली असली तरी त्यांना नवीन ठिकाणी अजून नियुक्ती मिळालेली नाही.**

बीडमध्ये नंदकुमार ठाकूर यांनी दोन वर्ष सेवा बजावल्यानंतर विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने त्यांची बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी अविनाश बारगळ बीडला येतं आहेत.बारगळ यांनी अमरवतीमध्ये चार वेळा पोलीस विभागात सेवा बजावली आहे.

अतिरिक्त पोलिस अधिक्षक त्यानंतर पोलिस उपायुक्त म्हणून अमरावती शहरात त्यांनी कार्यकाळ उपभोगल्यानंतर अमरावती पोलीस अधिक्षक आणि नंतर पुन्हा अमरावतीमध्येच सीआयडीचे अधीक्षक म्हणून गृहविभागाने त्यांना काम करण्याची संधी दिली होती. एकाच शहरात चार वेळा पोलीस दलात वेगवेगळ्या पदावर काम करणारे अधिकारी म्हणून बारगळ यांची राज्यात मोठी चर्चा झाली होती.आता ते अमरावतीच्या सीआयडी विभागातून बीडला पोलीस अधिक्षक म्हणून येतं आहेत.एक चांगला आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे.

# बीड मतदारसंघात वीज वितरणासंबंधीचे सर्व सर्व विषय मार्गी लावा

## आ. संदीप क्षीरसागरांची मागणी

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ ऑगस्ट

बीड मतदारसंघात वीज वितरणासंबंधीच्या असलेल्या नागरिक, शेतकरी यांच्यासाठी महत्वपूर्ण असलेले सर्व प्रलंबित व प्रस्तावित विषय मार्गी लावन्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. यामध्ये शेतकऱ्यांना शेतीपंपाचे नवीन वीज कनेक्शन जोडणी, विविध योजनेंतर्गत रोहित्र तसेच तत्सम साहित्य मागणीचे प्रस्तावांचा तात्काळ निपटारा वीज वितरण कंपनी कडून करण्यात यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.



बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड शहर, बीड तालुका व शिरूर का. तालुक्यातील वीज वितरणासंबंधी शेतकरी आणि नागरिकांच्या अनेक मागण्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने पाली येथील मंजूर असलेल्या ३३/११ के.व्ही. उपकेंद्राचे अद्यापपर्यंत काम सुरु झालेले नाही. तसेच म्हाळसजवळा, नामलगाव, पिंपळवाडी, बेलुरा येथील ३३/११ के.व्ही. उपकेंद्राचे कामही पूर्ण झालेले नाही. याबाबत परिसरातील गावातील नागरिक या उपकेंद्राचे काम पूर्ण करून सदरील उपकेंद्र लवकरात लवकर कार्यरत करावे अशी मागणी करत आहेत. बीड मतदारसंघात शेतकऱ्यांना नवीन वीज कनेक्शन तसेच नवीन रोहित्र देण्यात यावे. ज्याठिकाणी शेतीपंपासाठी नवीन वीज कनेक्शन देण्यात आले आहे, त्याठिकाणी ओव्हरलोड मुले रोहित्र जळण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. अशा ठिकाणी तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. यासोबतच मतदारसंघातील विविध निकषपात्र ठिकाणांवर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या आर.डी.एस.एस. व एन.एस.सी. योजनेंतर्गत प्रातवित कामांना मंजुरी देऊन तात्काळ कामे पूर्ण करण्यात यावीत अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी वीज वितरण कंपनीकडे केल्या आहेत.

# बोगस वैद्यकीय व्यवसायीक आढळल्यास कडक कार्यवाही करण्यात येईल

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ ऑगस्ट

बोगस वैद्यकीय व्यवसायीक आढळल्यास कडक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे निर्देश आज झालेल्या बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समितीच्या जिल्हास्तरीय बैठकीत एकत्रितरीत्या घेण्यात आले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समितीची बैठक घेण्यात आली.या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, प्र.पोलीस उपअधीक्षक उमा शंकर कस्तुरे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एल. आर. तांदळे, सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन आर.एम. बजाज, यांच्यासह समितीवरील सदस्य उपस्थित होते. जिल्हास्तरीय बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समितीची स्थापना महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षक व औषधी द्रव्य विभाग निर्णय क्र.सीआयएम १०९९/ प्र.क्र.३५५/९९/ अधिनियम/दि. ०७/०२/२००० अन्वये गठित करण्यात आलेली आहे. या अंतर्गत बैठकीचे आयोजन करण्यात येते.झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार बोगस वैद्यकीय व्यवसायिकांवर जिल्ह्यात आढळल्यास कडक कार्यवाही करण्यात येईल तसेच नागरीकांना अशी माहिती आढळल्यास त्यांनी प्रशासनाकडे ती दयावी. त्यावर योग्य ती नियमाप्रमाणे कार्यवाही करून माहिती गुप्त ठेवण्यात येईल.

# आज 'घरो घरी तिरंगा' या उपक्रमातंर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ ऑगस्ट

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर मागील काही वर्षांपासून घरो घरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यातंर्गत उद्या शुक्रवारी तिरंगा रॅली चे आयोजन छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथुन करण्यात येत आहे.राज्यभर घरोघरी तिरंगा उपक्रम राबविण्यात येत असून या अतंर्गत बीडमध्ये शुक्रवारी सकाळी १०:३० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथुन या उपक्रमाचा शुभारंभ होणार असून ही रॅली पुढे कारंजा-भाजीमंडई मार्ग-छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल यामार्गास जाणार आहे.

घरो घरी तिरंगा या उपक्रमाअंतर्गत तिरंगा रॅली , तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फी, तिरंगा सेल्फीज, तिरंगा ट्रिब्युट, तिरंगा मेळा असे उपक्रम राबविण्यात येणार आहे. या तिरंगा रॅलीमध्ये बीडच्या नागरीकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाने किया केले आहे.

# ३ लाख ५२ हजार ८८० लाभार्थ्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये जिल्ह्यातून अर्ज दाखल

## ९४.३४% अर्जांची छाननी करून स्वीकृती मोबाईल संदेश

तभा वृत्तसेवा
बीड दि.८ ऑगस्ट




बीड जिल्ह्यामध्ये आतापर्यंत ३ लाख ५२ हजार ८८० महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेमध्ये अर्ज दाखल केले असून ९४.३४ % टक्के अर्जांची छाननी करून मोबाईलव्दारे स्वीकृती संदेश देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये लाभार्थी महिलांची नोंदणी आणि अर्जाची पडताळणी करण्याची विशेष मोहीम जिल्हयात सुरू असून याअंतर्गत ३ लाख ५२ हजार ८८० महिलांनी दाखल केलेल्या अर्जाची छाननी करून ३,३२,८९२ लाभार्थी महिलांच्या अर्जांना स्वीकृती देऊन मोबाईल संदेश पाठविण्यात आलेले असून आजपर्यंत ९४.३४ %टक्के काम झालेले आहे.

ज्यांचा ऑनलाईन अर्ज भरतांना कागदपत्राच्या बाबतीत काही त्रुट्या आढळून आले आहेत. त्यांच्या मोबाईलवर संदेश जात असून अश्या अर्जदार महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत नारी शक्ती दूत पच्या माध्यमातून ज्या मोबाईल ऍप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्याच मोबाईल मधून अर्ज दुरूस्त (एडिट) करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या महिला अर्जदारांनी अर्जासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे जोडलेले आहेत त्यांचे अर्ज स्वीकृती देण्यात येत आहे. व तसा संदेश महिला अर्जदारांच्या मोबाईलवर जात आहे. स्वीकृती (approved) असा संदेश आल्यास आपला अर्ज यशस्वीरिता भरला गेला असल्याचे कळते. तथापि ज्या महिला अर्जदारांना आपला अर्ज पार्शली रिजेक्टेड (partially rejected) असा मोबाईल संदेश आलेला आहे त्यांनी तात्काळ नारी शक्ती दूत ॲपच्या माध्यमातून ज्या मोबाईल ऍप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्याच मोबाईल ऍप मधून अर्ज एडिट करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन, जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

# केज तालुक्यातील विहीरी व गायगोठा रक्कम जमा करा

## अन्यथा के.पं.स.समोर आत्मदहन करणार - रोहन गलांडे पाटील

तभा वृत्तसेवा
केज दि.८ ऑगस्ट

केज तालुक्यातील प्रेत्येक ग्रामपंचायत अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या माध्यमातून खोदलेल्या शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे सिंचन विहीर खोदण्यासाठीचे ४ लाख रुपये अनुदान व गायगोटा योजनेचे ७८ हजार अशा दोन्ही योजनेचे शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी व तात्काळ शासनाने द्यावी जर तात्काळ रक्कम देण्यात आली नाही तर केज पंचायत समिती समोर आत्मदहन करणार आहे असा इशारा शासनाला निवेदनाद्वारे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी दीला आहे या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या माध्यमातून केज तालुक्यातील लाभार्थी शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे शासन कागदोपत्री प्रक्रिया ज्या लाभार्थांची पुर्ण झाली आहे व केज तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत ज्या लाभार्थ्यांनी मनरेगा जलसिंचन विहीर





योजनेचे लाभार्थी आहेत लाभार्थांन कडील शासन प्रक्रिया पूर्ण झालेली आहे परंतु अद्याप पर्यंत लाभार्थ्यांना मनरेगा योजने अंतर्गत झालेल्या विहीरीचा ऐकही रुपये रक्कम देण्यात आलेली नाही चार - पाच महिने झाले केज तालुक्यातील विहीर लाभार्थी शेतकरी मनरेगा विहीर योजने अंतर्गत ४ लाख अनुदान मिळणार म्हणून व्याजाचे पैसे काढून विहीरीला खर्च करून विहीर खोदल्या आहेत परंतु शासना कडुन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खोदलेल्या विहीरीची ४ लाख रुपये रक्कमेतील ऐक रुपये शेतकऱ्यांच्या , लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेला नाही तरी शासनाने केज तालुक्यातील प्रेत्येक ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खोदलेल्या विहीरीचे ४ लाख अनुदान व गायगोठा योजनेचे ७८ हजार शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी,अनुदान शासन कागदोपत्री प्रीक्रीया तात्काळ पुर्ण करुन लाभार्थ्यांच्या बँक खात्यात तात्काळ जमा करावे अन्यथा अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील केज पंचायत समिती समोर आत्मदहन करण्याचा शासनाला इशारा रोहन गलांडे यांनी निवेदनाद्वारे दीला आहे.

जलसिंचन विहीर लाभार्थी यांची बीले पास होऊन दोन महीने झाले आहेत तरी शासनाकडून निधी आलेला नाही.ग्राम रोजगार सेवक संघटना केज तालुका सचिव अनिल घोडके.

# प्रा.सुरेखा निगुळे होळकर यांना पीएच.डी. पदवी प्रदान

तभा वृत्तसेवा
केज दि.८ ऑगस्ट

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील रहिवासी प्रा. सुरेखा निंगुळे होळकर यांना १८ मार्च २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. प्राध्यापक सुरेखा ह्या सख्या सिद्धांत इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मैनेजमेंट पुणे येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्रातील संस्थांमध्ये महिलांचे नेतृत्व विकास व ग्रामीण भागामध्ये स्त्रियांचे महत्व अनन्यसाधारण वाढत आहे, यासंदर्भात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वाणिज्य व व्यवसाय विभागातील मानव संसाधन व्यवस्थापन यामध्ये डॉ. सुरेखा निंगुळे यानी पुणे जिल्ह्यातील गावच्या विकासावर महिलांच्या नेतृत्वाचा प्रभाव (Impact of women leadership in development of villages in Pune. dis-



trict) हा संशोधन प्रबंध विद्यापीठाला सादर केला. पासाठी डॉ. अनिता खटके यांनी मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे नेकील वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲड रिसर्च पुणे येथील संशोधन प्रमुख डॉक्टर आनंद दडस यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यांच्या या यशाबद्दल डॉ. सुरेखा यांचे सिद्धांत महाविद्यालयाचे संस्थापक

अध्यक्ष आर. एस. यादव, उपाध्यक्ष सिद्धांत यादव, उपाध्यक्षा याशिका यादव, संचालक एस. जी. वाळके, सर्व सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सन्मान करून अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल मावळ व पुणे परिसरातून त्याच्यावर कोतुकाचा वर्षाव होत आहे.

त्यांच्या या यशामागे त्यांचे पती श्री. सुरेश निंगुळे, मुलगा स्वरीत निंगुळे, देवांश निगुळे यांचा मोलाचा वाटा आहे. तांच्या मोठ्या भगिनी डॉ. आशालता भारजकर यांना सुद्धा काही दिवसापूर्वी पीएच डी पदवी प्रदान झालेली आहे. दोघी बहिणी पीएच. डी. झाल्याबद्दल व्हांनी आपल्या आई रुक्मिणी जगन्नाथ होळकर व वडील जगनाथ होळकर यांचे मनापासून आभार व्यक्त केले.

# सुरेश नामदेव निगुळे यांना पीएच.डी. पदवी प्रदान

तभा वृत्तसेवा
केज दि.८ ऑगस्ट

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील रहिवासी श्री. सुरेश नामदेव निंगुळे याना १ ऑगस् २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. श्री. सुरेश नामदेव निंगुळे हे सध्या प्रादेशिक व्यवसाय व्यवस्थापक म्हणून खाजगी कंपनी मध्ये पुणे येथे कार्यरत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वाणिज्य व व्यवसाय विभागातील मानव संसाधन व्यवस्थापन यामध्ये डॉ. सुरेश नामदेव निंगुळे यांनी 'पुणे प्रदेशातील श्वसन औषधांच्या संदर्भात औषय उद्योगाच्या विपणन पद्धतीचे सखोल विश्लेषण (- Criti-cal -nalysis of Marketing Practices of the Pharmaceutical Industry Concerning Respiratory Medicine In Pune Region) हा संशोधन प्रबंध विद्यापीठाला सादर



केला. यासाठी डॉ. सचिन बोरगावे, डायरेक्टर, प्रतिभा इन्स्टिटयूट ऑफ बिजनस मॅनेजमेंट, पुणे यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या या पशाबद्दल डॉ सुरेश यांचे मोठे बंधू श्री मधुकर निगुळे, श्री. भारत निंगुळे, छोटी बहीण सौ. अनुराधा भास्कर लांडगे व सर्व सहकारी यांनी सन्मान करून अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल पुणे परिसर व त्यांच्या मुळ गावातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

त्यांच्या या यशामध्ये त्यांच्या पत्नी डॉ. सुरेखा सुरेश निंगुळे, मुलगा स्वरीत निंगुळे, देवांश निंगुळे यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या पत्नी डॉ. सुरेखा सुरेश निंगुळे यांना सुद्धा काही दिवसापूर्वी पीएच. डी पदवी प्रदान झालेली आहे.


# औद्योगिक वसाहत निर्मितीच्या मार्गावर अंबाजोगाईची वाटचाल सुरु

## प्रकल्प जमिनीच्या समतल सर्वेक्षण आणि सिमांकनासाठी निघाली निविदा

तभा वृत्तसेवा
अंबाजोगाई दि.८ ऑगस्ट

अंबाजोगाईकरांसाठी बहुप्रतीक्षित आणि शहर विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या शासकीय औद्योगिक वसाहत (एमआयडीसी) निर्मितीच्या दृष्टीने आ. नमिता मुंदडा यांच्या आग्रही पाठपुराव्यानंतर शासन पातळीवर वेगाने हालचाली सुरु आहेत. लवकरच अंबाजोगाई 'एमआयडीसी'साठी काळवटी तांडा परिसरात समतल सर्वेक्षण आणि सिमांकन करण्यात येणार असून या कामाची निविदा देखील प्रकाशित झाली आहे.

अंबाजोगाई शहराचा विकास झपाट्याने होत असल्याने व या ठिकाणी बहुतांश जिल्हास्तरीय सर्व कार्यालय कार्यरत आहेत. या ठिकाणी सहकारी साखर कारखाना, सुतगिरण्या, कृषी उत्पादनावर आधारीत प्रक्रिया उद्योग, सहकारी बँका, पतसंस्था, आरोग्य विषयक सुविधा, कुशल मनुष्यबळ उपलब्ध आहे. त्याच प्रमाणे शहरापासून लातूर येथील विमानतळ जवळ असून परळी, घाटनांदुर, लातूर येथील रेल्वे स्टेशनही जवळच आहेत. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणुकदारांच्या दृष्टीने अंबाजोगाई हे शहर सोयीचे आहे. शहरालगत मोठ्या प्रमाणावर गायरान, मोकळ्या जागा उपलब्ध आहेत. त्यामुळे या ठिकाणी एमआयडीसी प्रकल्प उभारणे अत्यंत आवश्यक आहे. या प्रकल्पामुळे या भागातील सुशिक्षीत, बेरोजगारांच्या हाताला रोजगार मिळवून उद्योजकांना मोठ्या प्रमाणात चालना मिळेल. व अंबाजोगाई येथे तातडीने एमआयडीसी व्हावी यासाठी आ.नमिता मुंदडा पुढाकार घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, प्रधान सचिव उद्योग विभाग



यांच्याकडे एमआयडीसी अंतर्गत अंबाजोगाई येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मंजूरी द्यावी अशी विनंती केली होती. तसेच, या बाबत आ. मुंदडा यांनी महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव, भूसंपादन विभागाचे महाव्यवस्थापक आणि व्यवस्थापक तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडे सातत्याने पाठपुरावाही केला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नाला यश आले आणि काळवटी तांडा परिसरातील जागा 'एमआयडीसी'साठी निश्चित करण्यात आली. हा भाग डोंगराळ असल्याने याचे समतल सर्वेक्षण करून सिमांकन करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून निविदा देखील प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही प्रक्रिया अंबाजोगाई 'एमआयडीसी' निर्मितीतील महत्वाचा टप्पा असणार आहे. यानिमित्ताने शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या अंबाजोगाई शहर औद्योगिक शहर बनण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरु केली आहे. एमआयडीसी मुळे या भागातील बेरोजगारांना रोजगार मिळेल व उद्योजकांना चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्ती करून आ.नमिता मुंदडा यांनी या बाबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, आ. पंकजाताई मुंडे, भाजप नेत्या डॉ.प्रितमताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

### स्व.डॉ. विमलताई मुंदडा यांनीही केला होता प्रयत्न

अंबाजोगाईत एमआयडीसी व्हावी म्हणून दिवंगत मंत्री स्व.डॉ.विमलताई मुंदडा यांनी सन २००४ मध्ये वरवटी येथे पंचतारांकित एमआयडीसी मंजूर केली होती. त्यासाठी गायरान व शेतकर्यांची जमीन संपादन करणे आवश्यक होते. परंतु, शेतकर्यांनीह विरोध केल्याने सदर प्रकल्पासाठी जागा उपलब्ध झाली नाही. त्यांचे अपूर्ण स्वप्न आत त्यांच्या स्नुषा आ.. नमिता यांच्या माध्यमातून पूर्ण होण्याची चिन्हे आहेत.

CMYK

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सेट परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. ८ ऑगस्ट-**

शिवाजी महाविद्यालयातील वाणिज्य विभाग, भौतिकशास्त्र विभाग व रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थी सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणेतर्फे ७ एप्रिल २०२४ रोजी सहाय्यक प्राध्यापक पदासाठी घेण्यात आलेली राज्यस्तरीय पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाले.

वाणिज्य विभागातील सारडा श्रेया श्रीराम, चिंतलघट श्रुती साईनाथ, खानापुरे साक्षी राजेप्पा, भौतिकशास्त्र विभागातील मुल्ला समरीन अय्युब, रसायनशास्त्र विभागातील अंजुम रसूल पठाण, सुप्रिया ज्योतिराम शेंदकर हे प्राध्यापक पदाची सेट परीक्षा उत्तीर्ण झाले. यांना डॉ. ह. वा. कुलकर्णी, डॉ. डी. बी. कोनाळे, प्रा.खरात, प्रा. बेदरे, प्रा. पवार, प्रा. चिवटे-पाटील, डॉ. व्ही. व्ही. जाधव, डॉ. एच.एम. ढगे, डॉ. एच.ए. तिरपुडे, डॉ. डी.बी.मुळे, डॉ. ए. एस. टेकाळे, प्रा. एस. एस. पावडे, प्रा. ए.टी. नरहरे, प्रा. जी.जी. देशपांडे, डॉ. एस. एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले. या सर्वांचे अभिनंदन किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर, सचिव पी. टी. शिंदे, प्राचार्य डॉ. अरविंद नवले, उपप्राचार्य डॉ.आर.एम.मांजरे यांनी केले.

### संक्षिप्त वृत्त



## महाराष्ट्र विद्यालयात वृक्षारोपण

**निलंगा, दि.८ ऑगस्ट-**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील उद्योजक व शारदोपासक शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष राजेश वलांडे यांचा वाढदिवस महाराष्ट्र विद्यालय व मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. पर्यावरण संरक्षण काळाची गरज आहे. पर्यावरणाचा समतोल राखणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. दरम्यान, महाराष्ट्र प्राथमिक विद्यालयाचे सहशिक्षक चंद्रकांत वलांडे यांची मुख्याध्यापकपदी व महाराष्ट्र माध्यमिकचे उपमुख्याध्यापक दयानंद जाधव यांची प्राचार्यपदी पदोन्नती झाल्यामुळे मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रदीप पाटील, प्राचार्य कळमासे, सेवानिवृत्त प्रा.अनंत गोदरे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक महेबूब लष्करे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## उदगीर येथे उद्या सकल हिंदू समाजाच्या वतीने मूक मोर्चा

**उदगीर, दि. ८ ऑगस्ट-**

नवी मुंबई मधील उरणमध्ये यशश्री शिंदे या युवतीची लव्ह जिहादच्या माध्यमातून मुस्लिम समाजाचा दाऊद शेख याने क्रूर हत्या करून तिचे शव उरण कोर्टनाका पेट्रल पंपाजवळ आज्ञात स्थळी टाकून दिले. तसेच दि. ३० जूलै रोजी धारावी येथील बजरंग दलचा कार्यकर्ता अरविंद वैश्य याने अतिक्रमण विरोधात आवाज उठवल्यामुळे भर रस्त्यात जिहाद्याकडून त्याची क्रूर हत्या करून हात कापण्यात आले व त्याच्या अंत्यविधी यात्रेवर जिहाद्यांनी दडगफेक करून वातावरण तणावग्रस्त केले व यात अनेक नागरीक, महिला व विशेष पोलिस कर्मचारीही जखमी झाले आहेत. आता ही जिहादी मानसीकता संपली पाहिजे यासाठी उदगीर शहरासह तालुक्यातील सर्व सामाजिक, राजकीय, धार्मिक संघटना, विद्यालयीन, महाविद्यालयीन विद्यार्थी शनिवार, दि.१० ऑगस्ट रोजी सांय. ४.३० वा. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते छ. शिवाजी महाराज चौकापर्यंत शांतीच्या मार्गाने मूक मोर्चा काढणार आहेत. मूक मोर्चाच्या माध्यमातून अरविंद वैश्य व यशश्री शिंदे यांना सकल हिंदू समाजाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात येणार आहे. हे निवेदन विश्व हिंदू परिषद, उदगीर शहर, पिपल्स रिपब्लिकन पार्टी, श्रीराम प्रतिष्ठाण, अखिल भारतीय खाटीक समाज, बारा बलुतेदार समाज विकास परिषद, विद्रोही पत्रकार संघ, भाजपा अ. जा. प्रदेश उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, भाजपा जिल्हाध्यक्ष, लातूर, भाजपा उदगीर शहर अध्यक्ष युवा मोर्चा, जीवन प्रयाग फाउंडेशन, जीवन प्रयाना फाउंडेशन, शिवसेना उद्धव ठाकरे उदगीर शहर अध्यक्ष, आझाद आदिवासी कोळी महादेव सामाजीक संघटना, श्री योग वेदांत सेवा समिती, महाराष्ट्र संघर्ष अभियान, शिवप्रतिष्ठाण अभियान, उद्धव ठाकरे शिवसेना (ता.उदगीर) यांच्या वतीने उपजिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.



## उपसरपंच शिंदाळकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**येरोळ, दि. ८ ऑगस्ट-**

सतीश सिंदाळकर मित्र मंडळाच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना दप्तर, पेन साहित्य वाटप करण्यात आले. उपसरपंच सतिश सिंदाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त नाहका खर्च टाळून मित्र मंडळाच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील व जिजामाता विद्यालयातील २५ विद्यार्थ्यांना दफ्तर, दोन पेन तर इतर दोन्ही शाळेतील ७०० विद्यार्थ्यांना प्रतेक विद्यार्थी दोन पेन याप्रमाणे शालेय साहित्य वाटप करण्यात आले. शाळेसाठी स्वामी विवेकानंद छत्रपती शिवाजी महाराज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर साहित्यसम्राट अण्णा साठे, डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्रावरील दोन्ही शाळेंना एक एक ग्रंथ असे प्रति शाळेला पाच प्रमाणे दहा ग्रंथ यांच्याकडून देण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक धर्मपाल निचळे, प्राचार्य बालाजी महावरकर, उपसरपंच सतिश सिंदाळकर, पत्रकार शिवानंद भुसारे, ओबीसी सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा प्रभाकर चोचंडे, ग्रामविकास अधिकारी संदीप शिरूरे, मैनोद्दीन मुजेवार, शालेय समिती अध्यक्ष तानाजी दाडगे, संदीप येरोळकर, मच्छिंद्र भालेकर,एल जी लोंढे, विनोद लोंढे, बालाजी झटे,हणमत पालकर, प्रभाकर पालकर, पप्पू बनसोडे,भिवाजी लोकरे, धोंडिराम कोकरे, ओमप्रकाश तांबोळकर, हाबीब पठाण, गुडेराव चौसष्ठे, राम सुमठाणे, सचिन गरिबे, शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# मतदारसंघात सर्वांगिण विकास

**क्रीडा मंत्री संजय बनसोडे; लोहारा येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन**



**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. ८ ऑगस्ट-**

मतदार संघातील जनतेने मतदान रुपी आशिर्वाद दिल्यानंतर मागील पाच वर्षांच्या काळात उदगीर मतदार संघात विकासाचा डोंगर उभा केला. रस्ते, वीज, पाणी व आरोग्यासह नागरिकांना मूलभुत सुविधा उपलब्ध करुन दिल्या. विविध इमारतीसह प्रत्येक समाजातील घटकाला केंद्रबिंदू मानून सर्व समाज घटकांना सोबत घेवून मतदार संघाचा विकास केला असल्याचे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले.

ते लोहारा ता.उदगीर येथील विविध विकास कामांच्या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी बोलत होते. संजय बनसोडे यांनी लोहारा येथील ग्रामदैवत महादेव मंदिर माळ बेट व गैबुसाब दर्गा उरूस यात्रेस भेट देवून दर्शन घेतले.

यावेळी माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, भाजपाचे प्रवक्ते शिवानंद हैबतपुरे, बालाजी भोसले, शिवशंकर धुप्पे, सुनील केंद्रे, श्याम डावळे, वसंत पाटील, सुशांत शिंदे, प्रवीण सुरडकर, सायस दराडे, सरपंच गणपत कांबळे, सुभाष कांबळे , श्याम सोनटक्के, चंदु भातमुडे, बबन धनबा, करखेलीचे सरपंच दिलीप शिंदे, उपसरपंच शंकर भातमुडे, मनोहर देवंग्रे, दिलीप पाटील, विजय कांबळे, उध्दव रक्षाळे, माधव कांबळे, अरविंद गिलचे, संदीप धनुरे, सतिश गायकवाड, विजयकुमार हेडगे, शेषराव हेळगे, ग्रामसेवक गजानन भोसले, एस.आर. कांबळे, प्रकाश हैबतपुरे, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, लोहारा येथील विविध विकास कामांसाठी कोट्यावधीचा निधी उपलब्ध करुन दिला असुन आज आपण बुध्द विहारासाठी २५ लक्ष रु., डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी १० लक्ष, महादेव मंदिर बेट सभागृह बांधकाम ासाठी १० लक्ष, नरसिंगवाडी सभागृहासाठी ८ लक्ष, महादेव मंदिर प्रवेशव्दारासाठी १० लक्ष, मज्जीद ते उदगीर लातूर सी.सी. रोड १७ लक्ष, बालाजी रक्षाळे घराकडे जाणारा रस्ता १० लक्ष, मुस्लिम कब्रस्तान संरक्षण भिंत बांधकाम ासाठी ६ लक्ष रुपये असे एकूण ९६ लाखांच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले आहे. उदगीर मतदार संघात सौर ऊर्जेचे प्रकल्प उभारल्यामुळे या भागातील नागरीकांना भविष्यात २४ तास वीज मिळणार आहे. राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' मतदार संघात प्रभावीपणे राबवुन रक्षाबंधन पर्यंत माझ्या पात्र झालेल्या बहिणीच्या खात्यावर रक्कम जमा होईल. थोड्याच दिवसात मतदार संघातील विविध विकास कामांचे लोकार्पण सोहळे आपण घेणार असून उदगीर जिल्हा झाला पाहिजे म्हणून आपण सुविधा उपलब्ध केल्या आहेत. भविष्यात उदगीर जिल्हा करण्यासाठी आपण आग्रही मागणी केली आहे. महाराष्ट्रात छोट्या जिल्ह्यांची निर्मिती होईल तेंव्हा आपल्या उदगीरचा नंबर पहिला असेल असे आश्वासन ना.संजय बनसोडे यांनी सांगितले. यावेळी लोहारा गावासह पंचक्रोशीतील भाविक, भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## निरंतर कष्टानेच यश साध्य : गणेश हाके-पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. ८ ऑगस्ट-**

विद्यार्थ्यांनी आपले ध्येय डोळ्यासमोर ठेवून चिकाटीने निरंतर कष्ट केल्यास आपला हेतू साध्य होतो.त्यासाठी आपल्या स्वभावात आवड, आनंद आणि कर्तव्य असणे आवश्यक आहे, त्यानंतरच यश प्राप्त होते, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष तथा भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेश हाके-पाटील यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सांगवी सु. येथे आयोजित केलेल्या इयत्ता अकरावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आणि नूतन संसद मंडळाचा सत्कार व शपथविधी सोहळ्याच्या अध्यक्षीय स्थानावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर लातूर विभागीय मंडळाचे अध्यक्ष सुधाकरराव तेलंग, प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवशटवार, उपविभागीय पोलिस अधिकारी मनिष कल्याणकर, पोलिस निरीक्षक बी. डी. भुसनुर, सरपंच राजेश कांबळे, गोविंद गिरी, प्रा. हणमंत देवकते, प्रताप पाटील, चंद्रशेखर डांगे, प्रशांत गुणाले, चेअरमन राजकुमार नरवटे, परमेश्वर पाटील, सय्यद आरिफ, मुख्याध्यापक चंद्रशेखर मोरे, मुख्याध्यापक पांडुरंग शेकडे, मुख्याध्यापक गोविंदराव धुळगंडे, बालाजी हेमनर, प्रशांत शिंदे, सेवानिवृत्त शिक्षिका केवल तिगोटे, सेवानिवृत्त शिक्षक साईनाथ डोंगरे, प्राचार्या रेखा तरडे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमात इयत्ता बारावी कला मधील प्रथम कोतवाडे स्नेहा, द्वितीय गायकवाड निकिता, तृतीय फुलमंटे तृप्ती, विज्ञान मधील प्रथम उदगिरे सुमित, द्वितीय एकनाथ यादव, तृतीय पाटील आदिती यांचा तर दहावी मधील प्रथम सुरनर ऋतुजा, द्वितीय सुरनर धनश्री तसेच इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती धारक तथा नवोदय धारक यशराज लोहकरे व इयत्ता आठवी शिष्यवृत्ती धारक शैलजा वडेर यांचा पालकांसह सत्कार करण्यात आला. यावेळी विशेष सत्कार सय्यद सादिया हिने नीट परीक्षेत ६६२ गुण घेतल्याने आणि साळवे यशवंत याने नीट परीक्षेत ५४१ गुण घेऊन यश संपादन केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते पालकांसह सत्कार करण्यात आला.तर शाळेचे माजी विद्यार्थी मोहन देवकते, प्रमोद पवार आणि शेख इमाम यांची या वर्षात पोलिस विभागात भरती झाल्याने त्यांचाही सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्या रेखा तरडे यांनी केले तर सुत्र संचालन प्रा दैवशाला शिंदे आणि जिलानी शेख यांनी केले तर आभार प्रा संतोष मुळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजकुमार बुर्ले, रमेश चेपूरे, अच्युत सुरनर, संभाजी दुर्गे, चिंतन गिरी,तुकाराम शिंगडे, प्रदीप रेड्डी, अमोल सारोळे, कौशल्या देवकते, जनार्दन मासोळे, गणेश जाधव, तेजस्विनी फाजगे, मयुर मोरे, हिदायत शेख, संजय कजेवाड, अनंत उदगिरे, विश्वंभर सुरनर आदींनी परिश्रम घेतले.

# रेशन दुकानदार चालकांच्या मुलाची हातचलाकी

**थेरगाव येथील प्रकार; अज्ञानपणाचा फायदा घेत चक्क दुकान केले कुटुंबाच्या नावावर**

**तभा वृत्तसेवा,**
**शिरुर अनंतपाळ, दि.८ ऑगस्ट-**

थेरगाव (ता. शिरुर अनंतपाळ) येथील किरण बेदी महिला बचतगटाच्या माध्यमातून रेशन दुकान चालविण्यात येत होते. महिला पदाधिकाऱ्यांना व्यवहार आणि तांत्रिक बाबी जमत नसल्याने ही जबाबदारी अध्यक्षाचा मुलगा सांभाळत होता. त्यांच्या अज्ञानपणाचा गैरफायदा घेत चक्क हातचलाकी दाखवत त्या मुलाने बचतगटातील अन्य महिला सदस्यांना काढून रेशन दुकान स्वत:च्या कुटुंबाच्या नावावर केले. त्याच्या या प्रतापाबद्दल महिला सदस्यांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

रेशन धान्य वाटप करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर झाल्याने सदरील महिलांना चलान भरणे, मशीन चालवणे लाभार्थ्यांचे आंगठे घेणे बंधनकारक करण्यात आल्यामुळे व हे काम सदरील महिलांना जमत नसल्याने अध्यक्ष महिलेचा मुलगा या कामासाठी पुढाकार घेऊन हे काम करत होता काही वर्षांनंतर किरण बेदी महिला बचत गटाच्या सचिव व सदस्य यांनी इतके वर्ष झाले हिशोब केला नाही हिशोब द्या असा तगादा लावला होता.

सदरील महिलांना बिल पडले नाही बिल पडले की तुम्हाला तुमचा हिशोब देतो, असे बोलून चालढकल केली. महिलांनी विश्वास ठेवून आलेले रेशन वितरीत करीत राहिल्या परंतु या मुलांने वेगळीच शक्कल लढवून चक्क या महिलांना बचत गटातून काढून टाकूण त्याजागी आपल्या घरच्यांची नावे समाविष्ट करण्यात आल्याचे स्वतः सदरील मुलांने सांगितले. असे या पिडीत महिला दैनिक तरुण भारतशी बोलताना म्हणाल्या.

# माझं घर प्रकल्पातील मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप

**राजा नारायणलाल लाहोटी स्कुलचा सामाजिक उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.८ ऑगस्ट-**

श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्था लातूर द्वारा संचलित राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलच्या वतीने औसा तालुक्यातील बुधोडा गावाजवळील माणूस प्रतिष्ठान संचलित माझं घर प्रकल्पातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप शनिवारी प्रकल्पात करण्यात आले.

शरद आणि संगीता झरे या जोडप्याने समाजातील वंचित, गरीब, गरजू, होतकरू मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी महात्मा गांधीजींच्या संकल्पनेतून १९३७ मध्ये साकारलेल्या 'नई तालीम' च्याधरतीवर लोकसहभागातून माझं घर प्रकल्पाची स्थापना २०१९ साली बीड जिल्ह्यातील परळी येथून केली. नंतर त्यांनी आपला प्रकल्प लातूर जिल्ह्यात स्थलांतरित केला. या प्रकल्पात सर्व वर्गातील मिळून ५५ मुले, मुली असून या सर्व मुलांना मायेचा आधार देत त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी स्वावलंबनाचे धडे देत शरद आणि संगीता झरे अहोरात्र परिश्रम घेतात.याचाच एक भाग म्हणून राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलच्या वतीने राजा नारायणलाल लाहोटी यांच्या स्मृती दिनानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटपाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला आणि या अंतर्गत शनिवारी माझं घर प्रकल्पातील मुलांना वह्या, पेन, पॅड, टी-शर्ट आणि फळांचे वाटप करण्यात आले. प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू आणि कुलसचिव प्रवीण शिवणगीकर यांच्या मार्गदर्शनाखाली विनोद चव्हाण, शैलेंद्र डावळे, सुनील मुनाळे, अमोल देशमुख, अमित होनमाळे आणि विवेक डोंगरे यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला. प्रारंभी राजा नारायणलाल लाहोटी यांच्या प्रतिमेला सर्वांनी अभिवादन केले. विनोद चव्हाण यांनी उपक्रमाबद्दल माहिती दिली.



# शिरूर अनंतपाळ येथे ६५ लाखांच्या विकासकामांचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि. ७ ऑगस्ट-**

शिरुर अनंतपाळ शहरातील प्रभाग क्रमांक १३ मधील सिमेंट काँक्रेट रोड, विंधन विहीर, सोलार मिनी हायमस्ट, पेव्हर ब्लॉंक, अंगणवाडी दुरुस्ती, वर्गखोली बांधकामचे उद्घाटन व लोर्कापण सोहळा उत्साहात पार पडला. काँग्रेसचे नेते अशोक पाटील-निलंगेकर यांच्या हस्ते व डॉ. शरद पाटील-निलंगेकर यांच्या प्रमुख उपस्थीतीत नगरसेवक सुधीर लखनगावे यांच्या प्रभागातील ६५ लाखांच्या विविध विकासकामांचे उद्घाटन व लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी डॉ. शरद पाटील-निलंगेकर, बंडाप्पा काळगे, डॉ. शोभा बेंजरगे, एल.बी.आवाळे, माजी जिल्हा परीषद अध्यक्ष संतोष देशमुख, अजित माने,अभय साळुंके, डॉ.अरविंद भातांब्रे, प्रदेश काँग्रेस सदस्य पंकज शेळके, तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, तालुकाअध्यक्ष.आबासाहेब पाटील उजेडकर, तालुकाअध्यक्ष. ॲड.



अजित बेळकोने,तालुकाप्रमुख.भागवतराव वंगे, तालुकाप्रमुख अविनाश रेशमे, उपनगराअध्यक्षा सुषमा मठपती, लाला पटेल, युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव. गजानन भोपणीकर, नगरसेवक संतोष शिवणे, सुरेंद्र धुमाळ, प्रा. दयानंद चोपणे,दिनकरनाना निटुरे, हरिभाऊ सगरे, दिलीपराव हुलसुरे, लक्ष्मणराव बोधले, अनंत पाटील टाकळीकर, ॲड. सुतेज माने, सरोजा गायकवाड, देविदास पतंगे, अनिल पाटील ,पंडीत भदरगे, प्रकाश पाटील बाकलीकर, महेश देशमुख, गोविंदराव सूर्यवंशी, ज्ञानेश्वर पिंड, धनराज चांदुरे, सरपंच रमेश मोगरगे, गोविंद श्रीमंगल, वैशंपायन जागले, संग्राम हवा, वल्लभ भंडे, प्रा. राम काकडे, जर्नाधन पाटील-सुमठाणकर, नवाज पठाण, राष्ट्रवादी युवक प्रदेश सचिव महादेव आवाळे, अमर आवाळे, बाळासाहेब पाटील, शिवराज धुमाळे, शहराध्यक्ष अशोक कोरे, सोमनाथ तोंडारे, विश्वनाथ हंद्राळे, काशिनाथ धुमाळे, तानाजीराव वलांडे, शिवसांब पारशेट्टे, नाम देवराव जगताप, भरत शिंदे, उमेश मोहिते, प्रसाद झरकर, संदीप धुमाळे, संभाजी सावंत उपस्थीत होते

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बालाजी यरमलवार, अशोक दुरुगकर, पंडीत शिंदाळकर, माधवराव खरोळे, बालाजीराव मंठाळे, काशिनाथराव वलांडे, उमाकांत शिंदाळकर, शिवराज स्वामी, औदुंबर शिंदाळकर, बालाजी सवणे, प्रदीप दुरुगकर, ग्यानोबा बोराळे, मोहदीन तांबोळी, शुभम आयतनबोणे, प्रकाश दुरुगकर यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक नगरसेवक सुधीर लखनगावे, सूत्रसंचलन सतिशराव हानेगावे, आभार प्रदर्शन बस्वराज मठपती यांनी मानले.



## डॉ. शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त २२ जणांचे रक्तदान

**निलंगा, दि. ८ ऑगस्ट-**

महाराष्ट्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना विभाग व माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा महाराष्ट्र शिक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष माननीय विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपुके, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राध्यापक प्रशांत गायकवाड व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व उपस्थित होते.

रक्तदान शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेच्या एकुण २२ रक्तदात्यांनी रक्तदान करुन सामाजिक कार्यात मोलाचे योगदान दिले. रक्तदान शिबिरासाठी भालचंद्र ब्लड बँक लातूर येथील जनसंपर्क अधिकारी श्री दिगंबर पवार व त्यांची टीम उपस्थित होती. रक्तदान शिबिराच्या आयोजनासाठी एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. सुभाष बेंजलवार, डॉ. विठ्ठल सांडूर, एन.सी.सी. केअर टेकर ऑफिसर डॉ. सचिन बसुदे, मनोहर एखंडे, सिध्देश्वर कुंभार, यांच्यासमवेत अजय शिंदे, महेश कोळनुरे, विष्णू मळे, राणी सुर्यवंशी, गिता वाडकर, कमल गोमसाळे, ढगे मनोज, माने रोहीत, अभिलाष दिक्षित, हजारे हनुमान आदींनी परीश्रम घेतले.


दै. सोलापूर
तरुण भारतच्या
४० व्या
वर्धापनदिनास
हार्दिक शुभेच्छा
शु भे च्छु क
मा. नरेंद्र पवार
जिल्हा क्रीडा अधिकारी
व सर्व स्टाफ जिल्हा क्रीडा कार्यालय, सोलापूर


दै. सोलापूर तरुण भारतच्या ४० व्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा!
विजेचा वापर
स्वैर नको..
सौर हवा !
पंचगंगा
सौर उर्जा
कर्ज
योजना
व्याजदर
9.99%*
पासून
कर्ज मर्यादा :
रुपये ३ लाख पर्यंत
*नियम व अटी लागू
घरगुती किंवा ऑफिसमध्ये
सौर उर्जा प्रकल्प सुरु करणेसाठी
लागणारी उपकरणे खरेदीकरिता,
आम्ही सादर करीत आहोत..
पंचगंगा सौर उर्जा कर्ज योजना !
अवघे धरू सुपंथ
पंचगंगा बँक
श्री पंचगंगा नागरी सहकारी बँक लि., कोल्हापूर
आमच्या नजिकच्या शाखेत संपर्क करा किंवा कॉल करा... फोन : ०२३१-२६९३५१७, २६९१३२९


सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
प्रा.काकासाहेब कुलकर्णी
प्रवक्ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी


सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
मा.संतोष पवार
मा.बिज्जू प्रधाने
मा.जुबेर बागवान
मा.विकास हिरेमठ
संस्थापक अध्यक्ष : स्वरा-संकल्प फाऊंडेशन
कार्याध्यक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शहर मध्य विधानसभा


तरुण भारत
सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!
चेअरमन विठ्ठलगंगा मगर्मर्स प्रोड्यूसर
कंपनी निमगाव (टें) ता.माढा
मा.धनराजदादा
रमेश (मालक) शिंदे
सौजन्य
अंकुशा स्टोअर * विठ्ठलगंगा फार्मर्स
प्रोड्यूसर कंपनी निमगांव (टें)

# दैनिक ‘तरुण भारत’च्या ४० व्या वर्धापनदिनानिमित्त तरुण भारत व प्रिसिजन प्रिंट्समधील स्टाफच्या शुभेच्छा !



दैनिक सोलापूर तरुण भारत स्थापना सन १९८५ सालची प्रखर राष्ट्रीय विचाराचे दैनिक म्हणून हे वृत्तपत्र सर्वश्रुत आहे. मी कॉलेजमध्ये असताना वाचनालयात नेहमीच तरुण भारत वाचत होतो .अत्यंत वाचनीय व विश्वसनीय वृत्तपत्र असल्याने वाचकाच्या मनात आहे. दैनिक तरुण भारत मध्ये मी २०१३ साली अकाउंट विभागात लेखापाल म्हणून रुजू झालो. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात सर्व सहकारी आपापले काम जबाबदारीने करतात. सध्या माझ्याकडे व्यवस्थापक म्हणून जबाबदारी आहे. आमच्यासमोर संकटे अनेक आहेत, परंतु सर्वांना सोबत घेऊन आम्ही यावर नक्कीच मात करू. तरुण भारतचे सर्वेसर्वा आदरणीय दिलीप पेठे साहेब यांचे आम्हा सर्वांनाच सतत मार्गदर्शन असते.. दैनिक तरुण भारत आज चाळीसावा वर्धापन दिन साजरा करीत आहे, यामागे आजी, माजी संपादक, जाहिरात विभाग, वितरण विभाग, प्रिंटिंग विभाग, पार्सल विभाग मध्ये काम करणारे सर्व सहकारी यांचेही योगदान आहे. आज दैनिक तरुण भारत ४०वा वर्धापन दिन साजरा करतोय. मुख्य समूह संपादक, निवासी संपादक,सर्व विभागातील सहकारी वृंद, एजंट ,जाहिरातदार, वाचक वर्ग यांनाही खूप खूप शुभेच्छा.

**- विनायक पुला, व्यवस्थापक**



मी रंजना संजय घोडके. गेली तीन वर्षापासून दैनिक सोलापूर तरुण भारत मध्ये अकाउंट विभागात कार्यरत आहे . तरुण भारत मध्ये काम करताना खूप आनंद होतो. सर्व वरिष्ठ अधिकारी कामांमध्ये सहकार्य करतात. दैनंदिन कामात वेळ कसा निघून गेला हे कळतच नाही. तरुण भारत वृत्तपत्र हे प्रखर राष्ट्रीय विचाराचे दैनिक आहे, हे वर्तपत्र वाचून समाजात घडणाऱ्या चांगल्या वाईट गोष्टींचाउहापोह होतो. दैनिक तरुण भारत चाळीसावा वर्धापन दिन साजरा करीत आहे, सर्वांना वर्धापन दिनाच्या मनः पूर्वक हार्दिक शुभेच्छा.

**-रंजना संजय घोडके, लेखापाल**



सोलापूर तरुण भारत पार्सल विभागात मी पूर्वीपासून काम पाहतो. दररोज वेळेत प्रिंटिंग होते, प्रिंटिंग झालेला अंक मोजून ज्या त्या अंक विक्री एजन्सीचे गट्टे बांधून ते टॅक्सी मध्ये व बसमध्ये त्या त्या अंक विक्री येजन्ट कडे पोहोचण्याचे काम मी पाहतो. रात्रीचे वेळी काम करताना वेळेत काम होणे व वेळेत अंक पोहोचवणे यावर आमचे खूप लक्ष असते .रात्री काम करत असताना संपादक विभाग, सि. टी. पी.विभाग व प्रिंटिंग विभाग यांच्याशी समन्वय साधून वेळेत अंक पोहच करण्याची जबाबदारी माझ्याकडे आहे. माननीय दिलीप पेठे साहेब यांचे वेळोवेळी मार्गदर्शन असतेच ,त्याचबरोबर माझे इतर सर्व सहकारी सहकार्य करतातच. खूप आनंद होत आहे की तरुण भारत ४० वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करीत आहे. माझ्याकडून सर्वांना वर्धापन दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

**-जयराम गड्डम, पार्सल विभाग प्रमुख**



मी सचिन कांबळे, दैनिक सोलापूर तरुण भारत मध्ये २००६ सालापासून सी टी पी प्लेट विभागात कार्यरत आहे. सुरवातीस त्यावेळी मी हेल्पर म्हणून कामाची सुरुवात केली, पण जसे कामाची माहिती होत गेली तसतसे मला कामांमध्ये आवड निर्माण झाली. आज मी सीटीपी विभागाचे संपूर्ण जबाबदारी व्यवस्थितरीत्या पार पाडत आहे. यासाठी तरुण भारत मधील सर्व अधिकारी वर्ग सहकारी वर्ग यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभत असते. सोलापूर तरुण भारतची अशीच प्रगती होत जावो, ही मनापासून शुभेच्छा. सर्वांना दैनिक तरुण भारत च्या ४० व्या वर्धापन दिनाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा.

**-सचिन कांबळे, सी.टी.पी विभागप्रमुख**



**शब्दांकन : राजाराम मस्के**

मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख



दैनिक सोलापूर तरुण भारतच्या तपपुरती वर्षांमध्ये १९९५ साली मी रुजू झालो. आज तरुण भारत ४० वा वर्धापन दिन साजरा करीत आहे याचा अभिमान आहे.गेली २८ वर्षे तरुण भारत मध्ये काम करत असताना अनेक मान्यवरांची सदिच्छा भेट घेण्याचा योग आला, सर्वात महत्वाचे म्हणजे तपपूर्ती विशेशांक प्रकाशनावेळी सर्वात लहान बाईंडर म्हणून स्वर्गीय प्रमोद महाजन साहेबांनी मला जवळ घेऊन माझी आपुलकीने विचारपूस ही केली होते. तो क्षण आजही माझ्यासाठी अत्यंत विस्मरणीय आहे. आदरणीय दिलीप पेठे साहेब व आस्थापन विभाग, सर्व विभाग प्रमुख यांचीही सुसंवाद साधून वेळेत व न नेटकेपणाने काम पूर्ण करण्याचा माझा व माझ्या सहकारी टीमचा प्रयत्न असतो. दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनाच्या सर्वांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा.

**-जयभीम इंगळे, बायडिंग विभागप्रमुख**



वृत्तपत्र क्षेत्रात सोलापूर तरुण भारत ने स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करून छपाईचे अध्यायावत तंत्रज्ञान वापरून उत्कृष्ट व आकर्षक दर्जे दार पुरवण्यासह नियमित वाचकांना हवे ते सदर देऊन गेल्या ४० वर्षात प्रगतीचा आलेख उंचावत सातत्य ठेवणाऱ्या सोलापूर तरुण भारत ला मानाचा मुजरा. त्रिवार वंदन . स्टॉलवरील वृत्तपत्र संपल्यानंतर ग्राहक सोलापूर तरुण भारतच्या कांहीं वाचक प्रतीक्षेत असतात. कार्यालयातून विना विलंब तत्पर अंक पोहोच करण्यात परिवारचा हातखंड आहे, सोलापूर तरुण भारत च्या चाळीसावा वर्धापन दिनास आभाळभर शुभेच्छा!

**-सटवाजी पुंडलिक गायकवाड, वृत्तपत्र विक्रेता, आसरा**



सोलापुरात अनेक वृत्तपत्रे आहेत. वृत्तपत्र क्षेत्रात सोलापूर तरुण भारत ने गेल्या ४० वर्षात आपल्या लेखणीतून परखड विचार म ांडण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक वाचकांची मने जिंकले आहेत वाचक तरुण भारत अंकाची आतुरतेने वाट पाहतात रविवारी प्रसिद्ध होणारी ‘‘आसमंत पुरवणी‘‘ त्याचबरोबर बुधवारची ‘‘सदाफुली‘‘ पुरवणीस विशेष मागणी असते.त्या दिवशी तर वाचकांना अंक कमी पडतो. सोलापूर तरुण भारतच्या चाळीसाव्या वर्धापन दिनास माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा.

**- महेश साबळे, विक्रेता दत्त चौक**



मी गोरख वाघमारे हत्तुरे वस्ती येथील रहिवाशी असून दैनिक तरुण भारत मध्ये २००५ सालापासून कार्यरत आहे. सोलापूर तरुण भारत ४० वा वर्धापन दिन साजरा करीत आहे याच्या मला खूप आनंद व अभिमान आहे की मी या दैनिकात काम करतोय .मी प्रिंटिंग विभागात मशीन ऑपरेटर म्हणून कार्यरत आहे. सिंगल कलर, डबल कलर मशीन ऑपरेट करतो. १८ वर्षे काम करताना सर्व अधिकारी वर्ग व सहकारी कर्मचाऱ्याकडून खूप सहकार्य मिळते. तरुण भारत आपला शंभरावा वर्धापन दिन साजरा करावा ही मनापासून शुभेच्छा.

**-गोरख कृष्णात वाघमारे. मशीन ऑपरेटर**



मी वामन नरसप्पा बावडेकर, राहणार लष्कर. तरुण भारत प्रिसिजन प्रिंटमध्ये बँडिंग विभागात काम करतो आहे .पुस्तक जुळणी करणे ,बुक नंबरिंग करणे ,कटिंग मशीन वर काम करणे व इतर सर्व कामे मी करतो,मी पूर्वी कंपोझिंग करीत होतो .माझे सहकारी शरणप्पा शाबादे रिटायर झाल्याने त्यांच्या जागी आता तरुण भारत मध्ये सेवक म्हणून काम पाहत आहे. तरुण भारत चाळीसावा वर्धापन दिन साजरा करतोय खूप आनंद आहे सर्वांना मनापासून हार्दिक शुभेच्छा.

**- वामन नरसप्पा बावडेकर, सेवक**



दैनिक सोलापूर तरुण भारत मध्ये मी २००८ सालापासून सेवेस आहे. २००८ ते २०२० या काळात मी सोलापूर तरुण भारत मध्ये जिल्ह्यातील तसेच धाराशिव जिल्ह्यातील आमचे सर्व प्रतिनिधी यांच्या जाहिरातीची वसुली, त्याचबरोबर दोन्ही जिल्ह्यातील अंक विक्री वसुली करणे याची जबाबदारी मी पार पाडीत होतो. माननीय दिलीप पेठे साहेब यांनी २०२१ सालापासून माझ्यावर वितरण विभागाची जबाबदारी दिलेली आहे. माननीय संपादक साहेब , संपादकीय विभाग ,सीटीपी विभाग, प्रिंटिंग विभाग, पार्सल विभाग, जाहिरात विभाग यांच्याशी दैनंदिन समन्वय साधून अंक वेळेत पोहोच करण्याची व त्याची वेळेत वसुली करण्यासाठी माझा प्रयत्न असतो. दैनिक तरुण भारत अव्यय चाळीसावा वर्धापन दिन साजरा होतोय सर्वांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा.

**-नागसेन रवींद्र शिवशरण, वितरण विभाग प्रमुख.**



मी सरिता सिद्धाराम सालीमठ, मी विमानतळ परिसरात वास्तव्यास आहे. मी २०११ सालापासून प्रिसिजन प्रिंट्स विभागात काम करीत आहे. तरुण भारत मध्ये महिला पुरुष बंधू भावाने, अत्यंत आनंदाने खेळीमेळीच्या वातावरणात काम करतात. त्यामुळे तरुण भारत हे माझे साठी माहेरघरच आहे. एक दिवस हे कार्यालयात आले नाही तर चुकल्यासारखे वाटते. तरुण भारत मध्ये काम करताना आम्हास आत्मिक समाधान ही मिळते. तरुण भारत मध्ये आम्ही दहा महिला कर्मचारी आहोत, सर्वजण एकोपाने आत्मीतेने काम करतो. तरुण भारतच्या चाळीसाव्या वर्धापन दिनास माझ्याकडून खूप खूप शुभेच्छा.

**-सरिता सिद्धाराम सालीमठ, सेवक**



मी धानेश्वरी विजयराव वाणी, दैनिक सोलापूर तरुण भारत प्रिसिजन प्रिंट्स विभागात २०१३ पासून सेवेस आहे . प्रिंटिंग विभागात जुळणी करणे, रजिस्टर शिलाई करणे, त्याचबरोबर परफेक्ट म शीन वर मी काम केले आहे. फोल्डिंग विभागात काम केले, नंबरिंग करणे, त्याचबरोबर इतर पडेल ते काम करणे यासाठी आम्ही सर्वजण तत्पर असतो. येथील सर्व पुरुष,महिला कर्मचारी अत्यंत आनंदाने कोणताही वाद न करता काम करतात. सर्व अधिकारी व सहकारी वर्ग मनमिळावू आहेत ,त्यामुळे आम्हाला या परिवारात काम करण्याचा खूप आनंद आहे, त्यामुळे आम्ही कधीही या दैनिकात काम सोडून जाणेचा मनात विचार आला नाही. सर्वांना तरुण भारत वर्धापन दिनाच्या खूप खूप शुभेच्छा.

**-दानेश्वरी विजयराव वाणी- महिला कर्मचारी**







मी गीता राजेश स्वामी, दैनिक तरुण भारत २०१४ साली आले. मी लॅमिनेशन मशीनवर काम करते, प्रिंटिंग विभागातील सर्व कामे करण्यात माझा हातखंडा आहे .जुळणी करणे, फोल्डिंग करणे, परफ ेक्ट मशीन वर काम करणे इत्यादी अनेक कामे मी करते.सर्व प्रिंटिंग,बायडिंग विभाग कामांची माहिती असल्याने,जिथे कमी त्या विभागात तिथ तत्पर असते. आमचे येथील सर्व अधिकारी वर्ग व सर्व महिला कर्मचारी वर्ग अत्यंत आत्मीतेने व आनंदाने इथे काम करतात येथे मला सर्वांकडून सन्मानाची वागणूक मिळते मी इथे काम करून खूप आनंदात आहे दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिन साजरा करतोय सर्वांना वर्धापन दिनाच्या मनः पूर्वक शुभेच्छा.

**-गीता राजेश स्वामी, महिला कर्मचारी.**



मी सिद्धाराम राजशेखर चिट्टे.दैनिक तरुण भारत ,प्रिसिजन प्रिंट्स या विभागात २०१२ मध्ये मशीन मदतनीस म्हणून रुजू झालो. त्यानंतर प्रिंटिंग विभागातील सर्व कामे करण्याचा अनुभव घेतला, कालांतराने माननीय दिलीप पेठे साहेब यांनी या विभागात क्लर्कची जबाबदारी दिली. जॉब विभागातील जॉब घेणे, जॉब डिलिव्हरी करणे, जॉबची वसुली, किंवा प्रिसिजन विभागातील कामगार वर्ग आणि व्यवस्थापन विभाग यांच्यामध्ये समन्वय साधून दर्जेदार कामे करून वेळेत जॉब पोहोच करणे याची सर्व कामे करून घेण्याची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर आहे. सध्या मी प्रिसिजन विभागात प्रोडक्शन व्यवस्थापक म्हणून काम पाहतोय. गेली बारा वर्षे काम करताना हे दशक कसे निघून गेलं हे कळलेच नाही. तरुण भारत सर्व अधिकारी वर्ग यांनी सतत मला मार्गदर्शन केले. दैनिक सोलापूर तरुण भारत चाळीसावा वर्धापन दिन साजरा करतोय याचा मनस्वी खूप आनंद आहे दैनिक तरुण भारत वर्धापन दिनास मनःपूर्वक शुभेच्छा.

**-सिद्धाराम राजशेखर चिट्टे, प्रीसिजन प्रिंट्स, प्रोडक्शन व्यवस्थापक**



मी मनीषा मनोज विभुते, विमानतळ परिसरात वात्सव्यात असून मला २०२१ मध्ये या संस्थेत काम करण्याची सुवर्णसंधी मिळाली. मी प्रीसिजन प्रिंट्स विभागात डी टी पी ची सर्व कामे करते ,डिझाईन करणे, म जकूर ऑपरेट करणे, फोटो डाउनलोड करणे, प्रिंटिंग जॉब लावणे, लावलेला जॉब सीटीपी विभागास मेल करणे, टायपिंग करणे इत्यादी डीटीपी विभागातील सर्वच कामे करते. येथील वरिष्ठ अधिकारी वर्ग व सहकारी वर्ग अत्यंत आत्मीयतेने ,आपुलकीने कामामध्ये सहकार्य करतात तरुण भारत मध्ये काम करताना मला कुटुंबातच काम करीत असल्याचा भास होतो. तरुण भारत येणाऱ्या काळात शंभरावा वर्धापन दिन साजरा करावा ही मनापासून अपेक्षा.

सर्वांना वर्धापन दिनाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा.

**-मनीषा मनोज विभुते, डीटीपी ऑपरेटर, प्रिसिजन प्रिंट्स.**

# सर्वांगीण शिक्षण सक्षमीकरणाची संधी : मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा - २

**शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अनोखे स्पर्धात्मक अभियान राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांसाठी मोठ्या उत्साहाने पार पडले. दि. १ जानेवारी २०२४ ते १५ फेब्रुवारी २०२४ राबविण्यात आलेल्या या अभियानाला महाराष्ट्रभरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. या महत्त्वाकांक्षी अभियानामध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांच्या सोबतच माजी विद्यार्थी, पालक, शिक्षण प्रेमी नागरिक तसेच माध्यमांनीही भरभरून प्रतिसाद दिला.**






**सचिन जगताप**

मो. ९३५६२०२५७०

राज्यभरातील जवळपास ९५% शाळांमधील सुमारे दोन कोटी विद्यार्थी या अभियानांतर्गत विविध उपक्रमांम ध्ये सहभागी झाले होते. अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने यामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या घटकांची उपयुक्तता अभियानाच्या दरम्यान सिद्ध झाली. सर्वसम ावेशक कार्यपद्धती असल्यामुळे मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभियान मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाले. या उपक्रमाची यशस्वीता अत्युच्च शिखरावर पोहोचली आणि यामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या काही उपक्रमांची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये सुद्धा घेण्यात आली आहे.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व शिक्षण मंत्री महोदय यांच्या प्रेरणेतून राज्यभरातील शालेय शिक्षण विभाग या अभियानाच्या यशस्वीतेसाठी झटला आणि शहरी, ग्रामीण तसेच दुरस्थ प्रदेशांमध्ये असलेल्या वाड्या-वस्त्यांवरील शाळा उजळून निघाल्या. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात तालुका, जिल्हा व विभाग अशी स्पर्धांची पातळी ठरविण्यात आलेली होती. आपापल्या विभागातून यशस्वी ठरलेल्या शाळांना राज्यस्तरावर संधी मिळाली आणि राज्यस्तरावरील अजिंक्य शाळा या रोख पारितोषिक आणि सन्मानास पात्र ठरल्या. या स्पर्धेतून मिळणाऱ्या रकमेचा विनीयोग संबंधित शाळांनी त्यांच्या गरजेनुसार करण्याची मुभा शाळा व्यवस्थापनाला देण्यात आल्याम ुळे अतिशय तळमळीने सर्व घटक यामध्ये समाविष्ट झाले. अभियानामध्ये सहभागी झालेल्या या शाळांना तातडीच्या गरजा भागविण्याकरिता या माध्यमातून निधी उपलब्ध झाला. हे सगळं खरं असलं तरी भौतिक सोयी सुविधा आणि भौतिक फायद्यापेक्षा शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता संवर्धनाचा महत्वपूर्ण उद्देश या अभियानामध्ये ठेवण्यात आलेला आहे. या महत्त्वाकांक्षी अभियानामुळे विद्यार्थी व शिक्षकांमध्ये एक प्रकारचे नवचैतन्य निर्माण होऊन अनेक सकारात्मक बदल निदर्शनास आले. ही बाब अधिक महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांना २१व्या शतकातील कौशल्ये प्राप्त करण्यासाठी सक्षम बनविण्यास असे प्रयत्न निश्चितच महत्त्वपूर्ण ठरतात. या अभियानाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आलेली संधी ही मर्यादित राहू नये या हेतूने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या लोकप्रिय अभियानाचा दुसरा टप्पा अतिशय आनंददायी वातावरणात संपूर्ण राज्यभर सुरू झालेला आहे.

५ ऑगस्ट २०२४ रोजी संपूर्ण राज्यभर या अभियानाचा प्रारंभ झाला असून, ४ सप्टेंबर २०२४ रोजी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक २ या अभियानाचा कालावधी पूर्ण होईल. ५ सप्टेंबर २०२४ ते १५ सप्टेंबर २०२४ या कालावधीत सर्व स्तरांवरील मूल्यांकनाची प्रक्रिया पार पडेल आणि त्यानंतर यथावकाश राज्यस्तरीय पारितोषिक समारंभ संपन्न होईल. पायाभूत सुविधा, शासन ध्येय धोरणांची अंमलबजावणी, शैक्षणिक संपादणूक अशा महत्त्वपूर्ण घटकांवर निकषनिहाय गुणांचे विभाजन करण्यात आलेले असून, शाळेच्या सर्वांगीण संवर्धनासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व मुद्द्यांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. या अभियानामध्ये सहभागी शाळांचे त्यांनी अभियानाच्या कालावधीत केलेल्या कामगिरीच्या आधारे मूल्यांकन केले जाणार आहे. त्यामुळे पुन्हा या स्पर्धेच्या माध्यमातून शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसोबत उर्वरित इतर सर्व व्यवस्थापनांच्या शाळांना रोख बक्षीसांसोबत अलौकीक असा सन्मान प्राप्त करून देण्याची संधी या माध्यमातून राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेली आहे. या महत्त्वाकांक्षी अभियानामध्ये सर्व शाळांचा अतिशय आनंददायी पद्धतीने सहभाग मिळवण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांनी प्रयत्न करावे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि गुणवत्ता संवर्धन करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक २ च्या माध्यमातून राज्यातील सर्व शाळांना ही संधी उपलब्ध करून दिलेली आहे. या अभियानामध्ये अत्यंत सकारात्मक वृत्तीने आणि आनंददायी पद्धतीने सहभागी होऊन आपण विद्यार्थ्यांच्या हितासाठी सातत्याने कार्यरत राहू या !

सोलापुरात विविध जात, धर्म, पंथ व भाषा बोलणारे लोक अनेक वर्षापासून गुण्यागोविंदाने राहतात. असाच एक समाज म्हणजे तेलुगू भाषा बोलणारा पद्मशाली समाज होय. मूळचा आंध्रप्रदेशातील असलेला हा समाज उदरनिर्वाहाच्या शोधात इंग्रजांच्या आमदानीत सोलापुरात आला. त्यांच्या अंगी असणाऱ्या जिद्द, चिकाटी व कष्ट करण्याची तयारी या बळावर आज प्रत्येक क्षेत्रात पद्मशाली समाज अग्रेसर आहे. सोलापूरच्या जडणघडणीत पद्मशाली समाजाचा मोठा वाटा आहे. श्री मार्कंडेय ऋषी हे पद्मशाली समाजाचे आराध्य दैवत होय.

## मार्कंडेय मंदिर शतब्दी महोत्सव विशेष

# मार्कंडेय मंदिराचा इतिहास

**प्रमोद हंचाटे**
**मो.८१४९१८२१३५**







**पद्मशाली समाजाचे आराध्य दैवत - श्री मार्कंडेय ऋषी**

भृगुमहर्षी हे पद्मशाली वंशाचे मूळ पुरुष होय. मनुस्मृतीमध्ये भृगुमहर्षी यांचा तपोसंपन्न, नवब्रह्मातले श्रेष्ठी व ब्रह्मदेवाचे मानसपुत्र म्हणून उल्लेख आढळतो. दक्ष प्रजापतींची कन्या ख्याती देवीशी भृगुऋषींचा विवाह झाला. त्यांना लक्ष्मी, धाता व विधाता अशी संतती झाली. पुत्रांचा विवाह मेरुमहर्षीच्या कन्या आयती व नियतीशी तर लक्ष्मीचा विवाह श्री विष्णूशी झाला. धाता व आयती यांना प्राण आणि विधाता व नियती यांना मृकंड नावाचे पुत्र प्राप्त झाले. मृकंडमुनिचा विवाह मुदल महाऋषींची कन्या मरुध्वतीशी झाला. बऱ्याच काळापर्यंत यांना पुत्रप्राप्ती झाले नसल्याकारणाने त्यांनी कठोर तपश्चर्या केली. त्यांच्या कठोर तपश्चर्याने भगवान महादेव प्रसन्न होऊन पुत्र वरदान दिले. पुढे शिवकृपेने मरुध्वतीस मार्कंडेय नामक पुत्र प्राप्त झाले.

मार्कंडेय हे भगवान महादेवाचे परमभक्त होते. मार्कंडेयांचा जन्म दुदुंभी नाव सवत्सर उत्तरायण शिशिर ऋतू माघ मास शुक्लपक्ष तृतीया तिथी प्रांतकाली शततारका नक्षत्र या मुहूर्तावर झाला. मार्कंडेय यांचे विधिपूर्वक संस्कार करून त्यांना वैदिक धर्माची दीक्षा देण्यात आली. मार्कंडेयांच्या कठोर तपश्चर्यामुळे मृत्यूला परत पाठवून चिरंजीव म्हणून वर प्राप्त करून घेतले. पुढे त्यांनी 'देवी सप्तशती' व 'मार्कंडेय पुराण' इत्यादी ग्रंथांची रचना केली. मार्कंडेय ऋषी हे पद्मशाली समाजाचे आराध्य दैवत मानले जातात.

**सोलापुरातील पद्मशाली समाजाचा इतिहास**

पद्मशाली समाज हा मूळचा आंध्र प्रदेशातील हैदराबाद येथील राहणारे. इ.स. १७५९ ते १९०० या काळात दुष्काळामुळे उदरनिर्वाह करिता लोक दुसऱ्या प्रांतात जाऊन राहू लागले. त्या काळात महाराष्ट्र, कर्नाटक, निजाम स्टेट व म्हैसूर इत्यादी प्रांतात त्यांनी स्थलांतर केले. इ.स. १८४०च्या सुमारास पद्मशाली लोक उदरनिर्वाह करिता सोलापुरात येऊ लागले. जिल्हा कलेक्टरनी समाजाच्या वसाहतीसाठी म्हणून विजापूर वेस ते जोडबसवण्णा चौकापर्यंत घरे बांधण्यास परवानगी दिली. हातमाग हा त्यांचा मूळ व्यवसाय होता. हातमागावर कापड निर्मिती होत असे. उदरनिर्वाहाची सोय झाल्याने निजाम राजवटमधून सोलापुरात येणाऱ्यांची संख्याही वाढली. हातमाग हा मूळ व्यवसाय असल्याने साड्या व खादी कापड विणण्याचे काम ते करत होते. इ. स. १९८०च्या दरम्यान औद्योगिक कारणामुळे हातमाग बंद पडत गेले. हातमाग बंद पडल्याने अनेक जण इतर अनेक व्यवसायात गुंतले. समाजातील बहुतांश महिला बिडी वळण्याचे काम करतात.१९व्या शतकात स्वबळावर समाजाने विविध क्षेत्रात प्रगती केली आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये त्यांनी स्वतःचे अस्तित्व सिद्ध केलेले आहे. शहराच्या प्रथम नागरिक समजल्या जाणाऱ्या महापौरपदी विराजमान होणाऱ्या श्रीकांचना यन्नम ह्या पद्मशाली समाजाच्याच आहेत. सध्या सुरेश फलमारी हे पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष असून श्री श्रीनिवास क्यातम हे पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व दशरथ गोप हे सचिव आहेत. आंध्र प्रदेशातून आलेला तेलुगू भाषा बोलणारा हा समाज आपल्या सोलापुरात येऊन येथील मराठी संस्कृतीशी एकजीव झाला आहे. तरीही त्यांनी स्वतःचे अस्तित्व व वेगळेपण जपले आहे.

**सोलापुरातील मार्कंडेय मंदिराची स्थापना**

येथील सिद्धेश्वर पेठेत असलेले श्री मार्कंडेय मंदिर हे पद्मशाली समाजाचे श्रद्धास्थान आहे. मंदिरात श्री मार्कंडेय यांच्या मूर्तीच्या बाजूस पिता मृकंड ऋषी व तळघरात चिरंजीव भावनाऋषी व स्नुषा भद्रावती यांच्या मूर्ती आहेत. इ. स. १८७९ पर्यंत पद्मशाली समाजाच्या २२ फंडी निर्माण झाल्या. सर्वजण एकत्र येऊन सन १८८१ साली सिद्धेश्वर पेठेत सर्वे नंबर ६०५३ ही ८० बाय ७० फुटाची जागा ६२१ रुपयात विकत घेतली. समाजातील नरसप्पा फलमारी, हणमंतय्या सोमा, मुसलप्पा जटला, तिम्मप्पा महांकाळ, पांडोबा केदारी, सिताराम इराबत्ती, तुकाराम गाजूल, विठोबा शहापूर, कृष्णप्पा त्यारला, आशण्णा इराबत्ती व सायण्णा इराबत्ती अशा पुढाऱ्यांच्या नावे ही जागा खरेदी करण्यात आली.

इ. स. १८९४ साली देवालयाच्या बांधकामाची सुरुवात झाली. मंदिराचा पाया खणण्याचे काम सुरू असताना एक मोठी विहीर आढळली. विहीर बुजवून बांधकाम करणे खर्चिक असल्याने तळघर बांधून तेथे श्री भावनाऋषी व भद्रावती मातेची मूर्ती बसवण्यात आली. परंतु आर्थिक अडचणीमुळे बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही. सन १८९४ ते सन १९१७ या वर्षात तळघरासह मंदिराचे बांधकाम फक्त २१ फूट उंचीपर्यंतच झाले. पुढे सन १९१८ मध्ये पद्मशाली देवस्थान संस्थेची स्थापना करण्यात आली. तुकाराम कन्ना यांची सचिव म्हणून व बाळकृष्ण तुम्मा यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली आणि बंद पडलेले मंदिराचे बांधकाम पुन्हा हाती घेण्यात आले. सन १९२४ मध्ये मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले.

**मार्कंडेय मूर्तीची स्थापना**

१ जून १९२४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत श्री मार्कंडेय ऋषींची काळ्या पाषाणाच्या मूर्तीची स्थापना करण्यात यावी असे बहुमताने ठरले. सोलापुरातील ब्राह्मणांनी श्री मार्कंडेय यांच्या मूर्ती प्रतिष्ठापनासाठी ७ ऑगस्ट १९२४ रोजी शके १८४६ मिती श्रावण शुद्ध ७ या दिवशी करण्यास ठरविले. श्री मार्कंडेय मंदिरासमोर भव्य मंडप उभारून विविध कार्यक्रम साजरा करण्यात आले. गुरुवार दिनांक ७ ऑगस्ट १९२४ रोजी सकाळी १० वाजून १५ मिनिटांनी श्री मार्कंडेय मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली व १०.३० ते ११ वाजून १५ मिनिटापर्यंत तळघरात श्री भावनाऋषी व माता भद्रावती यांच्या मूर्तीची स्थापना केली.

**मार्कंडेय मंदिराची रचना**

सोलापूर मधील सिद्धेश्वर पेठेत असलेल्या सिद्धेश्वर मंदिराच्या पूर्वेस श्री मार्कंडेय मंदिर आहे. मंदिराच्या मध्यभागी मार्कंडेयांचे गर्भगृह आहे. गर्भगृह हे उंच चौथऱ्यावर बांधलेले आहे. प्रवेशद्वार हा सागवानी लाकडाचा असून त्यावर सुंदर कोरीव नक्षीकाम केलेले आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला व्याघ्रमुख कोरलेले आहे व उंबऱ्यावर व्याल कोरलेले दिसून येते. गाभाऱ्यात श्री मार्कंडेय ऋषींची मूर्ती व अंतराळात नंदी हे काळ्या पाषाणातील आहेत. श्री मार्कंडेय यांचे गर्भगृहात कृष्णशिलेत सुबक मूर्ती भक्त स्वरूपात असून दोन्ही हात जोडून शिवलिंगावर नतमस्तक होऊन भक्ती करीत आहेत.

गर्भगृहाच्या खाली तळघरात श्री भावनाऋषी व भद्रावती माता यांच्या काळ्या पाषाणातील मूर्ती आहेत. गर्भगृहाचे शिखर आतील बाजूने निमुळते होत जाते. गर्भगृहाच्या द्वाराच्या उजव्या आणि डाव्या बाजूस संगमरवरी चतुर्भुज द्वारपाल आहेत. गर्भगृहातील सर्व भिंतीवर संगमरवरी फरशी बसविलेले आहे. त्यामुळे मूळ दगडी भिंतीवरील नक्षीकाम दिसत नाही. महाद्वार हे दगडी असून दरवाजे लाकडी आहेत. त्याच्यावर पितळी ठोकळ्यासारखे खिळे असून कोरीव काम केलेले आहे. श्री मार्कंडेय मंदिर हे पद्मशाली समाजाचे श्रद्धास्थान असून सोलापुरच्या धार्मिक इतिहासात या मंदिराचे मोलाचे योगदान लाभलेले आहे.

**मार्कंडेय रथ मिरवणूक**

शके १८४६ मिती श्रावण शुद्ध ७ गुरुवार तारीख ७ ऑगस्ट १९२४ रोजी श्री मार्कंडेय ऋषींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. हा उत्सव पद्मशाली लोक नुलूपुन्नम म्हणून साजरा करतात. गेल्या अनेक वर्षापासून श्री मार्कंडेय रथ मिरवणुकीची प्रथा चालू आहे. पूर्वी श्री मार्कंडेय पादुकांची मिरवणूक चाटी गल्ली मल्लिकार्जुन देवालय या मार्गाने जात होती. त्यात बदल करून सन १९५०च्या नारळी पौर्णिमेस निघालेली मिरवणूक शनिवार पेठ, रविवार पेठ, साखर पेठ इत्यादी मार्गाने नेण्यात आली. दरवर्षी नारळी पौर्णिमेच्या दिवशी पहाटे ३ वाजल्यापासूनच मार्कंडेयास पानपूजा व नंदी पूजा होऊन उत्सवास प्रारंभ होतो. मार्कंडेय ऋषींच्या दर्शनानंतर समाज बांधव पुरोहिताकडून सुताची राखी व जानवे धारण करतात. मंदिराचे पुरोहित राघवेंद्र आरकाल यांनी दिलेल्या माहितीनुसार या दिवशी सुमारे दोन लाख भाविक या मार्कंडेय मंदिरास भेट देतात. या दिवशी सकाळी ध्वजारोहण आणि विविध पूजा व महायज्ञ करतात. श्री मार्कंडेयाची रथावर मिरवणूक निघते. यावेळी रथमार्गावर सडा, रांगोळ्या काढून भक्तीभावाने स्वागत करतात. मिरवणुकीत श्री मार्कंडेय, शंकर व यमराज यांचा सजीव देखावा ट्रकवर केला जातो. तसेच हातमाग व चरखा बैलगाडीवर ठेवून देखावा केला जातो. त्याचप्रमाणे लेझीम, नृत्य, टिपरी, शक्ती प्रयोग, भजन अशा अनेक विविध कार्यक्रम राबविले जातात. मिरवणुकीतील हातमागावर तयार केलेले वस्त्र सायंकाळी श्री मार्कंडेयास अर्पण केले जाते. सकाळी दहा वाजता सुरू झालेली मिरवणूक ही रात्री दहा वाजता मंदिरात विसर्जित होते. रथोत्सवासाठी वापरला जाणारा रथ हा चांदीचा असून बैलजोडीच्या साह्याने रथ ओढला जातो. रथोत्सवाच्या माध्यमातून पद्मशाली लोक भक्तीभावाने हा उत्सव साजरा करतात. यावर्षी या मंदिर स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याने मंदिर शताब्दी महोत्सव साजरा केला जाणार आहे.

---

# फार्म टू फोर्कच्या धरतीवर आधारीत सोलापूर जिल्ह्यासाठी मजिकल पाईप प्रकल्पाची संकल्पना - प्रियदर्शनी कदम-महाडिक

**कृषी वारसा असलेल्या भारत भूमीत शेतीच्या पारंपारिक पद्धतीने शतकानुशतके अर्थव्यवस्था आणि समाजाला आकार दिला आहे. परंतु अलीकडच्या काळात शेती व्यवसायात घट होताना दिसत आहे. युरोपमध्ये एका उल्लेखनीय संकल्पनेने त्यांच्या कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे ते म्हणजे फार्म टू फोर्कच्या मॉडेलने अर्थव्यवस्थेला चालना देण्यात युरोपाला प्रचंड यश मिळत आहे. फ्रान्स, जर्मनी आणि नेदरलँडसारख्या देशांनी फार्म टू फोर्क मॉडेल स्वीकारले आहे. उत्पादन, सुरक्षितता प्रक्रिया, वितरण अशा सर्व भागांवर संशोधन आणि नवकल्पनेने काम करून सहभागी असलेल्या प्रत्येकाला लाभ देणारी विश्वासार्थ अन्न साखळी तयार करण्याचे उद्दिष्ट युरोपियन सुपर मार्केट प्रणालीचे आहे. यामुळे शेतकऱ्यांना थेट ग्राहकापर्यंत पोहोचण्याची संधी मिळते आणि मिडल मॅनचा सहभाग हटवून थेट नफा शेतकरी वर्गाला मिळतोय. परंतु फार्म टू फोर्क म्हणजेच नेमकं काय हे जाणून घेऊ यात. शेतकरी बाजार आणि ग्राहकांना जोडणारी एक महत्त्वाची व्यवस्था तयार करणे म्हणजे, फार्म टू फोर्क मॉडेल स्वीकारून भारतीय शेतकरी उत्पादकता वाढवू शकतील ही संकल्पना प्रत्यक्षात साकार केल्याने शेतकरी समुदायाला आर्थिक लाभ मिळेल. त्यांच्या उत्पादनाला खात्रीशीर बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाईल.**

उत्पादित पौष्टिक पदार्थ ग्राहकांपर्यंत फ्रेश पोहोचवले जाणे शक्य होईल. सध्या देशात उपलब्ध आकडेवारीनुसार भारतात उगवलेली १६% फळे आणि भाज्या दरवर्षी वाया जातात. भारतात उत्पादित दहा टक्के तेलबिया कडधान्य आणि तृणधान्ये दरवर्षी वाया जातात. फार्म टू फोक मॉडेलमुळे हे नुकसान कमी करण्याचे काम शक्य होईल. आपण आपल्या कृषी पद्धतींमध्ये नवीन बदल घडवून युरोपाप्रमाणे फार्म टू फोर्क मॉडेल्स स्वीकारून त्याची प्रतिकृती तयार केली पाहिजे. भारत व युरोप यांच्यामध्ये मार्केट परिस्थितीची तुलना करून पाहू या. यूरोपात अनेक प्रमुख विक्रेते भरघोस नफ्याचा लाभ घेत आहेत. भारतामध्ये किराणा व्यवसायावर प्रामुख्याने असंघटित क्षेत्राचे वर्चस्व आहे. १२ दशलक्षाहुन अधिक किराणा दुकानांसह त्यांचा भारतीय फूड अँड ग्रोसरी बाजारात ९०टक्क्यापेक्षा जास्त हिस्सा आहे. भारतीय सुपर मार्केट साखळ्यांना आंतरराष्ट्रीय ब्रँड्सने पाहिलेल्या यशाच्या पातळीपर्यंत पोहोचण्यात काही आव्हाने येतात. या आव्हानांमध्ये मर्यादित तंत्रज्ञान आणि सुविधा अपुरे संशोधन, वाहतुकी दरम्यानचे नुकसान, स्टोअरेज समस्या आणि उत्पादकांसाठी आर्थिक संघर्ष यांचा समावेश आहे. या सर्व आव्हानांवर उपाय म्हणजेच फार्म टू फोर्क मॉडेल फार्म टू फोर्कच्या धरतीवर आधारित सोलापूर जिल्ह्यासाठी मॅजिकल पाईप या आश्वासक प्रकल्पाची संकल्पना प्रियदर्शनी कदम महाडिक यांनी केली आहे. त्यांच्या लंडनमधील पाच वर्षाच्या वास्तवादरम्यान केलेल्या अन्न प्रक्रिया विभागाच्या उच्च पदवी शिक्षणातून मिळवलेल्या ज्ञानातून आणि अनुभवातून त्यांनी ही संकल्पना आखलेली आहे. आपल्या दृष्टिकोनासह




मॅजिकल बाईट्सने अशा पुरवठा साखळीची कल्पना केली आहे. जी शेतकऱ्यांना बाजारपेठांशी जोडते बाजारपेठांना थेट ग्राहकांशी जोडते . गुणवत्ता सुनिश्चित करते. अद्ययावत टेक्नॉलॉजीला प्राधान्य देते. मिडल मॅनची चिंता हटवून थेट शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी चांगली किंमत मिळवून देते. मॅजिकल बाईट्स फार्म टू फोर्क संकल्पनेच्या अंमलबजावणीचे नेतृत्व करणारे एक उगवते उदाहरण त्याच्या पथदर्शी प्रकल्पाद्वारे अनेक गाव स्वावलंबी होतील आणि उत्तम राहणीमान देणारा ग्रामीण विकास केला जाईल. ग्रामीण जीवनाच्या विविध भागांमध्ये हा विकास कसा अमलात आणला जाऊ शकतो ते पाहूया .प्रथमतः येते पाणी. शेतीसाठी पाणी व्यवस्थापन महत्त्वाचे आहे . रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि पाझर यंत्रणा यासारख्या उपक्रमाद्वारे गावात कोरड्या हंगामातही पाणीपुरवठा केला जाऊ शकतो. पुढे येते तंत्रज्ञान आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेत मोबाईल प्सद्वारे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हवामान अंदाज पाहणे, पिकावर लक्ष ठेवणे, बाजारपेठेची संपर्कात राहणे आणि इतर आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर करणे इत्यादी गोष्टी गावकऱ्यांसाठी सुविधा आणि सेवा देण्याच्या कामी येतील. यानंतर पाहू या ऊर्जा अक्षय ऊर्जा तंत्रांचा अवलंब करणे हे काळाची गरज आहे. जसे की सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा रस्त्यावरील दिवे लावणे, पाणी गरम करणे, मोटार चालवणे, पंप चालवणे यामध्ये सौर तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. पवन ऊर्जेचा रिन्यूएबल ऊर्जा स्तोत्र म्हणून उपयोग केला जाऊ शकतो. शेवटी येते लहान मोठे व्यवसाय आणि कृषी पर्यटन लहान मोठे व्यवसाय हे युवक आणि गृहिणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतील आणि याद्वारे ग्रामीण अर्थव्यवस्थेला सशक्त करता येईल. याव्यतिरिक्त कृषी पर्यटकांना आकर्षित करण्याचे काम होईल जेणेकरून पर्यटनातून उत्पन्न निर्माण होईल आणि सांस्कृतिक देवाण-घेवाणीला प्रोत्साहन देण्याचे काम होईल. हे उपक्रम फार्म टू फोर्क सोबत जो आर्थिक विकास होईल त्या पुढील पाऊल म्हणून राबवले जातील आणि गावांचा सर्वांगीण विकास आणि समृद्धीसाठी हातभार लावतील. या परिवर्तनाला चालना देण्यासाठी सरकारी संस्था, कृषी संस्था आणि शेतकरी यांच्याकडून एकत्रित प्रयत्न आवश्यक आहे. फार्म टू फोर्क उपक्रम अनेक कारणांसाठी महत्त्वाचे आहेत. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातही नोकऱ्या निर्माण होतात. शहरांमध्ये होणारे स्थलांतर रोखले जाते आणि एकूणच आर्थिक विकास आणि जीडीपी वाढीस हातभार लागतो. आधुनिक पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करून संशोधन आणि विकासाला चालना देऊन आणि आवश्यक्य सहाय्य प्रधान करून आपण फॉर्म टू फोक मॉडेलच्या भरभराटीसाठी सक्षम वातावरण तयार करू शकतो. फॉल टू फोर्क मॉडेल आणि मॅजिकल बाईट्ससारख्या दूरदर्शी प्रकल्पाद्वारे आपण आपल्या शेतकऱ्यांना सक्षम करू शकतो. विश्वासार्ह आणि एक संघ साखळी तयार करू शकतो आणि आर्थिक विकासाला चालना देऊ शकतो . सहाय्यक सरकारी धोरणे तांत्रिक प्रगती आणि सहयोगी प्रयत्नांसह आम्ही भारतीय शेतीची खरी क्षमता अनलॉक करू शकतो आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी एक समृद्ध भविष्य सुनिश्चित करू शकतो. चला या नव्या परिवर्तनाकडे आपण एकत्र येऊन कृषी क्रांती घडवून आणूया. फॉर्म टू फोर्क मॉडेलच्या बळावर शेती पुन्हा सोन्याची करूया.

---

**माढा वेल्फेअर फाऊंडेशन, निमगाव (टे) या संस्थेचे अध्यक्ष धनराजदादा शिंदे यांनी म हत्त्वाकांक्षी कुर्डू बेंद ओढा खोलीकरण व रुंदीकरण प्रकल्पाचे काम पूर्ण केल्याने बासष्ठ हजार एकर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे.याचा थेट फायदा शेतक-यांना होणार असून शासनाने बेंद ओढ्यात पाणी सोडण्याचा निर्णयच यामुळे शक्य झाला आहे. सुमारे ३४.५ कि.मी. लांबीच्या या ओढ्याचे खोलीकरण व रुंदीकरण धनराज शिंदे यांच्या प्रयत्नाने प्रुण झाले आहे. धनराज शिंदे यांनी शेतकरी हीत लक्षात घेवूनच पाण्यापासुन वंचीत राहीलेल्या आणी सतत दुष्काळाने त्रस्त राहीलेल्या भागाला पाणी मीळवून देण्यासाठी आपली पुर्ण सामाजीक व राजकीय ताकत वापरून तसेच राज्यात प्रथमच लोकसहभाग, सरकारी संस्था आणि खासगी संस्था यांच्या भागीदारीतून हे काम हाती घेवून पुर्ण केल्याने तालुक्यातील सुमारे ६२ हजार एकर क्षेत्राला याचा थेट फायदा होणार आहे. हा प्रकल्प राज्यातच नव्हे तर देशात एक आदर्शवत ठरला गेला आहे. याबरोबरच सामाजीक कामातून, माढा वेल्फेअरच्या माध्यमातुन धनराज शिंदे यांनी अनेकांना मदतीचा हात दीला आहे यातुनच त्यांचे तरूण नेतृत्व म्हणून माढा तालुक्यात पुढे आले. म्हणूनच धनराज शिंदे आपला माणूस,कामाचा माणूस म्हणूनच नावारुपाला आले.**

# धनराज शिंदे आपला माणूस,कामाचा व हक्काचा माणूस माढा तालुक्यातील शेतक-यांची भावना



वेल्फेअर फाऊंडेशनचे अध्यक्ष धनराज शिंदे यांच्या नेतृत्वाखालील या प्रकल्पाला जिल्हा परिषद सोलापूर, नाम फाऊंडेशन, पुणे, मुकुल माधव फौंडेशन, पुणे यांनी व यासारख्या इतर काही खासगी संस्थांचे अत्यंत मोलाचे आर्थिक सहकार्य लाभले आहे. माढा तालुक्याचे आमदार मा. बबनदादा शिंदे व करमाळा तालुक्याचे आमदार संजयमामा शिंदे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करत शासन स्तरावर या प्रकल्पासाठी पाठपुरावा करुन आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता केल्याने हा अवघड प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यात यश आले असले तरी अत्यंत कमी वयात शेतकरी हीतासाठी आपणही काहीतरी केले पाहीजे या जाणीवेतून आणी भावणेतून हाती घेतलेले काम वेळप्रसंगी पदरमोड करत पुर्ण केल्याच्या भावना शेतक-यांनी व्यक्त केल्यानेच आ.बबनराव शिंदे यांच्या इतकेच महत्व आज धनराज शिंदे यांना सर्वसामान्यातून मिळत आहे.त्यामुळे त्यांच्याकडे तालुक्यातील जनतेचा पाहण्याचा दृष्टीकोन बदलला असून नेक्स्ट नेतृत्व म्हणूनही ओळखले जाते.

शेतकऱ्यांनी बहुमोल सहकार्य केल्यानेच प्रकल्पाचे काम वेगाने करण्यात आपली संस्था यशस्वी झाली. या प्रकल्पाचा लाभ ढवळस, पिंपळखुटे, चौभेपिंपरी, कुई, कुडूवाडी, भोसरे, वडाचीवाडी ,रणदिवेवाडी, वडशिंगे, उंदरगाव, महातपूर या गावांना होत असून या गावांतील लोकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला असून ओढ्यालगतच्या सुमारे ६२ हजार एकर क्षेत्राला पाणी उपलब्ध होणार आहे. या कामामुळे बेंद ओढ्याला सध्या पावसाळ्यात नदीचे स्वरूप येते ही शेतक-यासाठी आनंदाची व जमेची बाजू आहे.

**- सोमनाथ शिंदें कुर्डूवाडी**





सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
कामगार नेते
माजी चेअरमन
उपाध्यक्ष
मा.चांगदेव सोनवणे
मा.भालचंद्र साखरे
मा.केरबा माने
शुभेच्छुक
मा.चांगदेव सोनवणे (कामगार नेते)
मा.भालचंद्र साखरे (चेअरमन, मनपा चतुर्थ श्रेणी कर्मचारी पतसंस्था, सोलापूर)
मा.केरबा माने (उपाध्यक्ष, कामगार शक्ती युनियन, सोलापूर), मित्र परिवार




सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
मा.सचिनदादा कल्याणशेट्टी
लोकप्रिय आमदार
प.महाराष्ट्र उपाध्यक्ष
जिल्हा उपाध्यक्ष
मा.सुनीलदादा बंडगर
रा.स.प.
मा.सुरेश गुत्तेदार
रा.स.प.
शुभेच्छुक
दयानंद बिडवे
मित्र परिवार, अक्कलकोट




सोलापूरच्या वृत्तपत्र सृष्टीसह राज्यात दिमाखदार कामगिरी करणारे, सर्वसामान्यांचे व्यासपीठ असलेले, गोरगरिब जनतेच्या समस्यांना वाचा फोडून न्याय मिळवून देणाऱ्या
राष्ट्रीय अध्यक्ष
दै. सोलापूर तरुण भारतच्या
४० व्या वर्धापनदिनास
आणि पुढील वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा
संसदरत्न
मा. खा. शरदचंद्रजी पवार
खा. सुप्रियाजी सुळे
तालुका अध्यक्ष
जिल्हाध्यक्ष
प्रदेशाध्यक्ष
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार
मा. विनय (नाना) पाटील
बळीराम (काका) साठे
मा. आ. जयंत पाटील
शुभेच्छुक
राजेंद्र रसाळ
मोहोळ शहराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)




सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
मा.सचिनदादा कल्याणशेट्टी
अक्कलकोटचे लोकप्रिय आमदार
मा.यासीन कटरे
भाजपा युवा नेता
शुभेच्छुक
मा.यासीन कटरे
मित्र परिवार, वळसंग




दै. सोलापूर तरुण भारतच्या
वर्धापनदिनास
हार्दिक शुभेच्छा
स्व. अभिजीत (दादा)
क्षीरसागर
मा. नागनाथ (भाऊ)
क्षीरसागर
स्वर्गीय अभिजीत (दादा)
क्षीरसागर प्रतिष्ठान, मोहोळ
जनसेवेची बांधिलकी
मा. सोमेश (आबा) क्षीरसागर
संस्थापक अध्यक्ष
मा. सुशील (भैय्या) क्षीरसागर
नगरसेवक, जिल्हा उपाध्यक्ष
शुभेच्छुक
स्वर्गीय अभिजीत (दादा) क्षीरसागर प्रतिष्ठान, मोहोळ
पदाधिकारी व सर्व सदस्य
२४७, मोहोळ विधानसभा मतदार संघातील भाजप-शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, रासप, रयत क्रांती संघटना व महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, हितचिंतक




सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
Road Safety
चला शपथ घेऊया...
रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करूया...
मी कधी वाहतुक नियमांचे उल्लंघन करणार नाही.
मी नेहमी दुचाकी वाहन चालवताना हेल्मेटचा वापर करणार.
मी नेहमी सिट बेल्टचा वापर करणार.
मी वाहन चालवताना मोबाईलचा वापर करणार नाही.
मी शाळा आणि खेळाच्या मैदानाजवळ जास्त सावध राहीन.
मी कधी कोणत्याही प्रकारची नशा करुन गाडी चालवणार नाही.
30 KM/HR IN CITY
मी नेहमी वेग नियंत्रणाचे पालन करणार.
मी माझ्या गाडीची व्यवस्थित काळजी घेईन.
मी अपघातग्रस्तांना मदत करणार.
Raje Motors
राजे मोटर्स
जी.पी.एस., फास्ट ट्रॅक, रेडियम नंबर प्लेट, गव्हर्नमेंट पीयुसी मशीन,
अधिकृत महाराष्ट्र राज्य RTO मान्यता प्राप्त विक्रेते